

प्रभाकर अत्रे

# कुसुमाग्रज

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.
REFBK-0011521

# कुसुमाग्रज

[ कवि कुसुमाग्रज यांच्या समग्र काव्याचें अभ्यासपूर्ण विवेचन ]

दा. क्र. ११५२१

REFBK-0011521

लेखक

प्रभाकर अत्रे

मॉडर्न बुकडेपो प्रकाशन

पहिली आवृत्ति
१७ मार्च १९६१

* * *

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

* * * *

प्रकाशक
श्री. कमलाबाई भिडे
मालक, मॉडर्न बुकडेपो,
बाजीराव रस्ता, पुणें २.

मुद्रक
ज. ग. जोशी
जनार्दन प्रेस
३९४ सदाशिव पुणें २.

प्रतिभेच्या स्मृतीस—

# - अनुक्रमणिका -


अंतरंगांत शिरण्यापूर्वी

अर्वाचीन मराठी काव्य आणि कुसुमाग्रज १

कुसुमाग्रजांचीं कांहीं वैशिष्टयें १४

कुसुमाग्रजांची राष्ट्रीय - ध्येयप्रवण कविता १५

कुसुमाग्रजांची सामाजिक कविता २९

कुसुमाग्रजांची प्रेम कविता ४३

' विशाखे 'तील संकीर्ण कविता ५८

कवि कुसुमाग्रज
यांची खास मुलाखत ७४

# अंतरंगांत शिरण्यापूर्वी—

30074 वि: 7323 नों: दि: 931019

" क्षणांत नाहिंसे होणारे दिव्य भास " ह्या शीर्षकाची केशवसुतांची एक कविता आहे. त्या कवितेच्या शेवटीं कवि म्हणतो,

आत्माराम सखेद होऊनि वदे तो आपणाशीं असें
" कांहीं सुंदर देखिलें खचित मी, यामाजि शंका नसे
हा ! हा ! हे जर सर्व भास धरितां येतील मातें, तर
पृथ्वीचा सुरलोक कीं बनवुनी टाकीन मी सत्वर ! "

ही कविता वाचीत व शिकवीत असतांना मला कधींकधीं खूप आनंद होतो. कांहीं स्वप्नें आठवतात. त्यांतलीं सारींच स्वप्नें साकार होतात असें नाहीं. पण स्वप्नें पाहणें, त्यांत रंगून जाणें, त्यांतलीं कांहीं साकार होण्यासाठीं पडतील ते सायास घेण्याची जिद्द बाळगणें आणि तीं साकार झाल्यावर अविनाशी आनंद उपभोगणें ही माणसाची सहजप्रवृत्ति आहे.

आजचें हें पुस्तक हें ह्या पद्धतीनें केलेल्या परिश्रमांचें एक फलित आहे. कांहीं वर्षांपूर्वीं दादरला मराठी साहित्य विद्यालयाचे प्राज्ञ–विशारदचे वर्ग चालवीत असतांना ह्यांतल्या कांहीं ' अंधुक आकृति " मला प्रथम दिसल्या. माझे मित्र प्रा. रमेश तेंडुलकर ह्यांच्या आणि माझ्या त्यावेळीं जडलेल्या स्नेहांतला सर्वांत पक्का दुवा म्हणजे "कुसुमाग्रजांची कविता " ! दोघांचीं कारणें त्यावेळीं कदाचित वेगळी असतील ! पण आम्हां दोघांनाही ह्या प्रकाशपूजक कवीचें प्रभावी आकर्षण होतें. आणि त्या पायीं त्यावेळीं प्रा. नसलेल्या परंतु काव्याच्या क्षेत्रांत १०० जीवनलहरी आमच्या ' ऊर्मि ' ह्या वार्षिकासाठीं देणाऱ्या तेंडुलकरांनीं मात्र बरीच मुलुखगिरी केली होती. कुसुमाग्रजांच्या कवितेवर रमेश तेंडुलकरांनीं साडेचार तास व्याख्यान ( २ दिवस मिळून ) दिलें. त्या त्यांच्या व्याख्यानानें त्यांना कांहीं वेगळा अनुभव, वेगळा प्रत्यय दिला असे ते सांगतात. मलाही कांहीं धूसर स्वप्नें दिसलीं. व्यवहाराच्या समरांत " मार्क टाइम " करीत असलेल्या मला माझीं तीं धूसर स्वप्नें साकार करण्याची संधि मिळाली ती ' ज्ञानमंदिर ' ह्या संस्थेमुळें ! ' विशाखा ' हा माझा आवडता कविता संग्रह शिकविण्याची संधि मिळाली नसती तर पूर्वीं कधींतरी झालेला " दिव्य भास " सत्यांत उतरविण्याचा हा प्रयत्न घडला असता कीं नाहीं शंका वाटते !

विद्यार्थिनींसाठीं—नौकरी करून, संसार करून पदवीची कांक्षा बाळगणाऱ्या विद्यार्थिनीसाठीं कांहीं टिपणें करीत असतांना त्या “ अंधुक आकृति ” मला बोलावूं लागल्या. विचारांनीं त्यांच्या ‘ निगूढ गीतीं ’चा अर्थ कळला. आणि मग टिपणांचें रूपांतर लेखांत झालें. पारिजात ( दिवाळी १९५९ ) व विविधवृत्त या नियतकालिकांच्या संपादकांनीं प्रसिद्धी देऊन तीं स्वप्नें अधिक जोपासलीं ! दिवाळींत कविवर्य कुसुमाग्रजांनीं त्याला स्नेहाचें व धीराचें पाणी घातलें. माझे मित्र कवि भालचंद्र खांडेकर यांनीं सुंदर कुंपण घातलें व मॉडर्न बुकडेपोनें आकर्षक कुंड्या पुरविल्या आणि म्हणूनच ही फुलबाग आतां कांहीं सत्याचा आकार घेत आहे. त्या दिव्य भासांना अल्पांशानें कां होईना पकडण्यांत मी यशस्वी झालों आहे आणि सुरलोक पृथ्वीवर आणण्याची किमया त्यांत नसली तरी त्यांतला भाव जाणण्याइतकें सौहार्द मराठी काव्यरसिकांत असल्याची खात्री मला असल्यानें मी तृप्त झालों आहे.

ही बाग कशी आहे. तिच्यांत गुलाब किती, आणि कण्हेरी किती, जाईजुई किती आणि रानफुलें किती हें आपण ठरवायचें आहे. मी मात्र माझ्या एका आवडत्या कवीला मानवंदना करण्याच्या भूमिकेनें हें सारें लिहिलें आहे. जें सौंदर्य व सामर्थ्य मला त्या कवितेंत गवसलें तें आपणांस सादर केलें आहे. ही मार्गदर्शिका नाहीं हें मुद्दाम नमूद करतों. पण हें मार्गदर्शक ठरावें ही अपेक्षा मात्र यांत आहे. परीक्षेपेक्षांही काव्याच्या वेडानें आपण कुसुमाग्रजांचीं सगळी कविता वाचावी अशी प्रेरणा ह्या प्रपंचांतून मिळाली तर मी म्हणेन ‘ हेंही नसे थोडकें ! ’

हें पुस्तक काढण्याचें कामीं सहाय्य केल्याबद्दल मित्रवर्य श्री. भालचंद्र खांडेकर, मॉडर्न बुकडेपो, माझे मित्र प्रा. रमेश तेंडुलकर, चित्रकार मुकुंद तळवलकर व कविवर्य कुसुमाग्रज ह्या साऱ्यांचें मी आभार मानतों. प्रेरणा दिल्याद्दबल ज्ञानमंदिर’च्या विद्यार्थिनींचे व चालकांचे व प्रसिद्धि दिल्याबद्दल पारिजात—विविधवृत्ताच्या संपादकांचें आभार मानणें कर्तव्य ठरतें.

आता आपण दालनांत शिरूं शकता.

म्हात्रे बिल्डिंग, रामनगर, **डोंबिवली.**
वर्षप्रतिपदा शके १८८३ ( १७-३-६१ )

**प्रभाकर अत्रे**

दा. क. ११५३७

# १ : अर्वाचीन मराठी काव्य आणि कुसुमाग्रज

अर्वाचीन मराठी काव्याची अरुणध्वजा फडकावीत व नव्या युगाची, नव्या दमाची, नव्या आविष्काराची ग्वाही देत देत १८८५ च्या सुमारास मराठी काव्याच्या क्षेत्रांत केशवसुत नामक एक बंडखोर माणूस उभा राहिला. त्यानें उभारलेल्या बंडाच्या निशाणावर तीन मंत्र कोरलेले होते. " स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व" हे ते तीन मंत्र होत. वास्तविक ह्या तीन्ही कल्पना ह्या देशांत प्रथमच व नव्यानें मांडल्या गेल्या असेंही म्हणतां येणार नाहीं. ह्यांतला एकेक विचार ह्या देशांतील धर्मानें, संस्कृतीनें भिन्न भिन्न काळीं मांडलेला, पुरस्कारलेला असल्याची ग्वाही कालपुरुष देत आलेला आहे. परंतु आमचा समाज जितका चांगला विचार मांडण्याची क्षमता बाळगणारा आहे तितकाच तो विसराळूही फार मोठ्या प्रमाणांत आहे. म्हणूनच स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व हाच जुना विचार नव्यानें व नवेपणाच्या हिरिरीनें मांडणारा एखादा आगरकर, एखादा केशवसुत, एखादा हरि नारायण आपटे आम्हांला प्रत्येक कालखंडात लागत असतो. आम्हांला संपूर्ण परिचित असलेले सत्याचे आणि अहिंसेचे पाठ पुन्हां देण्यासाठीं आम्हांला महात्माजींसारखा पुरुष लागतो. तर गार्गी मैत्रेयीचा इतिहास वाचणाऱ्या व क्वचित मुखोद्गत असलेल्या आम्हांला स्त्रीशिक्षणासाठीं जीवनाची बाजी लावणारा महर्षी कर्वे लागतो. तर " सर्वांभूतीं परमेश्वर " पाहणाऱ्या व नाथांच्या कावडी भरभरून घरीं नेणाऱ्यांच्या मनांतील स्पृश्यास्पृश्यतेचे विचार काढून टाकण्यासाठीं एखादा महर्षि शिंदे आम्हांला लागतो, एखादे सावरकर पुन्हां उगवावे लागतात.

मराठी काव्याच्या क्षेत्रांतही "स्वातंत्र्य, समता आणि बंधुता" शिकविण्यासाठीं व मराठी काव्याच्या क्षेत्रांत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठीं आम्हांला केशवसुतांची गरज लागली. केशवसुतांचें क्रांतिकारकत्व हें कांहीं वर्षांपूर्वीं एक वादाचा विषय झालें होतें. आणि "क्रांति कीं उत्क्रांति" असा संदेह कांहीं जाणकार टीकाकारांच्या मनांत उत्पन्न झाला होता. परंतु जाअ

तो संदेह राहिलेला नाहीं. हें क्रांतिकारकत्व कांहीं आपाततः त्यांना लाभलेलें नव्हतें तर त्यासाठीं कांहीं योजनापूर्वक प्रयत्न त्यांनीं केले होते असेंच दिसून येते. " आपण कांहीं नवीन करतों आहोंत," ही जाणीव त्यांच्या काव्यांतूनही वारंवार व्यक्त झालेली आपणांस दिसते. ही जाणीवही कांहींच्या मतें ' विकृत व रोगट ' मनोवृत्तीचें लक्षण मानली गेली आहे. परंतु जेव्हां नवा विचार समाजापुढें येत असतो तेव्हां तो आणणाऱ्यांना त्या त्या विचारासंबंधींची सांगोपांग चर्चा अपरिहार्यपणें करावी लागते. आणि केशवसुतांनीं तशी ती केली यांत व्यक्तिशः त्यांच्याकडे दोष येत नाहीं.

## केशवसुतपूर्व कवितेचें स्वरूपः—

केशवसुत–कालीं मराठी काव्यांत झालेल्या क्रांतीचें स्वरूप दुहेरी होतें. काव्याचें आंतर आणि बाह्य अशा दोन्हीं स्वरूपांत झालेलीं ती क्रांति होती. केशवसुतपूर्व मराठी कवितेचा विचार केल्यानंतर जे कांहीं ठराविक विशेष पुढें येतात ते असे:—

( १ ) प्रदीर्घ काव्य रचना ( २ ) ' भक्ति ' ' मोक्षसाधन ' हाच प्रधान हेतु ! ( ३ ) नीति प्रतिपादन ( ४ ) लौकिक व घरगुती विषयावरील काव्य असंभवनीय ( ५ ) आत्मलेखनाचा अभाव आणि आत्मलेखन असलेंच तर तें ' भक्ति ' ह्या भावनेपुरतेंच मर्यादित होते. अध्यात्मचर्चा, परमेश्वराची आळवणी, प्रार्थना गीतें ह्या पुरतेंच तें आत्मलेखन मर्यादित होतें असें दिसतें. " मी " चा संकोच होऊन तें फक्त ' भक्ति ' विषयापुरतेंच संकोचलें गेलेलें दिसते.

केशवसुतपूर्व कालांतील मराठी कवितेचें स्थूल स्वरूप वर दिलें आहे. त्या कालखंडांत मोरोपंती काव्याची परंपरा अंशतः सर टी. माधवराव, बापूसाहेब कुरुंदवाडकर ह्यांनीं चालविलेली दिसते. " आर्या " हें मोरोपंती ' वाहन ' ह्या परंपरेनें स्वीकारलेलें दिसतें. दुसरी परंपरा शास्त्रीपंडितांची ! ह्या परंपरेला संस्कृत काव्याचें जबर आकर्षण दिसते. परशुरामपंत गोडबोले, कृष्णशास्त्री चिपळूणकर, गणेशशास्त्री लेले, वा. वा. खरे इत्यादि मंडळींनीं ही परंपरा लोकप्रिय करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. मेघदूत, रघुवंश, करुणविलास, यशवंतराव इत्यादि काव्यें त्यांच्या परंपरेची यशस्वी चिन्हें

म्हणून गौरवितां येतील. भक्तिभावनेला प्राधान्य देणारी " अभंग " व भक्तिगीतात्मक रचना करणारीही एक परंपरा मराठींत चालू होती. पोवाडे, लावण्या हेही काव्यप्रकार मानसन्मानानें नसले तरी आपापल्या ताकदीप्रमाणें काव्यसंसाराला हातभार लावीत होते आणि इंग्रजी काव्याच्या व साहित्याच्या वाचनानें रूपांतर-भाषांतराची एक परंपरा निर्माण झाली होती. त्या परंपरेंत दीर्घकाव्यांची व स्फुट काव्यांची अशा दोनही प्रकारच्या काव्यरचना आढळून येतात. **श्री. प्रधान** ( दैवसेनी–लेडी ऑफ द लेक वरून ) व **डॉ. कीर्तिकर** ( इंदिरा–प्रिन्सेस वरून ) **श्री. कुंटे** यांचा राजा शिवाजी व वि. मो. महाजनी ह्यांची स्फुट भावगीतात्मक रचना हीं ह्या परंपरेची ठळक उदाहरणें म्हणून नमूद करतां येतील.

## काव्य-क्रांतीचें स्वरूप

केशवसुतपूर्व मराठी काव्याचें स्वरूप आपण पाहिलें. ह्या पार्श्वभूमीवर केशवसुतांच्या नंतरच्या काव्याचें स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न केला तर प्रामुख्यानें लक्ष्यांत येतात त्या गोष्टी अशा––

( १ ) **भक्तीच्या पकडींतून मुक्तता**:––भक्तिभावनेसाठींच काव्य मोक्षप्राप्तीचें माध्यम म्हणून काव्य ह्या भूमिकेला प्रथम मूठमाती मिळाली. भक्ति हा विषय नव्या कवितेनें वर्ज्य मानला नाहीं. परंतु तें अधिष्टानही मानलें नाहीं हें खरें !

( २ ) **स्फुट, भावगीतात्मक रचना**:––स्फुट काव्यरचना हें त्या कवितेचें दुसरें प्रमुख वैशिष्ठ्य होय! याबाबत " प्रतिभेचा तोकडेपणा, खुजें व्यक्तित्व इत्यादि आक्षेप कै. अच्युतराव कोल्हटकर इत्यादि मंडळींनीं घेतले. पण विनायकादि कवींनीं त्याही काळीं स्फुट रचनेबरोबरच प्रदीर्घ काव्यरचनाही ह्या तथाकथित ' क्षीण–प्रतिभ ' लोकांना करतां येतें हें सक्रीय सिद्ध केलेलें दिसतें. जाणिवपूर्वक स्फुट रचना कवींनीं स्वीकारलेली होती. विस्तारावर काव्याचें ' काव्यत्व ' अवलंबून नसून काव्यगुणांवरच मुख्यतः काव्याचें काव्यत्व अवलंबून आहे व असतें हा नवा विचार तत्कालीन कवींनीं स्वीकारलेला होता आणि म्हणूनच ही जाणीवपूर्वक क्रांति त्यांनीं घडवून आणलेली होती.

( ३ ) **आत्माविष्कारः**--' भक्ति ह्या भावनेपुरताच मर्यादित असलेला आत्माविष्कार मानवी जीवनांतल्या विविध-सामान्य-असामान्य, लहान मोठ्या अनुभूतींवर आधार शोधूं लागला. ' साध्याही विषयांतील मोठा आशय ' कवि शोधूं लागला. धोंडयांतून दिसणारें महान शिल्प त्याला मोहवूं लागलें. पत्नि, प्रेयसी, सखी, मंत्रि ह्या विविध नात्यांनीं घरांत वावरणारी स्त्री ही त्याच्या काव्याचा विषय बनली. तिच्या शरीरावर केंद्रित होणारी पूर्वसुरींची दृष्टि कवीनें तेथेंच केंद्रित करण्याचें सोडून देऊन तिच्या आंतरिक सौंदर्यावर केंद्रित केली. आणि तिच्या आत्म्याच्या झालेल्या दर्शनावर त्यानें काव्य लिहिलें. मी, माझें घर, गांव, गोठयांतलीं जनावरें, मित्रमंडळी, आप्तस्वकीय, देश, धर्म, अरुणोदय, सळसळणारीं पानें, पहांटेच्या वेळीं किलबिल करीत स्वैरपणें बागडणारे पक्षी, झऱ्यांचे गोड गाणें आणि सागराचा थयथयाट इत्यादि अनेकविध सामान्य-असामान्य विषयांवर कवीची लेखणी चालूं लागली. अंत्यज मुलें प्रश्न विचारूं लागलीं. मजुरांचें दुःख बोलूं लागलें. परमेश्वराशिवाय काव्य होऊं लागलें. भक्तीकडून मुक्तीकडे मराठी काव्याचा प्रवास सुरू झाला.

ही मुक्ति बाह्यवेषाबाबतही झाली. नवनवीन वृत्तें, जाति, सुनीतादि काव्यप्रकार, गझल, रुबाया, कणिका, इत्यादि नवे नवे व मराठीला अपरिचित असे काव्यप्रकार मराठींत रूढ झाले. कविवर्य तांबे ह्यांची ' गेय ' परंपरा काव्यांत रूढ झाली व स्थिरावली. मुक्तछंदाचें स्वागत झालें. गद्यकाव्यही वाचनीय वाटूं लागलें. आज तर विंदा करंदीकरांसारखा एक अग्रेसर कवि काव्याबाबत कितीतरी नवनवीन प्रयोग करीत आहे. तालचित्रें, ऋचा इत्यादि रचना ह्या विधानाची साक्ष पटवते. विनोदी व विडंबन कवितेची, राष्ट्रीय कवितेची, नाट्यगीत व शिशुगीतांची व कांहीं प्रमाणांत खंड काव्याची व महाकाव्याची परंपरा मराठींत सुरू झाली. हे सारे बदल केशवसुत ह्या कवीच्या क्रांतीचा मागोवा घेत घेत झाले ही गोष्ट आतां इतिहासानें मान्य केली आहे.

## केशवसुत ते कुसुमाग्रज :--

केशवसुत ते कुसुमाग्रज ह्या कालखंडाचे काव्यदृष्ट्या खालील भाग पडतात.

(१) केशवसुत व समकालीन कवि (१८८५ ते १९०५)
(२) गोविंदाग्रज व समकालीन कवि (१९०५ ते १९२०)
(३) कविवर्य तांबे व चंद्रशेखर (१९२० नंतर)
(४) रविकिरण मंडळ (१९२० ते १९४०)
(५) कुसुमाग्रज व समकालीन (१९३५ ते १९४५)

**केशवसुत आणि समकालीन** :--ह्या विभागांत स्वतः केशवसुत, रेव्ह. नारायण वामन टिळक, विनायक (विनायक जनार्दन करंदीकर), माधवानुज (डॉ. काशिनाथ हरि मोडक) कवि दत्त (दत्तात्रेय कोंडो घाटे) इत्यादि कवींचा समावेश होतो. त्या त्या कवींचीं वैशिष्ट्यें थोडक्यांत खालीलप्रमाणें देतां येतील :

**केशवसुत**:--स्वतंत्र स्फुट रचना, सुनीत प्रकार स्पष्ट केला व विविध प्रयोग केले. आत्मलेखन आणलें, काव्यविषयक व सामाजिक विचार मांडणाऱ्या कविता लिहिल्या. निसर्गाला प्रथमच काव्यांत स्थान मिळालें. गूढगुंजनात्मक चिंतनशील प्रवृत्तीची कविता लिहिली.

**टिळक**:--काव्यविषयक, गूढगुंजनात्मक कविता लिहिली. नव्या जुन्यांचें मिश्रण–कारण 'भक्ति' भावनेला त्यांच्या कवितेंत स्थान होतें. फुलामुलांचे कवि !

**विनायक**:--राष्ट्रीय कविता प्रामुख्यानें लिहिली. दीर्घ कथा–काव्यें लिहिलीं. इतिहासावर अपार श्रद्धा होती.

**गोविंदाग्रज आणि समकालीन**:--ह्या विभागांत स्वतः गोविंदाग्रज (राम गणेश गडकरी) एकनाथ पांडुरंग रेंदाळकर, बालकवि (त्र्यंबक बापूजी ठोंबरे), बी (नारायण मुरलीधर गुप्ते) हे कवि प्रामुख्यानें येतात. पैकीं गोविंदाग्रज हे स्वतःला केशवसुतांचा सच्चा चेला म्हणवून घेत व त्यांच्या काव्यावर केशवसुतांच्या काव्याची जबर मोहिनी दिसते. 'प्रेमाचा शाहीर' म्हणून त्यांना म्हटलें जातें. असामान्य कल्पकता व भावनेची उत्कटता हीं दोन त्यांच्या कवितेचीं ठळक वैशिष्ट्यें होत. भाषाप्रभुत्व हें त्यांच्या साऱ्याच लेखनांतून प्रगट होतें. **रेंदाळकरांच्या** कवितेवर केशवसुतांची छाप दिसते. निर्यमक कवितेचा पुरस्कार व अशरीरी प्रेम (Platonic Love) ह्या दोन गोष्टींनीं त्यांनीं आपली कविता केशवसुतांच्या

पुढें नेण्याचा यत्न केला. **बालकवि** हे फुलांचे कवि, निसर्गाचेच कवि म्हणून साऱ्यांना परिचित आहेत. निसर्गाचीं प्रसन्न दर्शनें त्यांच्या काव्यांत पहावयास मिळतात.

## तांबे आणि चंद्रशेखरः---

कविवर्य तांबे ह्यांच्या काव्याला मराठी कवितेंत एक स्वतंत्र व महत्वपूर्ण स्थान आहे. भावगीत कवि, राग आणि ताल देऊन कविता लिहिली. परंपरा त्यामुळें निर्माण झाली. व भावगीतात्मक गेय कविता लिहिली जाऊं लागली. नाटयगीतें, शिशुगीतें व गूढगुंजनात्मक काव्यरचना हीं आणखी कांहीं वैशिष्ट्यें नमूद करतां येतील. **चंद्रशेखरांची** रचना विचारप्रधान पंडिती वळणाची होती. भावगीतानुकूल नाहीं. त्यांच्या काव्यांत आत्मलेखनाचा अभाव दिसतो. **रविकिरण मंडळः**---ह्या कालखंडातले प्रमुख कवि म्हणून माधव ज्युलियन, गिरीश व यशवंत ह्यांचा उल्लेख करतां येईल. काव्याबाबत संघटित असा फार मोठा प्रयत्न रविकिरण मंडळानें केला. केशवसुतांनंतर मराठी काव्याच्या क्षेत्रांत स्थिरावलेल्या विविध काव्यप्रकारांबाबत सामुदायिक व सुसंघटित असा प्रयत्न रविकिरण मंडळांतील कवींनीं केला. गझल, रुबाया, सुनीतें, खंडकाव्यें, भाषांतरें स्फुट कविता, जानपद गीतें इत्यादि काव्यप्रकार ह्यांच्या संघटित प्रयत्नांनीं लोकप्रिय झाले आणि सदस्यांच्या काव्यविषयक चर्चेतून " काव्यविचार " ह्या पुस्तकाचा जन्म झाला. त्याशिवाय वैयक्तिकरीत्या कवि गिरीश यांनीं **काव्यकला** " व माधव ज्युलियन यांनीं " **छंदोरचना** " ह्यासारख्या ग्रंथानीं मराठी काव्यक्षेत्रांत वैचारिक स्वरूपाची मोलाची भर घातली. काव्यसंग्रहांचें प्रकाशनही मंडळानें फार मोठया प्रमाणावर केलें व काव्यगायनाच्या कार्यक्रमांतून मराठी कविता घरोघरीं पोंहचवून ती लोकप्रिय करण्याचा अत्यंत यशस्वी प्रयत्न केला. आज " काव्यगायन, काव्यवाचन, काव्यदर्शन इत्यादि अनेकविध स्वरूपाचे कार्यक्रम आपण ऐकतों, पाहतों. परंतु त्याचें जनकत्व रविकिरण मंडळाकडे जाते. रविकिरण मंडळाच्या सदस्यांपैकीं माधव ज्युलियन १९३९ सालीं दिवंगत झाले. श्री. बा. रानडे, गिरीश हे आज फारसें काव्य लिहितांना दिसत नाहींत वि. द. घाटे हे पद्यापेक्षां गद्याच्या

प्रांतांत अत्यंत यशस्वी अशी मुलुखगिरी करतांना दिसताहेत. आज रवि-किरण मंडळाचा एकच प्रतिनिधी फार हिरिरीनें व काव्यविषयक अपार श्रद्धेनें काव्यलेखन करतांना दिसतो आणि तो म्हणजे कवि--महाराष्ट्रकवि **यशवंत** ! रविकिरण मंडळाची अत्यंत महत्वाची कामगिरी म्हणजे काव्या-विषयीं अपार श्रद्धा असलेली माणसें एकत्र आणणें व त्यांच्या करवीं मराठी काव्याच्या क्षेत्रांत विविध रुपाचीं, रंगांचीं सुवासाचीं फुलें फुलवणारीं बाग निर्माण करणें ! आजही " रविकिरण मंडळ–प्रकाशन " असें बिरुद् यशवंतांच्या अलिकडल्या पुस्तकांवर पाहिल्यावर त्या काव्यविषयक अपार श्रद्धा निर्माण करणाऱ्या " काव्य–पीठा "ची महती मनावर ठसते. रविकिरण मंडळाची परंपरा ही वैचारिक दृष्टया कविवर्य केशवसुतांचीच परंपरा असली तरी तिला विकासाची दिशा दाखविण्याचें व समृद्ध करण्याचें अत्यंत महत्वाचें कार्य रविकिरण-मंडळानें केलें हें मान्य करायला हवें.

१९२० नंतरच्या कालखंडांत रविकिरण मंडळाच्या कवींबरोबरच कवि वा. गो. मायदेव, केशवकुमार ( आचार्य प्र. के. अत्रे ), ह. स. गोखले, अज्ञातवासी, वा. भा. पाठक, आनंदराव टेकाडे, ज. के. उपाध्ये, कवि अनिल ( आत्माराम रावजी देशपांडे ), वा. ना. देशपांडे, गुणवन्त हणमन्त देशपांडे, स्वातंत्र्यशाहीर कवि गोविंद ( गोविंद त्र्यंबक दरेकर ), स्वातंत्र्यवीर सावरकर, दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी, पां. स. साने गुरुजी, कवि माधव, अनंत काणेकर इत्यादि कवि काव्यप्रांतांत मुलुखगिरी करीत होते. ह्यांतल्या कवींनीं मराठीला शिशुगीतें दिलीं. विडंबन-विनोदपर कविता दिली. जानपद गीतें दिलीं. ऐतिहासिक, राष्ट्रीय कविता दिली. मुक्तछंदात्मक कवितेचा नवा मार्ग दाखविला. गूढगुंजनात्मक कविता दिली. कांहीं उत्कृष्ट व उत्कट प्रेम गीतें दिली. संवादरूप नाट्यगीतें दिलीं. सावरकरांनीं इंग्रजीच्या Blank Verse च्या धर्तीवर मराठींत रचना केली व "वैनायक वृत्त" मराठीला सादर केलें. अनुष्टुभाचाही उपयोग त्यांनीं केला. हे सारे प्रयोग मराठीचा काव्यप्रांत समृद्ध करणारे असेच होते. केशवसुतांपासून निघालेली ही क्रांतिपरंपरा विकसित होत होत तिला एखाद्या विशाल वृक्षाचें स्वरूप आलें होतें. त्या झाडाखालीं बसलेल्या श्रांतांना सांवली

मिळत होती. सांत्वन मिळत होते. कुणाला प्रेम मिळत होते तर कुणाला प्रेरणा मिळत होती. कुणाला देशभक्ति शिकतां येत होती तर कुणाला सामाजिक अन्यायाविरूद्ध बंडखोरीची दीक्षा मिळत होती. कुणाला विनोद विडंबनातून हास्य मिळत होतें तर भग्न प्रेमाच्या कथा वाचून कुणी अश्रूंचे धनी होत होते. कुणीं "प्रौढत्वीं निज शैशव" जपण्याचा त्यांतून प्रयत्न करीत होते. मराठी काव्याच्या उद्यानांत ह्या विविधरंगी फुलांनीं मोहकता निर्माण केली होती. हें सारें खरें असलें तरी मराठी काव्याचा हा अश्वमेधाचा घोडा एका विशिष्ट परिघांतच फिरूं लागल्याची जाणीवही काव्य रसिकांना होऊं लागली होती. त्याच त्या विषयांत वैयक्तिक भावबंधनाच्या वर्तुळांत, त्याच त्या बाह्य वेषांत व त्याच त्या अलंकारांनीं काव्याचा शृंगार सजला जात आहे ही बोंचक जाणीव रसिकांना होत होती. कांहीं तरी नवें हवे होते. पण नेमकें नवें म्हणजे काय तें कळत नव्हतें. सांगतां येत नव्हतें. गवसत नव्हतें. आणि मग "मराठी काव्याला ओहोटी लागली आहे काय ?" ही ठरीव ठशाचीं प्रश्नचिन्हें असंख्य चेहऱ्यावर दिसूं लागलीं. शोध सुरूं झाला. अनेक उत्तरें येत होतीं आणि जात होतीं. पण हवें तें उत्तर मिळत नव्हतें. पण अखेर तें उत्तर अचानकपणें मराठी काव्य-रसिकाला गवसलें ! आणि तें उत्तर म्हणजे कुसुमाग्रज ! कुसुमाग्रजांची कविता ! !

## कुसुमाग्रजांची कविता

कुसुमाग्रजाची कविता हें वरील प्रश्नाला उत्तर होते हें म्हणण्याइतपत तिचें वेगळेंपण व वैशिष्ठ्य नेमकें कोणत्या गोष्टींत सांठवलेले आहे हें विस्तारानें पुढील भागांत पाहण्यासाठींच हा प्रपंच केला आहे. परंतु कुसुमाग्रजांच्या कवितेची एकंदर पार्श्वभूमी ध्यानांत घेतली तरी तिचें वेगळे-पण मनावर ठसते. केशवसुत म्हणजे तुतारी; बालकवि म्हणजे फुलराणी; गोविंदाग्रज म्हणजे प्रेम आणि मरण; तांबे म्हणजे मधुघट, सावरकर म्हणजे सागरास त्या प्रमाणेंच कुसुमाग्रजांचें नांव घेतांच "**क्रांतीचा जयजयकार**" ही त्यांची कविता चटकन डोळ्यांपुढें येते. ती कविता प्रसिद्ध झाली आणि वरील प्रश्नांचें उत्तर मराठी काव्यरसिकांना मिळालें. त्यापूर्वीं १९३२

सालींच ' **जीवनलहरी** ' ह्या काव्यसंग्रहानें कुसुमाग्रज मराठी काव्यरसिकांपुढें दाखल झाले होते ' जीवनलहरी ' ह्या काव्यसंग्रहांतही त्यांचें स्वतंत्र व्यक्तित्व व कवित्व दिसून येतें. कविवर्य तांबे व रविकिरण मंडळाचे कवि ह्यांचें काव्य मराठी काव्याच्या वाचकांपुढें असतांनाही ह्या कवीनें स्वतःसाठीं जें मानाचें स्थान पटकावलेलें दिसतें तें नेमकें कोणत्या कारणानें हें पाहिलें पाहिजे.

१९३०-३२ च्या सुमारास ह्या देशांत परकीय सत्तेविरुद्ध कायदेभंगाची चळवळ सुरूं झाली होती. सशस्त्र क्रांतीच्या प्रयत्नांतले अखेर अखेरचे प्रयत्न अयशस्वी झाले होते. भगतसिंग, सुखदेवादि मंडळी फांसावर गेली होती व ह्या वैयक्तिक हौतात्म्यांतली तेजस्विता जरी भारतीय मनाला मोहवीत होती तरी त्याचबरोबर त्यांतलें वैयर्थ्यही त्याला पटलें होतें. त्यामुळें व नव्या आशेनें तो महात्मा गांधींच्या अहिंसक आंदोलनाकडे कांहीं वेगळ्याच आशेनें व कुतूहलानें पहात होता. एक नवी राजकीय व सामाजिक जाणीव निर्माण होऊं लागली होती. केवळ वैयक्तिक सुखदुःखांच्या पलिकडे असलेला, दुःख, दैन्य व दास्यांत पिचलेला सारा समाज हा जणुं प्रत्येकाच्या व्यक्तिमनाला आवाहन करीत होता आणि म्हणूनच त्या काळाचें जणुं आवाहन व आव्हानच साऱ्या कवींना, कलावंतांना—साऱ्या समाजपुरुषालाच मिळालें होतें. ही नवी जाणीव त्या काळच्या कवींनीं स्वीकारलेली दिसते. केवळ वैयक्तिक भावभावना, सुखदुःखें यापेक्षां कांहीं सामाजिक व सामुहिक वेदना असूं शकते ही जाणीव तत्कालीन कवींना झाली. श्री. **अनंत काणेकर** यांच्यासारख्या कवीच्या कवितेंतही तिचा प्रत्यय आपणांस येतो. आपल्या " नवीं कवनें " ह्या कवितेंत काणेकर म्हणतातः—

नक्षत्रांचीं फुलाफळांचीं
कृष्णसख्यांच्या व्यभिचारांचीं
आणिक झुरत्या युवयुवतींचीं
खूप जाहलीं हीं रडगाणीं !
धनीजनांशीं झुंज खेळुनी
क्षणभर ज्यांना आली ग्लानी
त्यांना आम्हीं गाऊं गाणीं

ऐकुनि जीं चवताळुन उठतिल
आणि स्थापितिल सत्ता अपुली !

कविवर्य **बा. भ. बोरकर** ह्यांच्या **“ तेथें कर माझे जुळती ”** सारख्या कवितांतूनही बदलती जाणीव व्यक्त झालेली आढळून येते. ह्या काळांत कुसुमाग्रजांची कविता बायरन् आणि उमरखय्यामशीं आपलें नातें जोडून पहात होती.

एक करीं मधुगीतें
हात दुजा अन्य करीं
शीळ निशा वाजविते
चंद्रकला डोईवरी
पर्णांवर अर्ध फुलें
वाऱ्यांतुन गंध हले
स्वर्ग कुठें ? स्वर्ग कुठें ? स्वर्ग सखे, पृथ्वीवर !

*　　*　　*

निर्मळ शशिबिंब जळीं
बांसरि मधु एक करीं
दाट मरू भंवतालीं
जीव सखी शेजारीं
वैभव हें मनहारी
स्वर्गासहि ये न सरी
चषक अद्याप रिता—हंत ! कुठें मधुराणी ?

अशा भावकोमल वातावरणांत रममाण होणारा हा कवि ह्या उमेदवारीच्या काळांतही कांहीं ‘भावी’ व्यक्तित्वाची चमक दाखवतांना दिसतो. कलावंताचा सत्याचा, अनुभूतींचा शोध चालूच असतो. त्याची प्रारंभीची अस्थिर मनःस्थिति बदलत जाते. जसजसा तो अंतर्मुख होत जातो तसतसें त्याच्या काळांत त्याच्या उत्कट व समृद्ध बनलेल्या व्यक्तित्वाचा प्रत्यय येतो. जीवनलहरींत

आम्हीं संसृति दरिया
प्रीतीवर तरणारे

प्रीतीविण हो वांया
आम्हां हें जग सारें

असें म्हणणारे कुसुमाग्रज दुसऱ्या ठिकाणीं अगदींच वेगळ्या भूमिकेंत जाऊन म्हणतात

सोड अतां ओढूं नको
व्यर्थ जना जाळुं नको
प्रेमानें करशिल मम
जगण्याचें मातेरें

‘ **जीवनलहरीं** ’त व्यक्त होणारी ही भावना ‘ विशाखे’त्या प्रेम-गीतांतही दिसून येते

काढ सखे गळ्यांतील
तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलिकडे
उभे दिवसाचे दूत ॥
होतें म्हणूं स्वप्न एक
एक रात्र पाहिलेलें
होतें म्हणूं वेड एक
एक रात्र राहिलेलें ॥

ही जाणीव व्यक्त करणारा कवि “ **तरीही केधवां** ” ह्या कवितेंत हीच नवी जाणीव व्यक्त करतांना म्हणतो

संग्रामीं आजला । शोधतों जीवित
उरींचें ओघळ । दाबून उरांत

*  *  *

वादळीं रणांत । करणें कोठून
नाजूक भावांचें । लालनपालन

उमेदवारीच्या काळांतही ही नवी जाणीव कुसुमाग्रजांच्या कवितेंत व्यक्त झालेली दिसते. “ **विशाखा** ” ह्या संग्रहांतील केवळ प्रेमकवितेंतच ती व्यक्त झाली असें नव्हे तर सामाजिक, राष्ट्रीय कवितांतूनही व्यक्त झालेली दिसते. समाजांतील दैन्य, दास्य, विषमता, अन्याय याविरुद्ध कुसुमाग्रजांनीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ... दि. ...
क्रमांक ... दि. ...

तीव्र अशी प्रतिक्रिया काव्यांतून व्यक्त केली. ती करतांना त्यांच्या पाशीं असलेल्या **असामान्य कल्पकतेनें** त्यांना साथ केली.

कुसुमाग्रजांच्या कवितेंतून रूपकांचें जें असामान्य सामर्थ्य प्रगट झालेलें दिसतें तें त्या कल्पकतेमुळेंच ! ‘ आगगाडी आणि जमीन ’ अहिनकुल, हिमलाट, माळाचें मनोगत, पाचोळा, इत्यादि कवितांतून हें आपल्या प्रत्ययास येईल.

कुसुमाग्रजांच्या कवितेचें दुसरें वैशिष्ठ्य म्हणजे त्यांचें **प्रकाशपूजन** ! भव्य, दिव्य, उदात्त तेजाळ अग्निमय अशा गोष्टींचें त्यांच्या प्रतिभेला फार प्रभावी आकर्षण आहे. ‘ पृथ्वीचें प्रेमगीत ’ ह्या त्यांच्या सुप्रसिद्ध कवितेंतील प्रतीकात्मक पृथ्वी त्या तेजोभास्कराला म्हणते :--

नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे

‘ कोलंबसाचें गर्वगीत ” “ क्रांतीचा जयजयकार ” “ आव्हान ” “ मी जिंकलों ” इत्यादि कवितांतून हें दिसून येतें. ह्या प्रकाशपूजनानेंच कुसुमाग्रजांच्या नांवानें मराठी काव्यांत एक संप्रदाय म्हणून ओळखला जातो. ! अग्नि संप्रदाय, स्थंडील संप्रदाय, प्रकाशपूजक कवींचा संप्रदाय असें नामकरण त्या संप्रदायाचें झालेलें दिसतें !

‘ **उपरोधा** ’चें फार मोठें शस्त्र कुसुमाग्रजांनीं आपल्या कवितेंतून वापरलें आहे. “ **जा जरा पूर्वेकडे** ” “ **जालियनवाला बाग** ” “ **देवाच्या दारी** ”, **बळी** ह्या कवितांत ह्या शक्तीचा प्रत्यय येतो.

विषमता, गुलामगिरी, दारिद्र्य याविषयीं चीड व्यक्त करतांना कुसुमाग्रजांनीं **व्यक्त केलेला आशावाद हा** त्यांच्या वेगळेपणाची साक्ष पटवितो. “ हिमलाट ” ह्या कवितेंत कवि म्हणतो

ज्योतीतुंनि धावत या तेजःकण सारे
या यज्ञांतिल अन् सरणांतील निखारे
रे ढाळ नभा, तव ते ज्वालामय तारे
पेटवुं द्या वणवा कणकणांत मशाली
हिमलाट पहांटे पहा जगावर आली.

"क्रांतीचा जयजयकार" ह्या त्यांच्या कवितेंतील खालील ओळी म्हणजे अमर आशावादाचें महान स्तोत्रच !

कशास आई भिजविसि डोळे उजळ तुझे भाल
रात्रींच्या गर्भांत उद्यांचा असे उषःकाल
सरणावरती आज आमुची पेटतांच प्रेतें
उठतील त्या ज्वालांतुनि भावी क्रांतीचे नेते
लोहदण्ड तव पायामधले खळखळा तुटणार
आई, खळाखळा तुटणार--गर्जा जयजयकार ॥

कुसुमाग्रजांच्या काव्यांतील विविध काव्य-गुणांचा स्थूल स्वरूपानें परिचय आतांपर्यंत करून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचें स्थान आधुनिक मराठी काव्यांत काय आहे हें सांगण्याच्या हेतूनें हा प्रपंच केला आहे. त्यांच्या कवितेंतील **सामाजिक कविता, प्रेम कविता, राष्ट्रीय व देशभक्तिपर कविता व संकीर्ण** ह्या अनुक्रमानें त्यांच्या काव्याचें तपशीलवार रसग्रहण करण्याचा प्रयत्न पुढील लेखांतून केला आहे. त्यांतून कुसुमाग्रजांचें काव्यात्म व्यक्तिमत्व रसिक वाचकांना चांगलें परिचित होईल असा विश्वास वाटतो. आजही "कुसुमाग्रज" ह्या नांवानें मराठी काव्यरसिक फुलतो, मोहरतो, बहरतो आणि तृप्तही होतो. जीवनलहरी, विशाखा, किनारा, मराठी माती हे काव्यसंग्रह आपणांसमोर आहेत. विशाखेंतील कुसुमाग्रज 'किनाऱ्यांत' दिसत नाहींत अशी प्रेमळ तक्रार त्यांचे कांहीं चाहते करतात तर 'मराठी माती'च्या परीक्षणांत 'कवि अधिक व्यापक व सूक्ष्म व उत्कट' अशा भावविश्वाचा परिचय करून देण्याइतका चिंतनशील झाला असल्याची ग्वाही कांहीं ज्येष्ठ समीक्षक देते झाले आहेत. 'किनारा' ह्या काव्य संग्रहांतही कुसुमाग्रजांच्या बावनकशी सोन्याची साक्ष देणाऱ्या ताजमहाल, वैष्णव, आकाशित लहरी, दोन याचक, नव्हतें माहित, प्रीत पतंगाची, फेरीवाला, मेघांची सेना, बलिदान, मातीचा पुत्र ह्या सारख्या कविता 'कुसुमाग्रजांच्या कवितेंतील ओज, कल्पकता, प्रकाशपूजन, रूपकांवरील प्रभुत्व, असामान्य आशावाद इत्यादि श्रेष्ठ गुणांचा प्रत्यय घडवितात. ह्या त्यांच्या गुणांवरच रसिक मराठी वाचक लुब्ध झालेला आहे.

'विशाखें'तील कुसुमाग्रजांकडे वळण्यापूर्वी त्यांनींच मांडलेली त्यांच्या कवितेची भूमिका ध्यानीं घेऊन पुढें जाऊं या

समिधाच सख्या या, यांत कसा ओलावा
कोठून फुलापरि वा मकरन्द मिळावा ?
जात्याच रुक्ष या, एकच त्या आकांक्षा,
तव आंतरअग्नी क्षणभर तरि फुलवावा.

## —कुसुमाग्रजांची कविता—

## वैशिष्टयें

(१) प्रकाशपूजन–भव्य, दिव्य, तेजाळ गोष्टींचें आकर्षण.
(२) सामाजिक विषमता, दैन्य, दारिद्य याविषयीं चीड.
(३) मानवतेची पूजा.
(४) राजकीय स्वातंत्र्याबद्दल प्रीति.
(५) अमर आशावाद.
(६) असामान्य कल्पकता.
(७) रूपकांवर प्रभुत्व.
(८) वातावरण निर्मितीचें कसब.
(९) विरहांत व्याकूळता पण मीलनांत मात्र बेहोषी नाहीं.
(१०) स्वतंत्र कविता–( कोठल्याही कवीचा गंडा बांधलेला नाहीं ).
(११) चिंतनशील प्रवृत्ति.
(१२) शब्दचित्रांचें सामर्थ्य.
(१३) मानवतावादी कवि.

## २ : कुसुमाग्रजांची राष्ट्रीय-ध्येयप्रवण कविता

सामाजिक कवितेप्रमाणेंच राष्ट्रीय वा देशभक्तिपर कवितेचें जनकत्व मर्यादित अर्थानें कां होईना केशवसुतांकडेच जाते. अर्थातच केशवसुतांच्या कवितेंची ती प्रकृति नव्हती आणि म्हणूनच ' मर्यादित अर्थानें ' असा शब्दप्रयोग वर केला आहे. ' गोष्टी घराकडील ' मध्यें आपल्या भावाला उद्देशून ते म्हणतात.

बापू, गड्या ! ध्वज उभा करशील काय ?
तूं देशकारण करूं झटशील काय ?
बापू जनांत दिवटी धरिशील काय ?
स्वातंत्र्यदेव मनसा भजशील काय ?

" **कवितेचे प्रयोजन** ", ' **भारतीयाचे विचार** ' " गांवीं गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून " या सारख्या कांहीं कवितांतून या ना त्या रूपानें देशभक्तिपर विचार केशवसुतांनीं व्यक्त केलेले दिसतात. परंतु त्यावरून केशवसुतांची कविता देशभक्तिपर वा राष्ट्रीय होती असा निष्कर्ष काढणें योग्य होणार नाहीं. केशवसुतांचे समकालीन कवि विनायक ह्यांची कविता मात्र मुख्यतः राष्ट्रीय-देशभक्तिपर प्रवृत्तीची होती असें म्हणतां येईल. ही भावना कधीं इतिहासांतल्या वीर धीर पुरुषांचीं चरित्रें गाऊन तर कधीं स्पष्ट शब्दांत देशभक्ति ह्या भावनेला आवाहन करून त्यांनीं कविता लिहिली आहे. महाराष्ट्राचा पहिला चारण किंवा भाट असेंच कवि विनायकांचें वर्णन करतां येईल. त्यानंतरच्या कालखंडांत बालकवि, गोविंदाग्रज, टिळक, बी, रेंदाळकर, कविवर्य तांबे, साधुदास, यशवंत ह्या कवींनीं राष्ट्रीय भावना व्यक्त करणारी कविता लिहिली. परंतु जिला राष्ट्रीय कविता म्हणून म्हणतां येईल अशा कवितेचें वरील कवींच्या कवितेंतलें प्रमाण अल्प होतें असेंच म्हणावें लागेल. ही राष्ट्रीय कवितेची परंपरा अत्यंत प्रभावीपणें जोपासली स्वातंत्र्यशाहीर कवि गोविंदांनीं आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं ! राष्ट्रीय भावना प्रगट करण्याचें व जनजागरणाचें

कार्य प्रभावीपणें करण्याचें एक साधन म्हणून पोवाड्यांकडे पाहता येइल. शाहीर पांडुरंग दत्तात्रय खाडिलकर ह्या पदवीधर शिक्षकानें ही परंपरा जगवली. तिच्यांत तेल ओतलें आणि तिला अलिकडच्या राष्ट्रीय कवितेंत अग्रगण्य स्थान प्राप्त करून दिलें. कवि गोविंद हे अर्वाचीन मराठी काव्यांत यशस्वी झालेले राष्ट्रीय कवि म्हणून म्हणतां येतील. मित्रमेळ्यासाठीं म्हणून त्यांनीं गाणीं लिहिलीं असली तरी त्यांतली बरींचशी परकीय सत्तेच्या वरवंट्याखालीं आज अस्तंगत झाली. तरी पण " **रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें ?**" **टिळकांची भूपाळी**, मुरली, **सुंदर मी होणार**, **राष्ट्रसंत, प्रतिज्ञा** सारख्या त्यांच्या कवितांनीं त्यांचें नांव अमर केलें आहे.

त्यांचे गुरु व भारतीय स्वातंत्र्याचे उद्‌गाते स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर ह्यांची सारी कविताच मुळीं राष्ट्रीय कविता आहे. अंदमानच्या भिंतीवर कांट्यानें लिहून, मुखोद्‌गत करून नंतर कांहीं वर्षांनीं ती जनतेसमोर आली. त्यांच्या भव्योदात्त व्यक्तित्वाचा परिचय त्यांच्या माझें मृत्युपत्र, जगन्नाथाचा रथोत्सव, अनंताची आरती, सांत्वन, सागरास, ये मृत्यो ये, अनादि मी, या सारख्या असंख्य कवितांतून होतो. सप्तर्षी, कमला, विरहोच्छ्वास, मरणोन्मुख शय्येवर, मूर्ति दुजी ती, गोमांतक सारख्या प्रदीर्घ काव्यांतून त्यांच्यातल्या महाकवि ' चा परिचय आपणांस होतो. खानदेशांतील कवि दु. आ. तिवारी यांची कविताही सावरकरांप्रमाणेंच मुख्यतः राष्ट्रीय कविता होय ! " मराठ्यांची संग्रामगीतें, " शिवप्रताप महाराणा प्रतापसिंह, झांशीची संग्राम देवता इत्यादि त्यांच्या काव्य पुस्तकांचीं नांवें वाचलीं तरी तिची काव्यप्रकृति कशी राष्ट्रीय होती हें ध्यानीं येते. कै. सानेगुरुजी ह्यांच्या " पत्री " ह्या संग्रहांतही मुख्यतः देशभक्तिपर कविताच अधिक आढळते. कवि माधव ( मा. के. काटदरे ) ह्यांचाही उल्लेख एक यशस्वी राष्ट्रीय कवि म्हणूनच करायला हवा.

ह्या पूर्वसुरींचा मागोवा घेत कुसुमाग्रज काव्यक्षेत्रांत उतरले. अर्थातच नव्या काळांतली राष्ट्रीय कवितेची व्याप्ति ही फक्त मराठ्यांच्या इतिहासांतले समर प्रसंग रंगविणें ह्या विषयापुरतीच मर्यादित राहिली नाहीं. तिला एक व्यापक बैठक प्राप्त झालेली दिसते. सावरकरांच्या कवितेंतले तेजस्वी हुंकार हे वि. दा. सावरकर ह्या व्यक्तीचे उरले नाहींत तर त्यांना देशभक्तीची

व्यापक बैठक प्राप्त झाली. कुसुमाग्रजांचा जयजयकार ज्या कवितेमुळें झाला ती ' क्रांतीचा जयजयकार ' ही कविता अशाच एक सर्वस्पर्शी व सर्वव्यापी भूमिकेवर आपणांस घेऊन जाते. " डमडमच्या तुरुंगांत " अन्नसत्याग्रह करणाऱ्या देशभक्त वीरांची कहाणी कुठल्या तरी वृत्तपत्राच्या कचेरींत बातम्यांची भाषांतरें करीत असतांना व कांहीं मजकूर लिहीत असतांना कुसुमाग्रजांनीं वाचली आणि त्यांच्या संवेदनाक्षम कविमनावर ओरखडा उठला. त्यांतून " धारा रक्ताची ओघळली ", वेदना बोलली. रक्त पेटलें व धगधगणाऱ्या अंगारमय मनस्थितींत कवि लिहून गेला.

" गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार ।
अन् वज्रांचे छातीवरती घ्या झेलून प्रहार ॥

सावरकरांच्या ' अनादि मी, अजिंक्य मी, अवध्य मी भला । जिंकेल रिपु कवण असा जगतिं जन्मला ? ' ह्या कवितेंतला अदम्य विश्वास ह्या ओळींत व्यक्त झालेला आहे असें आढळून येईल. ह्या अदम्य विश्वासाच्या जीवावरच तो,

" खळखळूं द्या त्या अदय सांखळ्या हातापायांत । पोलादाची काय तमा मरणाच्या दारांत " असें म्हणतो. १९१० सालीं पन्नास वर्षांचीं जन्मठेपेची शिक्षा झाल्यानंतर सावरकरांनीं असे उद्गार काढले होते कीं " I am prepared to face ungrudgingly the extreme penalties of your Laws in the belief that it is through the sufferings sacrifices alone, that my Motherland can march on to an assured, though not speedy thriumph ! "

प्रत्येक देशभक्ताच्या मनाची हीच सिद्धता असावी लागते. ही जाणीव कुसुमाग्रजांना होती आणि म्हणूनच ते म्हणतात--

पदोपदीं पसरून निखारे आपुल्याच हातीं
होऊनिया बेहोष धांवलो ध्येयपथावरती
कधिं न थांबलों विश्रांतीस्तव, पाहिलें न मागें
बांधु न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे
एकच तारा समोर आणि पायतळीं अंगार

सारें व्यक्तित्व विलीन करून, सारी खंत मातेच्या मुक्तीची बाळगून, त्या वेडांतच बेहोष होऊन, ती पूजा हेंच जीवनाचें सारसर्वस्व मानून जेव्हां कांहीं असामान्य त्याग घडतो तेव्हांच वैभवाचा, तेजाचा, पराक्रमाचा इतिहास घडतो. तो घडवणारीं माणसें त्याच मातींतून उभीं राहतात. त्या सांडलेल्या थेंबागणिक सैनिक उभे राहतात आणि अपुरें कार्य पूर्ण करण्याची प्रतिज्ञा घेऊन कार्यरत होतात. कविवर्य तांबे ह्यांच्या ' धन तमीं शुक्र ' ह्या कवितेंत ते म्हणतात--

फूल गळे, फळ गोड जाहलें
बीज नुरे, डौलांत तरु डुलें
तेल जळे, बघ ज्योत पाजळे
का मरणिं अमरता ही न खरी ?

कुसुमाग्रजांच्या ह्या कवितेंत ते म्हणतात--

कशास आई भिजविसि डोळे उजळ तुझें भाल
रात्रींच्या गर्भात उद्यांचा असे उषःकाल
सरणावरतीं आज आमुचीं पेटतांच प्रेतें
उठतिल त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते.

बलिदानाशिवाय, त्यागाशिवाय, अपार कष्टाशिवाय कोणतीही क्रांति यशस्वी झाली नाहीं. ह्या काव्यांत व्यक्त केलेली भावना सर्वस्पर्शी आहे असें प्रथमच म्हटलें आहे तें याच अर्थानें ! क्रांतीचें शास्त्र बदलेल पण मंत्र बदलत नाहीं असें मानलें जातें ! ह्या कवितेंत पानोपानीं व्यक्त केलेला मंत्र असाच व्यापक, सार्वकालिक व सार्वदेशिक स्वरूपाचा आहे. प्रसाद, ओज, कल्पकता हे गुण ह्याही कवितेंत दिसतात. कुसुमाग्रजांच्या कवितेंतील अदम्य आशावादाचें महन्मंगल स्तोत्रच !

बलशाली मरणाहुन आहे अमुचा अभिमान !
मृत्युंजय आम्हीं ! अम्हांला कसले कारागार ?
अहो हे कसले कारागार ?

असें म्हणणारे कुसुमाग्रज—किंवा

भिंतीच्या उंचींत आत्मा राहतो कां कोंडुनी
मुक्त तो रात्रंदिनी

असें विचारणारे यशवंत ( तुरुंगाच्या दारांत ) किंवा

लोटि हिंस्र सिंहाच्या पंजरी मला
नम्र दाससम चाटिल तो पदांगुला
कल्लोळीं ज्वालांच्या फेंकिशी जरी
हटुनि भंवति रचिल शीत सुप्रभावती

ह्या ओळींत " आत्मबल " व्यक्त करणारे सावरकर ह्यांच्या कवितेमागचें जें मन आहे तें एकाच मुशींतलें आहे असें आपणांस वाटत नाहीं काय ?

" **जालियनवाला बाग** " चा नरमेध ह्या देशांतल्या प्रत्येक देशप्रेमी माणसाला माहीत आहे. जित आणि जेता ह्यांजमधील वैर किती पशुकोटीपर्यंत जाऊं शकतें ह्याचें मूर्तिमंत प्रतीक म्हणजे " जालियनवाला बाग " ! एका स्त्रीसाठीं ह्या पराक्रमी देशांत महाभारत घडलें. एका स्त्रीच्या अपमानासाठीं रामायण घडलें. सोन्याची लंका पेटली. जेत्यांच्या जातीच्या अशाच एका स्त्रीच्या अपमानाचा सूड घेण्यासाठीं असंख्य जितांची जिवंत कत्तल झाली हें कानींकपाळीं ओरडून सांगण्यासाठीं घडलें तें जालियनवाला बाग ! येशूच्या प्रेषितांनीं प्रेम, शांति क्षमेचा घोष करीत केलेली कत्तल म्हणजे जालियनवाला बाग ! हा विषय कुसुमाग्रजांच्या सारख्या तेजाळ व्यक्तित्वाच्या कवीला न फुलवील तरच नवल ! ह्या कवितेंत कवीनें जालीम उपरोधाचा उपयोग केला आहे. कवितेची सुरुवातच मुळी उपरोधांतून होते

रक्ताचे नच ओघळ सुकले, अजुनी क्रुसावरचे
विरले ना ध्वनि तुझ्या प्रेषिता, अजुनी शब्दांचे

तुझ्या गीतांचा जयजयकार होत असतांना इकडे मात्र—

आणि आज हे तुझ्या पताका ज्यांच्या हातांत
निःशस्त्रांच्या रक्तामांसामधें वाहतात !
मर्दांच्या बंदुका उडाल्या मुलाबायकांत
जगजेत्यांच्या पराक्रमाची स्फूर्तिप्रद रीत ।

ही प्रेतांची रास पडलेली पाहून तूं सुद्धां डोळे झांकले असशील असा विश्वास व्यक्त करून अखेर सैतानानें प्रत्यक्ष प्रभूवर केलेली मात असेल पण तुझ्या शरिरावर केलेल्या असंख्य जखमांत तुझ्याच नांवाचा आणि प्रेम,

शांति, क्षमेचा जयजयकार करणारांनींच एक नवीन जखम करून ठेवली आहे असें कवि शेवटीं म्हणतो. शिवरामपंत परांजपे हे वक्रोक्तिपूर्ण लेखन करणारांतले अग्रेसर मराठी लेखक ! त्यांच्या बोंचऱ्या, धारदार लेखणीची आठवण आपणांस वरील कविता वाचतांना येते. मोठमोठीं तत्वें नेहमींच उच्चारलीं जातात पण व्यवहारांत मात्र तीं उच्चारणारीं माणसेंच ती पायतळीं तुडवितांना दिसतात. ह्या वेदना मला फार जाणवतात. वरील कवितेंतल्या उपरोधांतून हीच वेदना बोलकी झाली आहे. आम्हांला तर जखमा झाल्याच ! पण येशूच्या काळजांत जी जखम झाली वा त्याच्याच अनुयायांनीं केली त्या जखमेच्या वेदनांची तीव्रता कधीं ह्या तथाकथित शांतिदूतांना जाणवणार आहे कीं नाहीं हाच प्रश्न कवि पुढें मांडतो आहे.

**जा जरा पूर्वेकडे** ह्या कवितेंतही पुनश्च हीच वेदना बोलते--बोलते तीही उपरोधाच्याच भाषेंत ! चिनी-जपानी युद्धांत चाललेले राक्षसी अत्याचार या कवितेंत अभिप्रेत आहेत असें कवि म्हणतो. असंख्य प्रेतांचा संहार करण्याची संधि मिळाली असतांना क्षुद्र अशा इच्छा मनांत काय म्हणून बाळगतां ? असंख्य प्रेतांचा प्रसाद सादर करण्यासाठीं तेथें काय चाललें आहे याचें वर्णन करतांना कवि म्हणतो--

तेथ देखा आग वेगानें विमानें वर्षती
थोर शास्त्रांची गती
धूळ आणि अग्नि यांच्या दौलती चोहींकडे
जा जरा पूर्वेकडे !

विज्ञानाचा उपयोग माणूस विकासाऐवजी जर विनाशाकडे करूं लागला तर मग तो पशुकोटीकडे झुकतो. त्याच्या अंतःकरणांतली मानवता करपते असा अनुभव आहे. आज मनुष्य विज्ञानाची जी शर्यत लढतो आहे ती सुद्धां ह्याच कांक्षेनें ! आणि म्हणून आजही तो साऱ्यांच्या चिंतेचा विषय झाला आहे. " थोर शास्त्रांची गती " असें म्हणून कुसुमाग्रजांनीं ह्या घटनेचा उपरोधिक उल्लेख केला आहे. ह्या मानवसंहारांत सामान्य नीतिसुद्धां कशीं पायतळीं तुडविलीं जाते याचें भयानक चित्र कवि रंगवितो.

खड्ग लावूनी उराला बायकांना वेढती
आणि दारीं ओढती

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ११४३५
ग्रंथ शाखा (स्थान)

भोगती बाजार–हाटीं मांस आणि कातडें !
जा जरा पूर्वेकडे
आर्त धांवा आइचा ऐकून धावे अर्भक
ना जुमानी बंदुक
आणि लोंबे संगिनीला छान छोटें आंतडें !
जा जरा पूर्वेकडे !

ह्या संहारानंतर प्रत्येक वेळीं " शांतता ! शांतता ! ! " असा जयघोष ही युद्धपिपासा–तृप्त झालेली मंडळी करीत असतात. त्याचा औपरोधिक उल्लेख करतांना कवि म्हणतो

आणि येतांना पवाडे संस्कृतीचे गा जरा
डोलुं द्या सारी धरा
मेघमालेंतून आम्हां शांततेचे द्या धडे

१९३८ सालीं ही कविता लिहिली आहे. पण आजही ही समस्या कायम आहे ! यशवंतांच्या " जमेचि ना घडेचि ना " ह्या " युगंधराच्या पालुपदांत " हीच खंत वाचाळ झाली आहे।

" **सात** " ही कविता व " **पावनखिंडींत** " ही कविता ह्या दोन्हीं कविता मराठ्यांच्या इतिहासांतील दोन सुवर्णपानांवर आधारलेल्या असल्या तरी त्यांची निवड करण्यांत कवीची प्रकाशपूजक प्रवृत्ति दिसून येते. पहिली कविता शिवरायांचा सेनापति प्रतापराव गुजर ह्याच्या एका पराभवाच्या पार्श्वभूमीवर आधारलेली आहे त्याचा पराभव झाल्यावर तो रणांतून पळाला. ही वार्ता शिवरायांच्या कानांवर पडल्यावर त्यांनीं त्याची निर्भत्सना करणारें पत्र धाडलें. त्या पत्रांतला ध्वनि समजण्याइतकी बुद्धि व त्या शब्दांना वेदवाक्य मानणारी निष्ठा प्रतापराव गुजराजवळ व त्याच्या सहा सैनिकाजवळ होती म्हणूनच कलंक धुवून काढणारा अतुल पराक्रम त्यांच्या हातून घडला. ह्या कवितेंतला पत्रात्मक भाग सुंदर साधला आहे.

" श्रुति धन्य जाहल्या श्रवुनी अपुली वार्ता
रण सोडुनि सेवासागर अमुचे पळता
अबलाहि घरोघर खऱ्या लाजतिल आतां !
भर दिवसां आम्हां दिसूं लागली रात "

हें कठोर अक्षर वाचीत असतांना प्रतापरावांची जी स्थिति झाली त्याचें वर्णन सुंदर शब्दचित्रात्मक पद्धतीनें कवीनें केलें आहे. कुसुमाग्रजांच्या कल्पकतेचाही प्रत्यय ह्यांतील खालील ओळी घडवितील.

" ढग ज़ात धुळीचे दूर क्षणीं क्षितिजांत "
" खग सात जळाले अभिमानी वणव्यांत "
" दगडांवर दिसतिल अजुनि तेथल्या टांचा
ओढ्यांत तरंगे अजुनि रंग रक्ताचा
क्षितिजावर उठतो अजुनि मेघ मातीच
अद्याप विराणी कुणि वाऱ्यावर गात

सन्मानासाठीं मान देणाऱ्या मानधन मराठ्याचें कवीनें काढलेलें हें मानचित्र मोहवील आणि प्रेरणाही देईल. "**पावनखिंडींत**" ह्या कवितेंत प्रयत्नांचीं शिकस्त करून खिंड लढविणाऱ्या बाजीप्रभु देशपांडे ह्याच्या मनाची आर्तता कवीनें केली आहे. असामान्य पराक्रम करून

" होय तनूची केवळ चाळण
प्राण उडाया बघती त्यांतुन
मिटण्या झाले अधीर लोचन
खड्ग गळाले भूमिवरी
सरणार कधीं रण प्रभू तरी

अशी अवस्था आल्यानें व तोफांचा आदेश न मिळाल्यानें आर्तपणें आपल्या यातना व्यक्त करणारा बाजी देशपांडे ह्या ठिकाणीं आपणांस भेटतो. मरतांनाही त्याची खंत

" शरणागतिचा अखेर ये क्षण " ही आहे हें ध्यानीं घेण्यासारखे आहे.

"**टिळकांच्या पुतळ्याजवळ**" ही कविता केवळ टिळकांच्या व्यक्तित्वाचा आपणांस परिचय करून देऊन संपत नाहीं तर जीवनाचा फार मोठा अर्थ विशद करून ती संपते.

अंतःकरणांत उद्दाम निराशेचें तांडव चालू आहे थकलेल्या मनानें आपण वाळवंटांत आपलें डोकें टेंकवून बसलों आहोंत. एखाद्या जीर्ण गडांत ज्याप्रमाणें वादळ वारा अनिर्बंध संचार करतो किंवा सांदीत बसून

रातकिड्यांची सेना ज्याप्रमाणें सतत आक्रोश करीत निनादत असते, तद्वतच मनांतलें भीषण तांडव मनाला हतबल करीत आहे. अशा उद्दाम निराशेनें मन व्याकुळलेलें असतांना लोकमान्य टिळकांच्या पुतळ्याकडे लक्ष जातें आणि मग मनांतलें तांडव शांत होतें. निराश, उदास मनाला आशेचा, तेजाचा, पराक्रमाचा संदेश तो पुतळा जणुं देत आहे. हें सांगतांना कवि म्हणतो

क्षण एक आणला शान्त गल्बला झाला
ओसरतां वारा जशी स्थिरावे ज्योति

टिळकांच्या कणखर व्यक्तित्वाचा पुढें परिचय करून देतांना कवीच्या कवित्वाला अधिक मोहकता प्राप्त झाली आहे

ती कणखर मूर्ति धीट मराठी थाट
आदळतो जीवर अजून पश्चिम-वात,
ती अजिंक्य छाती ताठर अन् रणशील
जी पाहुन सागर थबके, परते आंत !

ह्या वर्णनांत टिळकांच्या नेतृत्वाचे सर्व विशेष येऊन जातात. "पश्चिम वात" ह्या शब्दांत पश्चिमाभिमुखी तो पुतळा आहे म्हणून 'पश्चिम वात' असें म्हटलें असेलसें वाटत नाहीं. तर त्यापेक्षां व्यापक अर्थ आहेसें वाटतें. तो म्हणजे पश्चिमेकडील तत्वज्ञान सतत ह्या माणसाला पराभूत करण्याचा यत्न करीत आहे. परंतु ह्या कणखर व्यक्तित्वाच्या माणसाचा पराभव करणें त्याला शक्य झालें नाहीं—सागरालाही ज्याच्या व्यक्तित्वाची जरब आहे. ह्याचा अर्थ सागराहूनही विशाल, अथांग सागरासारखेंच रत्नाकर व्यक्तित्व टिळकांजवळ होतें हें कवि सूचित करतो.

हताश, निराश जीवांना हातीं धरून विजयाचा ध्वज उत्तुंग चढविण्याची कांक्षा धरणारें टिळकांचें जीवन हें खऱ्या अर्थानें जीवन होय. बाकीच्या आम्हां साऱ्यांचें जीवन म्हणजे 'जीवितभास' होय असें कवि म्हणतो. हा जीवितभास कां ह्याचें यथार्थ वर्णन करतांना कवि म्हणतो—

कण क्षुद्र घेऊनी सुखदुःखांचें हातीं
धांपावत आम्हीं जीवनमार्गावरती,

पर्णांपरि वाऱ्यावरती हलतो, डुलतो
जों धुळींत लाभे अखेरची विश्रांती !

आमच्या सामान्य जीवनांत आमच्या सुखदुःखाच्या कल्पना सुद्धां, क्षुद्र, सामान्य ! त्या सामान्य व क्षुद्र अशा सुखदुःखांसाठीं सुद्धां प्रयत्नशील राहतांना आम्हीं दमतो, थकतो, धापावत जातो. तें करतांनाही झाडाच्या पानांना सुद्धां जशी स्वयं-गति असत नाहीं तद्वतच आमचें जीवनही स्वयं-गतिमान असत नाहीं. वारा येईल तशी पाठ फिरवीत " **जों धुळींत लाभे अखेरची विश्रांती** " आम्हीं असें प्रवाहपतित जीवन जगत असतो आणि तरीही आम्हीं " जीवन " जगतों आहोंत असा अहंकार आम्हीं मिरवीत राहतो. कुसुमाग्रज मात्र ह्याला जीवन म्हणायला तयार नाहींत. ते म्हणतात ही तर मरणांची माला आहे. जीवन हें स्वयंचलित असावें लागतें. जीवन हें जगण्याच्या जिद्दीनें जगलें तरच त्याला जीवन म्हणतां येईल. मृत्यु येत नाहीं म्हणून जें जगलें जातें तें जीवन नव्हे आमची ही धडपड म्हणजे कशी तर

मासोळी झटते तोडायास गळाला,
दर्यावर वाहे दुभंगलेली नाव
क्षण खालीं वरती, क्षणांत आणि तळाला

ह्या कवितेंत जीवनाचा व्यापक, उदात्त, हेतु कवीनें स्पष्ट केलेला आहे. तुलनेसाठीं समर्पक उपमा त्यानें घेतल्या आहेत. मासोळीची जीवनाची धडपड जितकी केविलवाणी, तितकीच दुभंगलेल्या नावेची ' जीवनासाठीं ' चाललेली धडपड कें विलवाणी आहे-असते. ती नाव जशी क्षणांत खालीवर आणि मग क्षणांत ती तळाला जाते तद्वतच आमच्या जीवनाचे सारे चढउतार अखेर 'धुळींत चिर विश्रांति' लाभेपर्यंत चालू असतात. जीवनांत स्वयंप्रेरणा नसेल, चैतन्य नसेल, अदम्य मनीषा नसेल, कणखर व्यक्तित्व नसेल, संघर्षावर मात करण्याची विजिगीषु भावना नसेल तर तें जीवन नव्हेच असा एक तेजस्वी प्रेरक संदेशच कुसुमाग्रज ह्या कवितेच्या द्वारा काव्य-रसिकांना देत आहेत. ह्याही कवितेंत पृथ्वीच्या प्रेमगीताप्रमाणेंच

परी भव्य तें तेज पाहून पुजून
घेऊं गळ्याशीं कसे काजवे ?

नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे

हा दिव्यत्व-पूजक भाव व्यक्त करतांना दिसतात. हेंच प्रकाशपूजन, हीच भव्य, दिव्य गोष्टींबद्दलची प्रीति त्यांच्या **कोलंबसाचें गर्वगीत** ह्या कवितेंत आपणास आढळून येतें. कोलंबस हें एका असामान्य जीवननिष्ठेचें प्रतीक आहे. केशवसुतांच्या ' झपूर्झा ' ह्या कवितेंत म्हटल्याप्रमाणें

ज्ञाताच्या कुंपणावरून
धीरत्व धरून
उड्डाण करून
चिद्घन चपला जी जाते
नाचत तेथें लखलखते
अंधुक आकृति तिस दिसती
त्या गाताती निगूढ गीती

ह्या निगूढ गीतींचा अन्वयार्थ लावण्याची कांक्षा धरणाऱ्याची ' झपूर्झा ' मनोवृत्ति कोलंबसाचें ठिकाणीं होती. आणि म्हणूनच कोलंबसाला कांहीं ' नवें जग ' दिसलें. असामान्य स्वप्नं पाहणारा आणि त्यासाठीं

मार्ग आमुचा रोधूं शकती, ना धन, ना दारा
घराची वा वितभर कारा

असें म्हणणारा कोलंबस हा कविमनाला असामान्य ध्येयवाद्यांचें प्रतीक वाटतो. ' प्रतिकूल तेंच घडेल ' असें मानून जे ध्येयवादी जीवनाची बाजी खेळतात त्यांना ' मृत्युंजय ' पद प्राप्त होतें. प्रस्तुत काव्यांतला कुसुमाग्रजांचा कोलंबसही प्रारंभींच्या चार कडव्यांत सर्व महान संकटांना जणुं आव्हान देतांना दिसतो. हें सर्व प्रतिकूल घडणारच हें आपण गृहीतच धरून प्रवासाला निघालों आहोंत असें तो आपल्या सहकाऱ्यांना बजावतो. प्रतिकूल परिस्थिति आली म्हणून खंत बाळगण्याचा अधिकार नाहीं आपल्याला, कारण ध्येयवाद्यांचा मार्ग हा नेहमीं कांट्याकुट्यांनीं भरलेला असतो. हें सांगतांना म्हणतो--

सहकाऱ्यांनो कां ही खंती, जन्म खलाशांचा
झुंजण्या अखंड संग्राम-

काय सागरीं तारूं लोटलें परताया मागें
असे कां हा अपुला बाणा
त्याहून घेऊं जळीं समाधीं सुखें, कशासाठीं
जपावें पराभूत प्राणा !

हें म्हणणारा कोलंबस, ‘ सात ’ कवितेंतील प्रतापराव गुजर, ‘ पृथ्वीचें प्रेमगीत ’ मधील पृथ्वी, टिळकांच्या पुतळ्याजवळ मधील ‘ हें जीवन कसलें, ही मरणांची माला, म्हणणारा कवि ह्या साऱ्या व्यक्तिरेखा एकाच मुशींतून काढलेल्या आहेत ह्याचा साक्षात्कार आपणांस घडतो. ‘ मरणांच्या मालें ’ तील आपण नाहीं ह्याचा आत्मविश्वास कोलंबसाला होता आणि म्हणून कोलंबस म्हणतो,

कोट्यवधी जगतांत जिवाणू जगती अन् मरती
जशीं तीं गवताचीं पातीं,
नाविक आम्हीं परंतु फिरतों सात नभाखालीं
निर्मितो नव क्षितिजें पुढतीं !

ध्येयवाद्यांचा हा प्रवास सात नभाखालीं म्हणजेच जीवनाचा विशाल अनुभव घेत घेत चालूं आहे—असतो. कारण विशाल अनुभूतींतूनच नव्या जगाचा साक्षात्कार त्यांना घडत असतो आणि मग सामान्यांना ‘ **तीं नवीं क्षितिजें** ’ ज्ञात होतात. असे दीपगृह समाजांत असतात म्हणूनच सामान्यांचा जीवनप्रवास बराचसा सुकर होतो हें सत्य आहे. हा कुसुमाग्रजांचा कोलंबस अखेर मानवतेचा महान पुजारी आहे. कारण तो म्हणतो––

मानवतेचें निशाण मिरवूं महासागरांत
जिंकुनि खंड खंड सारा.

खंड खंड जिंकून मानवतेच्या निशाणाखालीं आणण्याची जिद्द बाळगणारा कोलंबसच रास्त अभिमानानें म्हणूं शकतो––

चला उभारा शुभ्र शिडें तीं गर्वानें वरती
कथा या खुळ्या सागराला
“ अनंत आमुची ध्येयासक्ति अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला. ”

कुसुमाग्रजांच्या क्रांतीच्या जयजयकारांतली ओजस्विता ह्या कवितेंत प्रत्ययास येते. प्रखर ध्येयवादाला जणुं मानवंदनाच कवीनें दिली आहे.

' **नेता** ' ह्या कवितेंत महात्मा गांधींचें प्रत्यक्ष नांव जरी घेतलें नसलें तरी त्या कवितेचा आशय गांधीजींवरच केंद्रित झाला आहे ही गोष्ट ध्यानीं येते. १९३२ सालीं ह्या कवितेंत व्यक्त केलेला आशावाद कवीचें द्रष्टेपण सिद्ध करतो.

येइल उदया सोन्याचा दिन
तुटेल हें पोलादी बंधन
दिसतिल अगणित देव्हाऱ्यांतुन
तुझ्याच रे प्रतिमा

पण हें करतांना आमच्या नेत्याची भूमिका मात्र केवळ विशाल मानवतेची होती. सामान्यांना स्पर्श करतांच असामान्यत्व देण्याची किमया नेत्याचे ठिकाणीं होती असें कवि मानतो. त्या नेत्याचें व्यक्तित्व किती विशाल आणि व्यापक होतें याची प्रचीति कवीच्या खालील ओळींतून व्यक्त केली आहे.

तव घर धरती, दौलत कांबळ
सुमनाचें मन, वज्राचें बळ
ध्येयसाधनाला केवळ
क्षितिजाच्या सीमा

कोलंबसाच्या गर्वगीतांत आपल्याला भेटलेला ध्येयवादी कोलंबस ह्या ठिकाणीं नेत्याच्या रूपानें भेटतो असें वाटतें. गांधींच्या जीवनाचें इतकें यथार्थ, इतकें संयमित दर्शन मराठींत फार थोड्यांनीं केलेलें आढळेल. त्या कार्याच्या आजच्या फलिताबाबत कदाचित मतभेद संभवतील. परंतु ह्या खंडप्राय देशांत सामान्यांतल्या सामान्य माणसांतली अस्मिता फुलविण्याचें कार्य गांधीजींच्या कार्ययंत्रणेंतून घडलें ही गोष्ट नाकारणें कठिण जाईल. ह्याचें सुंदर वर्णन करतांना कवि म्हणतो—

अगाध किमया तुझिया हातीं—
फुलविसि पाषाणांतुन ज्योती

रजःकणावर ये स्पर्शें ती
रत्नांचीच कमा !

समर्पक उपमांनीं ह्या कवितेचें सौंदर्य खूपच वाढलें आहे.

"**आव्हान**" ह्या कवितेंतली भावना, जिद्द "क्रांतीचा जयजयकार, कोलंबसाचें गर्वगीत इत्यादि कवितांत व्यक्त केली गेली आहे. ज्योतीनें ज्योत पेटते, बलिदानानें बलिदानाची ईर्षा पेटते, त्यागानें त्याग वाढत जातो असा अनुभव आहे विशेषतः बळीचें बलवन्तांना दिलें जाणारें आव्हान नेहमीं त्यागावर, बलिदानाच्या इर्षेवर निर्भर असते. गोमंतकाला पांच वर्षांपूर्वी दिलेलें आव्हान हें बळीचें बळवंतांना दिलें गेलेलें आव्हान होतें. त्या संग्रामांत ही बलिदान प्रवृत्ति दिसून आली. सेनापति बापट व ना. ग. गोरे ह्यांच्या हालासंबंधींच्या वार्ता वृत्तपत्रांत वाचून हें आव्हान जणुं असंख्य बळींनीं स्वीकारलें आणि लौकिक दृष्ट्या तो संग्राम अयशस्वी झाला असला तरी प्रस्तुत कवितेंत म्हटल्याप्रमाणें तनु रक्तानें न्हाल्यानंतर व छाती पिंजून गेल्यानंतर सुद्धां ही मृत्यूशीं झुंज घेणाऱ्यांच्या मनांत असाच विचार आला असेल

लवहि न आशंका
परंतु लवहि न आशंका
समर पुकारित राहिल जित हा रणशाली डंका !

पांच वर्षांपूर्वीं असंख्य बळींनीं व्यक्त केलेला आत्मविश्वास आजच्या गोवा, अंगोला इत्यादि भागांतल्या धुमसणाऱ्या अग्नीच्या साक्षीनें खरा ठरला आहे असेंच म्हणतां येईल.

# ३ : कुसुमाग्रजांची सामाजिक कविता

मराठींत ' सामाजिक कविता ' या नांवानें संबोधली जाणारी मराठी कविता प्रथम लिहिण्याचा मान महाराष्ट्राचे आधुनिक काव्यक्रांतीचे जनक केशवसुत यांजकडे जातो. स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व ह्या तत्वत्रयींचा महाराष्ट्रांत उद्‌घोष आगरकरादि सुधारक विचारांच्या नेत्यांनीं व विचार-वंतांनीं केला व ह्या नवविचारांनीं तत्कालीन महाराष्ट्राला प्रचंड वैचारिक धक्के देण्यास सुरवात केली. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा पुनरुज्जीवनवादावर विश्वास होता तर आगरकर वगैरेंचें म्हणणें असें होतें कीं, जुने बुरसटलेले, समाजाच्या हिताला बाधक असलेले असे विचार गाडून पुरून टाकले पाहिजेत, जुन्या रूढींना मूठमाती दिली पाहिजे. स्त्री पुरुष समानतेवरही त्यांची श्रद्धा होती. आणि सामाजिक जीवनांत समतेचें तत्व लोकमान्य झालें पाहिजे यासाठीं एक वैचारिक व आचारविषयक क्रान्ति बद्धमूल करण्याचा या ' विचारवंतांनीं ' प्रयत्न केला. ह्या वैचारिक क्रांतीचा काव्यद्वारां पुरस्कार कविवर्य केशवसुत ह्यांनीं प्रथम केला. केशवसुतांना दिलें जाणारें क्रांतिकारकत्व हें अनेक अर्थांनीं दिलें जात होतें, दिलें जातें. नवी स्वतंत्र, स्फुट, सामाजिक राष्ट्रीय विचारांनीं भरलेली निसर्ग, प्रीति, कुटुंब जीवन, या विषयांत ही अवगाहन करणारी गूढगुंजनात्मक अशा विविध प्रकारची व प्रकृतीची कविता त्यांनीं मराठीला प्रथम दिली आणि म्हणून ते पहिले क्रांतिकारक कवि ठरले. अर्थातच तो काळ ध्यानीं घेतला व तत्कालीन धार्मिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती ध्यानीं घेतली तर त्यांच्या कवितेंत सामाजिक आशय असलेली कविता संख्येनें कमी आहे याबाबत आरोप घेण्याचें वा खंत करण्याचें कारण उरणार नाहीं. कामगार व हरिजन हा आम्च्या समाजांतला चिरंतन चिंतेचा विषय ! आज अनेक फायदे होऊनहि ह्या दोन वर्गांबाबतची समाजाची चिंता कांहीं कमी झालेली दिसत नाहीं. केशवसुत ह्यांच्या कवितेंत **' अंत्यजाच्या मुलाचा प्रश्न '** किंवा **' मजुरावर उपासमारीची पाळी '** इत्यादि खास सामाजिक व **' स्फूर्ति '** व **' तुतारी '** सारखी रूढाभजनाची वा जुनें तेवढें गाडून

टाकण्याचा संदेश देणारी कविता त्यांनीं गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत लिहिण्याचें धाडस दाखविलें ही गोष्ट त्यांच्या विषयींचा आदर द्विगुणित करते. त्यांच्या मागोमाग अनक कवींनीं शंख फुंकले आणि त्यांनीं पुरस्कारिलेल्या क्रांतीचीं पावलें स्थिर केली. सामाजिक आणि राष्ट्रीय स्वरूपाची विपुल कविता मराठींत लिहिली जाऊं लागली. परंतु ह्या साऱ्या काव्यप्रवाहांत आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कवितेनें ज्यांनीं आपलें यशाचें निशाण स्थिर ठेवण्याचा किंबहुना उंच नेण्याचा प्रयत्न केला त्यांत कवि कुसुमाग्रज यांचा क्रम बराच वरचा लागेल. कुसुमाग्रजांची कविता मराठी वाचकांपुढें आली तीच मुळीं '**क्रांतीचा जयजयकार**' करीत ! 'मानवतेचा कवि' म्हणून गौरविला गेलेला हा कवि सुरुवातीसच आपल्या काव्याची भूमिका स्पष्ट करतांना म्हणतो, "समिधाच सख्या या, यांत कसा ओलावा, कुठून फुलापरि वा मकरंद मिळावा ? जात्याच रुक्ष या, एकच त्या आकांक्षा, तव आंतर अग्नी, क्षणभर तरी फुलवावा. !"

आपल्या काव्याची ही बैठक तो सुरुवातीसच स्पष्ट करतो. आणि मग त्याच्या काव्याला जी धार चढते, जें तेज चढतें, जी दाहकता प्राप्त होते तिचा प्रत्यय वाचकांना मिळतो.

कुसुमाग्रजांच्या सामाजिक कवितेचा विचार करतांना त्यांच्या सामाजिक काव्यामागील भूमिकेचा प्रथम परिचय करून घेणें आवश्यक आहे. 'विशाखां'-तल्या सामाजिक कवितांचा मागोवा घेतच या बाबतींतलें उत्तर शोधणें भाग आहे. मानवी जीवनास ओतप्रोत भरलेली विषमता, उच्चनीच भेद, आर्थिक दैन्य आणि त्यापायीं निर्माण होणाऱ्या विविध समस्या, आणि दांभिकता या बाबत त्यांच्या मनांत तीव्र चीड वसत आहे. केशवसुत ज्या थाटांत 'स्फूर्ति' '**देव दानवां नरें निर्मिलें। हें मत लोकां कळवूं द्या**' असें म्हणतांना दिसतात. त्याच थाटांत कुसुमाग्रज 'देवाच्या दारीं' ह्या कवितेंत म्हणतात

आणि आज मन–शंकित हें होई
आहेस कीं नाहीं–मुळांत तूं
भित्या भावनेला–शोधावयासी धीर
पाषाणास थोर–मीच केलें.

माझ्या जीवनाचा मीच शिलेदार
व्यर्थ हा पुकार–तुझ्या दारीं

कुसुमाग्रजांच्या सामाजिक कवितेंत एक प्रकारची दाहकता आहे. तुकाराम–नामदेवांचा रोखठोकपणा त्यांच्या काव्यांत आहे.

काढ सखे गळ्यांतील
तुझे चांदण्याचे हात

ह्या कोमल आणि कल्पनारम्य ओळी लिहिणारा कवीच खालील ओळी लिहितांना आढळतो,

मार्ग आमुचा रोधूं शकती ना धन, ना दारा
घराची वा वितभर कारा
मानवतेचें निशाण मिरवूं महासागरांत
जिंकुनी खंडखंड सारा
चला उभारा शुभ्र शिडें तीं गर्वानें वरती
कथा या खुळ्या सागराला
" अनंत असुची ध्येयासक्ति
अनंत अन् आशा,
किनारा तुला पामराला । "

चिनी जपानी युद्धाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या कवितेंतच जालीम उपरोध किती सार्वकालिक व सार्वत्रिक ( Universal ) स्वरूपाचा आहे याचा प्रत्यय चीन-भारत, अमेरिका, रशिया यांच्या चालू राजकारणाच्या घडामोडींकडे लक्ष दिलें असतां ध्यानीं येईल. ' पंचशीले'ची घोषणा करीत आक्रमक ' साम्यवाद ' जीं पावलें टाकीत आहे त्यांना उद्देशूनच जणुं कवि म्हणतो

आणि येतांना पवाडे संस्कृतीचे गा जरा,
डोलुं द्या सारी धरा,
मेघमालेंतून आम्हां शांततेचे द्या धडे ।
जा जरा पूर्वेकडे ।

कवि यशवंत यांच्या " युगंधराचें पालुपद " या कवितेचीही या संदर्भांत आठवण व्हावी.

कुसुमाग्रजांच्या सामाजिक कवितेतील विचार मुख्यतः रूपकांच्या आधारें व्यक्त झालेला आपल्याला पहावयास सांपडतो. **हिमलाट; आगगाडी आणि जमीन; जा जरा पूर्वेकडे; माळाचें मनोगत; पाचोळा; बंदी;** हीं त्यांचीं प्रमुख रूपकें आपण वरवर चाळलीं तरी आपल्या ध्यानीं त्यांतला सामाजिक आशय आल्याशिवाय राहणार नाहीं. '**हिमलाट**' ह्या कवितेंत कवि म्हणतो,

श्रीमंत महालीं तीथें हिला ना थारा
मखमाली दुलया देती मधुर उबारा
डोकावून पळते कांपत हीच थरारा
हो काय दरारा कनकाचा भयशाली ॥
हिमलाट पहांटे पहा जगावर आली ॥
पाहून परंतु कुठें कुडाचीं खोपी
कंगाल कांबळीं टाकुनी गेली झोंपी
शेंकडों कवाडें!' वाट जावया सोपी
कडकडून पडते तेथें लांब भुकेली
हिमलाट पहांटे पहा जगावर आली ॥

ह्या परिस्थितींत भांबावून जाऊन वा केवळ चीड व्यक्त करीत वा अश्रू गाळीत कवि बसत नाहीं. ह्या पार्श्वभूमीवर त्याला आव्हानपूर्वक तेजाची आरती करावी असें वाटतें. श्रीमंतांना मात्र सर्व सुखें व गरिबांना मात्र अखंड यातना हें त्याला मान्य नाहीं व तो पुढें म्हणतो--

ज्योतींतूनि धांवत या तेजःकण सारे
या यज्ञांताल अन् सरणांतील निखारे
रे टाळ नभा, तव ज्वालामय तारे
पेटवुं द्या वणवा कणा कणांत मशालीं
हिमलाट पहांटे पहा जगावर आली ।

'**आगगाडी आणि जमीन**' ह्या कवितेंत कवीच्या कल्पकतेचा असामान्य प्रत्यय आपणांस येतो. दलित वर्गावर वर्षानुवर्षें होणाऱ्या जुलमाचें व त्या वर्गाच्या झालेल्या प्रतिक्रियेचें प्रस्तुत कवितेंतील चित्रण अतिशय प्रभावी आहे. त्या कवितेला सुंदर अशी नादमयता प्राप्त झाली आहे. दीनदुबळ्याचा

आर्त आक्रोश ऐकून जीं उत्तरें आजही दिलीं जातात तींच उत्तरें, आगगाडी जमिनीला देते आहे. श्रीमंती, जगाचा दर्प, अहंकार, स्वसामर्थ्याविषयींची जाणीव ह्यांत दिसते.

ढगांत धुराचा—फवारा सोडून
गर्जत गाडी ती—बोलली माजून—
" दुर्बल ! अशीच—खुशाल ओरड
जगावें जगांत—कशाला भेकड !
पोलादी टांचा या—छातींत रोवून
अशीच चेंदत—धांवेन ! धांवेन ! "

कुसुमाग्रजांची भूमिका हळवी, रडवी, केवळ अश्रू गाळणारी नाहीं. बदलत्या क्रांतीचा वेध घेण्याची दृष्टि तिच्यांत आहे–आणि म्हणूनच हा दलित वर्ग प्रथम विनवणी करून पाहतो हे सांगत असतांना कवि म्हणतो

मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ... दि. ...
क्रमांक ...

नको ग ! नको ग
आक्रंदे जमीन
पायाशीं लोळत
विनवी नमून

विनवणीचाही कांहीं उपयोग होत नाहीं हें पाहून मग ती तिला कांहीं वैचारिक जाणीव देण्याचा प्रयत्न करते. तिच्या विवेकबुद्धीला आवाहन करण्यासाठीं ती म्हणते.

नको ग ! नको ग !
आक्रंदे जमीन
जाळीत जाऊ तूं
बेहोष होऊन

आपल्या वेदनांची दाहकताही त्या शब्दांत ती व्यक्त करते. अर्जविनवण्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. सद्विचारांची जाणीव उपयोगी पडत नाहीं हें पाहिल्यानंतर ही दलित जनता अन्यायाविरुद्ध बंड करून उठते. तिच्या अंगभूत सामर्थ्याचा प्रत्यय जगाला येतो असें सर्वसाधारण सामाजिक क्रांतीचें शास्त्र आहे. जितका अन्याय तीव्र, तितक्या वेदना अधिक व त्या

वेदनांतून जन्म पावणारी क्रांति तेजस्वी असा सर्वसाधारण अनुभव येतो. ह्या कवितेंतील खालील ओळींत त्याचा प्रत्यय आपणांस आल्याशिवाय रहात नाहीं.

उद्दाम गाडीचें। ऐकून वचन
क्रोधांत इकडे। थरारे जमीन
" दुर्बळ भेकड " त्वेषानें पुकारी
घुमले पहाड। घुमल्या कपारी

क्रांतीची ही शिवशक्ति जागृत झाली कीं पाशवी शक्तीचें भवितव्य निश्चित होतें. ह्या क्रांतीनें कित्येकदां निरपराध जीवांचंही बलिदान होते. पण क्रांतीप्रवाहाबरोबर न राहण्याचा गुन्हा कळत नकळत त्यांचेकडून घडलेला असतो व म्हणून प्रत्येक क्रांतीला अशा निरपराध जीवांचीही किंमत द्यावी लागली आहे, लागते आहे. ह्या क्रांतींत पाशवी शक्तीचें जें भवितव्य नशिबीं येते त्याचें वर्णन कवि खालील ओळींत करतो.

उलटीपालटी होऊन गाडी ती
हजार शकलें पडलीं खालती।

'**जा जरा पूर्वेकडे**' ह्या कवितेची पार्श्वभूमि कवीनें आपल्या कवितेच्या सुरवातीला व्यक्त केली आहे. रक्तपिपासू साम्राज्यशाही, सुलतानशाही वा आजचा अराजक साम्यवाद ह्यांच्या पार्श्वभूमीवर ही कविता वाचली तर त्यांतील उपरोध किती जालीम आहे याचा प्रत्यय येईल. रामायण महाभारत काळापासून युद्धें आणि शांतीचे प्रयत्न चालू आहेत. जगांत शांति नांदते असें वाटतें न वाटतें तोंच शंखनाद होतो व रणशिंग फुंकलें जातें. आणि हें चालू असलें तरी वरवर ढोंगीपणा मात्र चालू आहे. गिधाडी दृष्टि व वृत्ति कायम आहे व म्हणूनच त्या वृत्तीला उद्देशून कवि म्हणतो,

आणि येतांना पवाडे संस्कृतीचे गा
जरा, डोलूं द्या सारी धरा.
मेघमालेंतून आम्हां शांततेचे द्या धडे
जा जरा पूर्वेकडे !

उच्च दर्जाची सामाजिक कविता लिहिण्यासाठीं मनांत विशाल सहानुभूति असावी लागते. दुसऱ्यांच्या अश्रूंनीं रडणारें कोमल मन असावं लागतं. आणि असंख्यांच्या आनंदांत हसणारं मनही असावं लागतं. त्यांतूनच खरे उमाळे बाहेर पडूं शकतात. कुसुमाग्रजांच्या मनांत ही दलितांविषयींची अपार सहानुभूति वसत होती आणि म्हणूनच '**माळाचें मनोगत**'सारख्या कविता ते लिहूं शकले. माळाचें सारें जीवन हें एकलकोंडें ! त्यांत सुख-समाधानाला कोठें वाव नाहीं. प्रेम, सहानुभूति, स्नेह हे शब्द त्याच्या जीवनांत जणुं नाहींतच ! दलितांच्या जीवनावर माळाचें रूपक अतिशय समर्पक वाटतें व त्यांत कवीच्या कल्पकतेचा व रूपावरील प्रभुत्वाचा प्रत्यय येतो. ह्या दलित समाजाचा जीवनाचा अखंड शोध चालू असतो. परंतु त्याचा शोध लागत नाहीं. म्हणून आंत नुसती आग पेट घेते. कधीं तरी जीवनांत कांहीं रम्य स्वप्नें रंगवावीत, हौस मौज करावी. घटकाभर कां होईना दुःखें विसरावींत, किंबहुना जीवनाचा शीण घालवावा म्हणून प्रयत्न करावा तों भेसूर प्रत्यक्ष तें स्वप्न नाहींसे करून टाकतो याचें काव्यमय वर्णन कवि खालील शब्दांत करतो.

वाटतें बुल्बुल कोयल यावे
मंजुळ संगीत तयांनीं गावें
जीवन जाणीव सारी
विसरावी घटकाभरी
येऊन कधीं तें घुबड मात्र
भीषण भासवी अधिक रात्र ।

सुखाचा, नंदनवनाचा ध्यास घेतलेल्या ह्या दलित वर्गाच्या वांट्याला नेहमीं दुःखेंच येतांना दिसतात. क्षणिक सुखानें मोहरल्यासारखें वाटतें पण तें क्षणिकच ! पुन्हां तीं सुखें नाहींशी झालीं कीं रुक्ष, दुःखी जीवन सुरू होते. आणि मग त्यांचीं मनें शंका विचारतात.

आहे कां खरेंच नंदनवन
फुलांचें रान अन् खगांचें गान
निर्मळ जलाचा झरा
सुगंधी शीतल वारा

शल्य हे अधिक खुपण्याला
केली कोणी ही कल्पना—लीला ?

अशांच्या जीवनांत माया नाहीं व ध्येयेंही नाहींत. शतकांमागून शतकें गेलीं तरी ह्या यातना कायम आहेत आणि म्हणून अशा भकास जिण्याचा उबग येऊन तो वर्ग म्हणतो

कशास आयुष्या देवा, इतुकें
शतकामागून जातील शतकें !

/**पाचोळा** ह्या रूपकात्मक कवितेंतही समाजाच्या सांदींत पडलेल्या दलित, पीडित वर्गाचें दुःख व्यक्त झालें आहे. हीन, दरिद्री अशा सामाजाच्या वांट्याला वर्षांनुवर्षें क्षुद्र असें जीवन आलेसें असतें. त्यांतून त्याची सुटका व्हावी; समाजांत उच्च नीच, स्पृश्य-अस्पृश्य असे भेद असूं नयेत म्हणून आजवर अनेक संतांनीं सुधारकांनीं उक्तीनें कृतीनें वर्षांनुवर्षें प्रयत्न केला पण ह्या वर्गाचें दुःख कमी झालें नाहीं. मलमपट्ट्या वारंवार बदलण्याच प्रयत्न होतो आहे पण मूळ जखम मात्र अजूनही वाहते आहे. ज्यांना ज्यांना जीवनांत कांहीं सुखसमाधान प्राप्त होतें तीं माणसें ह्या दलित जनतेला हंसतात. त्यांची कुचेष्टा होते, त्यांना तुडवूनहि समाजपुरुष पुढें जात असतो, त्याचें वर्णन करतांना कवि म्हणतो.

तरुवरची हंसतात त्यास पानें
हंसे मुठभर तें गवतही मजेनें
वाटसरु वा तुडवीत त्यास जात
परी पाचोळा दिसे नित्य शान्त

हें सारें सहन करणाऱ्या दलित समाजाला कधींतरी अति कठीण दिवस येतात, त्याचें जगणें अशक्य होऊन जाते. सारा पाचोळा वादळांत उडून जातो. आणि त्याजवर एक प्रकारची उजाड व भकास अशी अवस्था दिसते. पुन्हां नवीन पानें पडण्यासाठीं जागा मोकळी होते. वर्षांनुवर्षें हा क्रम चालू आहे. यांत बदल होणार आहे कीं नाहीं माहीत नाहीं. पुन्हां पुन्हां मलम पट्ट्यांचें काम चालू राहाणार आहे येवढेंच त्यांतलें सत्य ! यां ~सामाजिक दुःखाचें अति कारुण्यपूर्ण चित्र कवीनें फार सुंदर रेखाटलें आहे.

अर्थातच हें चित्र बनण्यासाठीं मानवी प्रयत्नांचीच आवश्यकता आहे. नव्या जाणीवेची आवश्यकता आहे. ह्या साऱ्यांचें कारण परमेश्वर आहे व अखेर परमेश्वरालाच शरण गेलें पाहिजे अशी धर्माची व जुन्या समाजरचनेच्या पुरस्कर्त्यांची इच्छा आहे, असते—पण हा उपदेश मूर्खपणाचा आहे. याची जाणीव कुसुमाग्रजांना झालेली दिसते म्हणून आपल्या **'देवाच्या दारीं'** ह्या कवितेंत ते म्हणतात कीं ही सारी सृष्टि परमेश्वरानेंच निर्माण केली आहे. भुकेले असतील त्यांना तूंच घांस भरवितोस, पांगळ्याची तूं काठी होतोस, भक्तासाठीं तूं झीज घेतोस असेंही आम्हीं ऐकतो मग आतांच असा रुष्ट कां ? कसली भेट तुला हवी आहे ? परंतु हें सारें करणाऱ्या देवालाच तें पुढें तुकारामाच्या रोखठोकपणानें विचारतात,

कोण्या वैभवांत—होऊनिया दंग
विसरसी दीन—लेकरांना ?
म्हणतात तुझ्या—दयेला न अन्त
पुकारती संत—थोरी तुझी
चिमण्यांच्या घरा—लावसी मशाल
केवढी विशाल—दया तुझी ?
जळांतले—जीव—तापल्या दुपारीं
वाळवंटावरी—ओढसी तूं !

हीं चित्रें पाहिल्यानंतर कवीला परमेश्वरच आहे कीं नाहीं याविषयींच शंका निर्माण होते. आणि मग केशवसुतांच्या थाटांत तो म्हणतो

भित्या भावनेला—शोधायासी धीर
पाषाणास थोर—मीच केलें.
भीरुतेंत माझ्या—तुझें संगोपन
मींच केलें मन—रंजवाया.

अखेर आत्मशक्तीचीं जाणीव त्याला होते. आपणच पराक्रमांत आपली जीवनस्थिती बदलूं शकतो ही नवी जाणीव त्याला झाली आणि मग तो म्हणतो,

परततो आतां रणांत माघारा
शूरांना निवारा समरांत

संग्रहालय, ठाणें.

माझ्या जीवनाचा मीच शिलेदार
व्यर्थ हा पुकार तुझ्या दारीं

ही अस्मिता जाग्रत झाल्यामुळें त्याच्या मनाची जी स्थिर अवस्था होते तिचें वर्णन करतांना तो म्हणतो

आहेस कीं नाहीं आज नसे चिंता
दोहींमध्यें आतां भेद नुरे !

" **माझ्या जीवनाचा मीच शिलेदार** " ही वेगळी जाणीव मनांत निर्माण झाल्यानंतर तें जीवन बदलून टाकण्यासाठीं अर्थात्‌च मानवाला प्रयत्न करायला हवा ही जाणीव येतेच येते. मानवी मनाला मग क्रांतीची ओढ लागते. क्रांतीचा केलेला प्रयत्न एकदम यशस्वी होत नाहीं. कांहीं प्रयत्न अपुरे राहतात. स्थगित करावे लागतात. योग्य त्या संधीची वाट पहावी लागते; पण अमर्याद ईर्षा व ध्येयासक्त मनच क्रांति घडवून आणते. हे प्रयत्न करीत असतांना अर्थातच कांहीं झीज सोसावी लागते. आणखी त्यागाची गरज असते. ह्याचें सुंदर वर्णन कवीनें ' **बंदी** ' ह्या कवितेंत केलें आहे. सोनेरी पिंजरा असला, खायला प्यायला चांगलें असलें तरी स्वातंत्र्याची सर त्या बंदिस्त जिण्याला येणें शक्य नाहीं ह्याची जाणीव पोपटाला असते. आपल्या बरोबरचा मनुष्य स्वतंत्र जीवन जगतो आहे, पण आपण मात्र गुलामी जीवन कंठतो ह्याची जाणीवच विदारक असते. कवि विनायकांच्या ' कवि आणि पोपट ' आणि स्वातंत्र्य वीर सावरकर यांच्या ' सागरास ' मधील खालील ओळी त्याच गोष्टीचा प्रत्यय देतील.

तुजवीण नको राज्य मज प्रिय साचा वनवास तिच्या जरि वनींचा !

प्रासाद इथें रम्य परी मज भारी
--आईची झोपडी प्यारी

' बंदी ' ह्या कवितेंतील पोपटाच्या मनांतही हीच स्वातंत्र्य भावना ओतप्रोत भरली आहे. त्याच्या क्षुब्ध भावनांचें वर्णन कवि खालील शब्दांत करतो

आणि बंदी खरा क्षुब्ध होत भारी
मारि धडका धडधडा बंद दारीं !

पण—" शांत झाला अन् शेवटीं शिणोनी
जाय भरूनी पण पिंजरा पिसांनी !

हीच तेजस्वी जाणीव '**आव्हान**' "**काठोकांठ कटाह भरा**" '**गुलाब**' ह्या कवितांतून व्यक्त झाला आहे. कोठल्याही समाजांत क्रांति घडायची असेल तर ती घडवूं इच्छिणाऱ्यांच्या मनांत तीविषयीं अपार श्रद्धा असावी लागते हें जितकें खरें तितकीच त्या क्रांतीसाठीं अपार कष्ट व हाल सहन करण्याची मानसिक व शारीरिक सिद्धता असावी लागते ही गोष्ट खरी आहे आणि म्हणूनच '**आव्हान**' ह्या कवितेंत कवि म्हणतो—

रक्तानें न्हाली
तनु ही रक्तानें न्हाली
आणि चाळणी जरी छातिची
पिंजुनिया झाली—

ही अवस्था झाली तरी क्रांतीवरची आपली अपार श्रद्धा व्यक्त करतांना कवि म्हणतो.

लवहि न आशंका
परंतु लवहि न आशंका
समर पुकारित राहिल
नित हा रणशाली डंका

कारण अखेर आमचें स्वप्न बुरुजावर निशाण चढविण्याचें आहे. हें करतांना **बलिदान** घडलें तरी तें आम्हांस प्रेय होय.

मुख्यतः रूपकाद्वारें व्यक्त झालेला सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या कवितांचा येथवर विचार झाला. त्याशिवाय ज्या सामाजिक कविता 'विशाखेंत' आहेत त्यांचा विचार आतां अभिप्रेत आहे. त्यामध्यें मुख्यतः **बळी, लिलांव, सहानुभूति**' ह्या कवितांचा समावेश होतो. त्यामध्यें मुख्यतः आर्थिक दारिद्र्यामुळें निर्माण होणाऱ्या सामाजिक प्रश्नांचा विचार आला आहे सामाजिक विषमता ही आमची वर्षानुवर्षें वहात राहिलेली जखम आहे. सामाजिक व राजकीय पुढारी यांच्या आश्वासनांच्या मलमपट्ट्या वारंवार लावल्या जात आहेत. पण त्यामागील तळमळ बेगडी असल्याचा प्रत्यय पिढ्यानपिढ्या येत आहे व ही दुरवस्था कायम आहे.

दारिद्र्यामुळें अन्नान्नदशा झालेले जीव जेव्हां तडफडत असतात त्याच वेळीं दूर कोठेंतरी पंचपक्वानांचीं ताटें झडत असतात. अन्न वांया जाईपर्यंत आग्रह होत असतो. ह्याचें फार विदारक चित्र कवीनें ‘ बळी ’ या कवितेंत रेखाटलें आहे. पोटासाठीं म्हणून आपलें घरदार सोडून शहरीं आलेल्या एका गरीब जीवाची उपासमारीची हत्या हा प्रस्तुत कवितेचा मुख्य विषय— विरोधाभासात्मक चित्रणानें त्या विषयाचें कारुण्य मनांत ठसतेंच पण एक प्रकारची चीडही जागृत होते. पण कवि नुसतें त्या दरिद्री माणसाचें चित्र रेखाटून स्वस्थ बसत नाहीं. ती चीड तो फुलवितो आणि मग तो जीवन-विन्मुख धर्माचा बडेजाव मिरविणाऱ्या भेकड समाजनेत्यांना जाब विचारतो.

मानवांच्या संस्कृतीची काय लागे ही ध्वजा
तीस कोटी दैवतांच्या कीं दयेचें हें मढें

हें प्रेत असें पडलें असतांना भोंवतीं चाललेला शृंगार कवीला सहन होत नाहीं व चिडून तो म्हणतो,

——भेकडांनो ! या इथें ही साधण्याला पर्वणी.
पेटवा येथें मशाली अन् झडूं द्या चौघडे !

‘ **लिलांव** ’ ह्या कवितेंत भांडवलशाही समाजरचनेंत सावकाराच्या कर्जाच्या ओझ्याखालीं चिरडल्या गेलेल्या एका शेतकऱ्याचें करुण चित्र कवीनें रेखाटलें आहे. कर्ज न फेडतां आल्यानें त्याच्या घराचा व सामानाचा ‘ लिलांव ’ मांडला गेला आहे. ‘ रक्त ’ प्राशून पोसलें गेलेलें धान्य, बाजलें, थाळी, गाडग्गीं मडकीं सारीं बाहेर काढलीं जातात. आणि क्षणांत तें झोपडें उजाड बनतें. कोंपऱ्यांत त्याची पत्नी भुकेल्या अर्भकाला घेऊन पाजीत बसलेली असते. तिचे ऊर न्याहाळून आणि खिशांतील नाणीं वाजवीत जेव्हां सावकार ‘ आणि ‘ ही रे । ’ म्हणून हंसत विचारतो, तेव्हां त्यांतलें विष महाभयानक असल्याचा प्रत्यय वाचकाला येतो व चीड निर्माण होते. ज्या समाजरचनेंत गरीब जनतेचा हक्क आणि स्त्रीचें शील लिलावांत मांडलें जातें ती समाजरचना बदलण्याची प्रेरणा नकळत काव्यवाचकाला मिळते.

‘ **सहानुभूति** ’ ह्या कवितेंत गरिबालाच गरीब माणसाचा कळवळा येतो. अनाथ, अपंग, दरिद्री ह्यांची कींव त्या दुःखांच्या यातना अंशतः अनुभवलेल्यांच्याच मनांत निर्माण होते. आणि दुःखी कष्टी जीवांचे आंसू

त्या स्थितींतल्या माणसांनाच फक्त कळतात, हा व्यवहारांत नेहमीं येणारा अनुभव कवीनें शब्दांकित केला आहे. एकीकडे दौलतीची नित्य दिवाळी चालू असतांना दुसरीकडे मात्र ' भूक दिवाळी ' साजरी होत असते. ही सामाजिक विषमता कवीला मान्य नाहीं. एक गरीब मजूर त्या अपंग माणसाचें दुःख ओळखूं शकतो. पण रस्त्यानें धनिकांचीं वाहनें मात्र तेथून मजेनें निघून जातात. माणुसकीचा गहिंवर त्यांना मात्र येतांना दिसत नाहीं. ह्या वस्तुस्थितीचें विदारक चित्रण कवीनें प्रस्तुत कवितेंत केलें आहे. ' **मेघास** ' ह्या कवितेंतील आशय केवळ मेघास उद्देशून ही कविता लिहिली आहे असा घेतला तर ' संपूर्णतया ' स्पष्ट होतो असें वाटत नाहीं. मानवी जीवनाचें, विशेषतः आपल्या सामाजिक जीवनाचें तें एक रूपक आहे असेंच मला वाटतें. जीवनांत आग पेटली आहे. पानें गळून पडली आहेत. नद्या आटून गेल्या आहेत. गाईगुरें उपाशी मरताहेत हें सर्व वैराण जीवन बदलण्याची शक्ति मेघांत आहे आणि म्हणून कवि मेघास आवाहन करतो आहे. कवि मेघास उद्देशून म्हणतो--

गर्जत ये ओढीत ये आसुड तडितेचा
गर्वोन्नत माथा तो नमत भास्कराचा
लोकाग्रणि नमवि जसा मातल्या नृपास

कविवर्य तांबे यांच्या ' **रुद्रास अवाहन** ' ह्या कवितेंतील

पाड सिंहासनें दुष्ट तीं पालथी
ओढ हत्तीवरुनि मत्त नृप खालती
मुकुट रंकास दे, करटि भूपाप्रति

ह्या ओळींची आठवण या संदर्भात व्हावी. मेघास ह्या कवितेच्या कडव्यांतील आशयामुळें ती कविता सामाजिक कविता या विभागांत मोडतें असा माझा समज आहे.

कुसुमाग्रजांच्या सामाजिक कवितेचा विस्तृत परामर्श आतांपर्यंत घेतला. त्या कवितेचीं वैशिष्टयें ही परिचित करून घेतली. ती थोडक्यांत सांगायची झालीं तर असेंच म्हणावें लागेल कीं तिच्यांतील विचार हे दीन दुबळे नाहींत. त्यांना पराक्रमाचें आकर्षण आहे एवढेंच नव्हे तर ते पराक्रमाचेच पूजक आहेत. भव्य, दिव्य, उदात्त अशा गोष्टींचें त्यांना आकर्षण आहे.

क्रांति घडविणारी दाहकता त्यांच्यांत आहे आणि क्रान्तींत सांपडणाऱ्या निरपराधी जीवांविषयींची कणव त्यांच्या त्या विचारांत आहे. सामाजिक अन्याय, जुलूम, विषमता याविषयींची चीड त्यांत ओतप्रोत भरलेली असली तरी ती रडण्याऱ्या दुबळ्यांची चीड नाहीं. तिची शक्ति घणाघाती आहे. ती सामर्थ्याला आवाहन करणारी चीड आहे. त्या विचारांत उत्कटता आहे. आणि म्हणूनच कुसुमाग्रजांना सार्थ अर्थानें '**मानवतेचे कवि,**' '**प्रकाशपूजक कवींचा अग्निसंप्रदाय**' मराठी कवितेंत सुरू करणारे द्रष्टे कवि म्हणून गौरविलें जातें. सामाजिक दुःखांनीं भरलेल्या समाजाचें चित्र बदलण्यासाठीं कवि प्रकाशाला आवाहन करतो—

या त्रिभुवन उजळीत प्रभाकरा;
हा कांठोकांठ कटाह भरा !
नको चंद्र वा नको चांदणें,
सुखमय आभासांत राहणें;
कणाकणावर पसरून किरणें
यज्ञांत शुद्धही धरा करा !
हा कांठोकांठ कटाह भरा !

ह्या प्रकाशपूजनाचीच आज आपणां साऱ्यांना गरज आहे. ह्या 'नव्या मनू' साठीं नवा शिपाई घडविण्याचें कार्य केशवसुतांनीं सुरुं केलें आणि त्या परंपरेतला एक थोर सेनापति म्हणून अलिकडच्या काळांत कुसुमाग्रजांनीं आपली लेखणी (कीं तलवार) यशस्वीपणें गाजविली अशीच ग्वाही मराठीचा काव्यरसिक व कालपुरुष देईल.

# ४ : कुसुमाग्रजांची प्रेमकविता

१८८५ सालीं मराठी काव्यक्षेत्रांत फार मोठी क्रांति झाली. तिचें स्वरूप केवळ काव्याच्या बहिरंगापुरतेंच मर्यादित नव्हतें तर काव्याचें अंतरंगही त्या क्रान्तीनें बदलून टाकलें. त्या क्रान्तीची 'तुतारी' केशवसुत ह्या सेनापतीनें पुकारली. आणि विनायक, टिळक, बालकवि, गोविंदाग्रज इत्यादि कवींनीं त्या तुतारीचे पडसाद अवघ्या महाराष्ट्रांत निनादवून ती क्रान्ति स्थिर केली. कविवर्य भास्करराव तांबे त्यांनीं त्या क्रान्ति देवतेला नटविली—सजविली व तिच्याविषयीं एक वेगळें आकर्षण काव्यरसिकांच्या मनांत निर्माण केलें. रविकिरण मंडळानें ह्या दोन परंपरांचा मागोवा घेत घेत व काव्यविषयक वेगवेगळे प्रयोग करीत त्याच क्रान्तीचें लोण काव्यगायनादि कार्यक्रमांच्या द्वारें सामान्यजनांपर्यंत पोंहचविलें. ती क्रान्ति त्या कालांत स्थिरावली येवढेंच नव्हे तर लोकप्रिय झाली. परंतु काव्याच्या बाबतींत प्रयोगाला जितकें महत्त्व आहे त्यापेक्षां उत्कटतेला तें अधिक आहे. आणि म्हणूनच Poetry is the sponteneous overflow of powerful feelings असें वारंवार म्हणलें जातें. रविकिरण मंडळाच्या ह्या काव्यसाधनेंत शेवटीं शेवटीं ही प्रयोगशीलता इतकी वाढली कीं त्या प्रयोगशीलतेमुळें त्यांतल्या कवींच्या काव्यांत कृत्रिमता येऊं लागली आणि मग त्यांच्या कविता हा एक विडंबन विषय होऊन बसला. काव्य ही कविहृदयाचा उत्फूर्त हुंकार आहे ही गोष्ट ध्यानीं न घेतां काव्यसाधनेसाठीं वेगवेगळ्या खटपटी होऊं लागल्या. कांहीं विषय, लोकप्रिय ट्यून्स, लकबी यांचें वारंवार अनुकरण होऊं लागलें. आज ज्याप्रमाणें '**मराठी कथा आवर्तांत फिरूं लागली आहे काय ?**' अशा थाटाच्या चर्चा मराठी साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठावर वा अन्य साहित्यविषयक चळवळींत जशा केल्या जातात तशीच चर्चा '**मराठी काव्याला ओहोटी लागली आहे काय ?**' या विषयावर वारंवार होऊं लागली होती. आणि ही काव्यक्षेत्रांतील कोंडी कुणी तरी फोडणें फार आवश्यक होतें. मराठी काव्यसाहित्याचें भाग्य थोर कीं अशी

स्थिती येते त्यावेळीं कुणींना कुणीं कलाकार पुढें येतो आणि मराठी कवितेला एका प्रकारची गतिमानता प्राप्त होते.

मराठी काव्यक्षेत्रांत ह्या प्रकारची कामगिरी करणारा कवि म्हणून कुसुमाग्रजांना काळानें प्रशस्तीपत्र दिलें. कुसुमाग्रजांचा '**विशाखा**' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला आणि एका तेजस्वी कवीचा मराठी काव्यक्षेत्रांत उदय झाल्याची जाणीव काव्यरसिकांना झाली. '**प्रकाशपूजक कवीचा संप्रदाय**' '**स्थंडिल संप्रदाय**' '**अग्निसंप्रदाय**' इत्यादि नांवानीं त्या संप्रदायाचें नामकरण विविध काव्य रसिकांनीं व काव्यसमीक्षकांनीं केलें. आणि 'विशाखा' कविता संग्रह हातीं देतांना कवि स्वतःही ह्या बाबतींतलें आपलें वेगळेंपण व आपली भूमिका स्पष्ट करतांना म्हणतो,

समिधाच सख्या या, यांत कसा ओलावा
कोठून फुलापरि वा मकरन्द मिळावा
जात्याच रुक्ष या, एकच त्या आकांक्षा,
तव आंतर अग्नी क्षणभर तरि फुलवावा

/कुसुमाग्रजांच्या कवितेची भूमिका ध्यानीं घेतली तर त्यांच्या कवितेंतला सामाजिक आशय कळणें सुलभ जातें आणि ह्या जाणिवेनेंच कुसुमाग्रजांच्या सामाजिक कवितांचे स्वागत साऱ्या काव्य रसिकांनीं केलेलें आपणांस पहावयास सांपडतें. कुसुमाग्रजांच्या 'विशाखा' ह्या काव्यसंग्रहांत ही सामाजिक राष्ट्रीय भावना व्यक्त करणारी कविता इतकी संख्येनें मोठी व गुणांनीं तेजस्वी आहे, कीं तिचें स्वागत करीत असतांना संग्रहांतील प्रेमकवितेकडे मुद्दाम जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याशिवाय लक्ष जात नाहीं. आणि त्या काव्यांतही ओतप्रोत भरलेली सामाजिक जाणीव, त्यांत असलेलें प्रकाशपूजन, त्यांत असलेली 'भव्य, दिव्य आणि उदात्त' याविषयींची ओढ याकडे साहजिकच काव्यवाचकाचें व रसिकाचेंही क्वचित् प्रसंगीं दुर्लक्ष होतें.]

आज कुसुमाग्रजांच्या '**विशाखे**' तील प्रेमकवितेचा अभ्यास या दृष्टीनेंच प्रस्तुत लेख हातीं घेतला आहे. (तांबे यांची कविता वाचीत असतांना जसा एक मानसिक आनंद होतो तसा कुसुमाग्रजांची विशाखेंतील कविता वाचतांना होतो.( 'किनारा' ह्या त्यांच्या संग्रहांतील '**ताजमहल**' '**आकाशांतील लहरी**' '**शृंखला**' '**नव्हतें माहीत**' '**मी काय**

**तुला वाहूं ?' ' नवें जुनें ' ' प्रीत पतंगाची ' वैष्णव** आणि **बलिदान** यांसारख्या कविता वाचीत असतांना असाच आनंद आपणांस प्राप्त होतो. ' विशाखा ' या संग्रहांतील ' अहिनकुल ' ' **क्रांतीचा जयजयकार** ' ' **कोलंबसाचें गर्वगीत** ' ' **आगगाडी आणि जमीन** ' ' **गुलाम** ' ' **बंदी ' सहानुभूति, पाचोळा ' मातीची दर्पोक्ति ' ' पृथ्वीचें प्रेमगीत** ' ' **स्नानाची समाप्ति** ' ' **मूर्तिभंजक** ' ' लिलांव ' या कविता वाचीत असतांना कुसुमाग्रजांच्या कल्पकतेचा, समाजरचनेविषयींच्या त्यांच्या मनांतील चीडीचा, रूपकांवर असलेल्या त्यांच्या असामान्य प्रभुत्वाचा, तेजस्वी अशा राष्ट्रीय भावनेचा, जीवनांतल्या भव्य दिव्य आणि तेजस्वी अशा गोष्टींबाबतच्या त्यांच्या पूजकाच्या भूमिकेचा आणि त्यांच्या काव्याच्या ओजस्वितेचा प्रत्यय येतो.

कुसुमाग्रजांची प्रेमकविता ( विशाखेंतील ) संख्येनें थोडी असली तरी ती कवीच्या वरील काव्यगुणांचा प्रत्यय येण्याइतपत वैशिष्ठ्यपूर्ण आहे असें खात्रीनें म्हणतां येईल. त्यांच्या काव्याची एकंदर बैठकच त्यांच्या चिंतनशील प्रवृत्तीचा प्रत्यय देणारी आहे. त्यामुळेंच राष्ट्रीय व सामाजिक कवितांत जी उत्कटता आपणांस दिसते तीच उत्कटता प्रेमकवितेंतही पहावयास सांपडते. या उत्कटतेमुळें तिला एक प्रकारची खोली ( Depth ) प्राप्त झाली आहे. ती उथळ नाहीं व एकांगींही नाहीं–तींत आंधळें स्वप्नरंजन नाहीं व रुक्ष वास्तवतेचें हिडीस प्रदर्शनही नाहीं. त्यांच्या एकंदर कवितेंत आढळणारें प्रकाशपूजन व आढळणारी सामाजिक जाणीव त्यांच्या प्रेमकवितेंतही पहावयास सांपडते. प्रेमाच्या असामान्य शक्तीची कवीला जाणीव आहे. परंतु खरें प्रेम हें मानवी मनाला पंगु करणारें असत नाहीं, असतां कामा नये असें कवीला वाटतें. महत्तमतेचें, तेजाचें, प्रकाशाचें आकर्षण आहे. प्रेमांतही हें प्रकाशपूजन असलें पाहिजे, असतें असें तो मानतो आणि म्हणूनच ' **पृथ्वीचें प्रेमगीत** ' ह्या कवितेंत कवि म्हणतो.

परी भव्य तें तेज पाहून पूजन
घेऊं गळ्यांशीं कसे काजवे
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे

सर्वसाधारणपणें प्रेमकवितेंत आढळणारी मीलनाची बेहोषी कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितेंत आढळत नाहीं. ' विरहांत व्याकुळता व मीलनांत बेहोषीचा अभाव ' अशा शब्दांत कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितेचें वर्णन करतां येईल.

**किनाऱ्यावर** :--या कवितेंतील प्रियकर आणि प्रेयसी सागरतीरीं बसले आहेत. पुढें अथांग दरिया पसरलेला आहे. वास्तविक प्रेयसी शेजारीं असतांना व भोंवतीं सागर आणि एकांत असे असतांना प्रियकरानें बेहोष होणें हीच स्वाभाविक गोष्ट वाटली असती. पण कुसुमाग्रजांचा प्रियकर जीवनविन्मुख व केवळ स्वप्नाळू नाहीं. त्याच्या मनांतले विचार तो खालील शब्दांत व्यक्त करतो.

दूर तमांतुन दिसती अंधुक
नगरांतील त्या ज्योति तेवत
संसारांतिल सुमूर्त दुःखें
बसलेली वा जागत, जाळत

पुढें पुळणीवर येऊन आदळणाऱ्या लाटांकडे पाहून त्या लाटांच्या नौकेंत बसून सागरप्रवासाला जाण्याची कल्पना त्याच्या मनांत येत नाहीं. त्याही ठिकाणीं पुन्हां तो म्हणतो

जणूं जगाचीं जीवन स्वप्नें
स्फुरतीं फुलती फुटतीं, वरती !

आणि किनाऱ्यावर एकांतांत मीलन होत असतांहीं तो जीवनाचा अर्थ गांभीर्यानें शोधण्याची तिला सूचना करतो.

जीवित दर्यापरि, नसें तें
केवळ सुंदर, केवळ भीषण

कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितेंत तृप्त प्रीतीपेक्षां असफल प्रीतीचें चित्रण अधिक आढळते. ' **अवशेष** ' ह्या त्यांच्या कवितेंतला प्रियकर हा अतृप्त प्रीति नशिबीं आलेला एक दुर्दैवी प्रियकर आहे. प्रणयभंगाचें दुःख सर्वसाधारणतः दारुण मानलें जातें. त्यापायीं वेडापासून तों आत्महत्त्येपर्यंत माणसें गेलेलीं आपण पाहतों. परंतु कुसुमाग्रजांचा प्रेमिक ' स्वप्नांची माळा ' ओघळल्यानंतरही जिद्द न सोडणारा असा आहे तो म्हणतो

रवि येतां क्षितिजावर वरती
दंवापरी विरल्या आकांक्षा
जागींच जिरल्या मनीं जिगीषा
हांसत झांकुनी त्या अवशेषा
करणें आहे प्रवास पुढती

ही जाणीव त्याला असली तरी प्रणयभंगाचें दुःख दारुण आहे याची त्याला जाणीव आहे. व म्हणूनच प्रेमाच्या आठवणीनें तो रात्ररात्र जागून काढतो.

प्रणयांतली मोहक दृश्यें अजूनही त्याच्या स्वप्नांत समूर्त होऊं शकतात. परंतु त्या स्वप्नांचा माग काढीत गेल्यावर मात्र तीं थडग्यांतच विरून जातात व पुन्हां नैराश्य पदरीं येते. त्या नैराश्यांत त्याची व्याकूळता आढळून येते. अतृप्त प्रीतींतली व्याकूळता, भावविवशता, त्यांतले आशानिराशेचे खेळ यांचें मानवी मनाला व खास करून कविमनाला फार प्रभावी आकर्षण वाटत आलेलें आहे आणि म्हणूनच एका आंग्ल कवीनें म्हटल्याप्रमाणें Our Sweetest songs are those that tell of our saddest thoughts. याचा प्रत्यय प्रेमभंगात्मक कविता वाचतांना आपणांस येतो.

(**स्मृति** ह्या कवितेंतील प्रेमिक हा शहरीं आलेला आहे. पण शहरी झगझगाटांत त्याचें मन रमत नाहीं. त्या पार्वभूमीवर आपल्या प्रेयसीच्या घरांतील समयांची मंद वात त्याला व्याकूळ करते. परसांतला निशिगन्ध त्याला आठवतो. गांवचा नदी किनारा आणि पडका घाट त्याला आठवतो. तिनें गायिलेला आर्त अभंग त्याच्या मनाच्या आर्ततेंत अधिक भर घालणारा असला तरी तो त्याला आठवतो आणि अखेर शहरांत अनेक लावण्यवतींचा विलास चाललेला प्रत्यहीं दिसत असला तरी त्याला मात्र आपल्या प्रेयसीच्या डोळ्यांतील करूण भावविलास मोहवितो—विद्ध करतो. विरोधात्मक प्रतिभेचा वापर करून प्रेमाची उत्कटता प्रगट करण्यास कवीची कल्पकता व कथित शक्ति यांचा सुंदर प्रत्यय येतो. विरही प्रीतीमध्येंही कुसुमाग्रजांच्या प्रेमिकाच्या मनाची जी उंची पहावयास सांपडते ती त्यांच्या एकंदर काव्य-विषयक भूमिकेच्या श्रेष्ठत्वाचें गमक म्हणून मानायला हवी !

**तरीही केधवा:**—मधला प्रेमिक हा प्रेमभंग झालेला प्रेमिक आहे

असें म्हणतां येत नाहीं. दोन जीव जवळ येतात. एकमेकांच्या मनांतील भाव फुलतात. त्यांचा सुगंध एकमेकांचें मन धुंद करतो. पण मुग्धतेमुळें ते भाव मनांतच राहतात व मग एकमेकांपासून विलग होऊन प्रवास करण्याचा प्रसंग त्या जिवांवर येतो. प्रस्तुत कवितेंत नेमकें हेंच घडलेलें दाखविलें आहे. त्या सर्व भावाचें सुंदर वर्णन मोजक्या शब्दांत कवीनें केलें आहे. शब्दांचा फाफटपसारा ह्या एकूण कुसुमाग्रजांच्या कवितेंत कमी आढळतो. वेंचक व वेधक शब्दांत कवि त्या त्या भावांना सजीवता प्राप्त करून देतांना दिसतो. प्रस्तुत कवितेंतील प्रेमिक म्हणतो,

दोघांत आजला । अफाट अंतर
जुळून पाकळ्या । उडाल्या नंतर
जीवनावांचून । जळला अंकुर
प्रश्नही राहिला । राहिलें उत्तर

मुग्धतेमुळें अबोल राहिलेल्या प्रीतीचें सुंदर वर्णन तो वरील शब्दांत करतो. परंतु जीवन हा संग्राम असल्याची जाणीव त्याला आहे. म्हणून तो लगेच पुढें म्हणतो,

संग्रामीं आजला । शोधतों जीवित
उरींचे ओघळ । दाबून उरांत

कारण ह्या

वादळीं रणांत । करणें कोठून
नाजूक भावाचें । लालनपालन.

ही मनाची एक विशिष्ट पातळी त्यानें मांडलेली असते. परंतु अखेर तोही मनुष्य आहे. मनोभंगाचें दुःख त्याच्याही उरांत सलत राहते व मग कधीं तरी त्याला प्रीतीचें मोहोळ आठवतें व त्याचा बिछाना आगीचा ओहोळ बनतो. तें दु;ख त्याला जाळीत राहतें.

'**आस**' ह्या कवितेंत प्रणयानें प्राप्त होणाऱ्या पंगुतेविरुद्ध कवीनें आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. तुझ्या प्रणयांत आकर्षकता असली तरी मी 'नभ-नाविक' असल्यानें तूं मला बंधमुक्त करणेंच योग्य असें कवि त्या रमणीला बजावतो. त्या प्रेमाचें आकर्षण त्याला वाटत नाहीं असें नाहीं. तो प्रेयसीला उद्देशून म्हणतो,

तुझ्या करांचा विळखा पडतां
तव वक्षाच्या उबेंत दडतां
गमे जिण्याची ‘ क्षण सार्थकता ’
परि अंतरिं करि आक्रोश कुणीं
करि मुक्त विहंगम हा रमणी.

त्या प्रेमांत त्याला ‘ क्षण सार्थकता ’ वाटते खरी पण आंत कुणीं तरी आक्रोश करतें आहे ह्याची जाणीव त्याला होतें. हें आक्रोश करणारें मन सामाजिक जाणीवेनें भरलेलें, स्वातंत्र्याचें, तेजाचें पूजक असें मन आहे. आणि म्हणूनच रमणीच्या आलिंगनांत त्याला क्षण सार्थकता वाटतें.

‘**पृथ्वीचें प्रेमगीत**’ हें कुसुमाग्रजांच्या प्रेमगीतांतील व एकंदर कवितेंतील अमर गीत आहे. असामान्य कल्पकता व प्रकाशपूजन हीं त्या गीताचीं खास वैशिष्ट्यें होत ! कुसुमाग्रजांच्या प्रतिभेला असलेलें भव्यतेचें, तेजस्वितेचें व पराक्रमाचें आकर्षण प्रस्तुत कवितेंत फार कलात्मकतेनें मांडलें असल्याचें आढळून येतें. शास्त्रीय ज्ञानाची कास धरून केलेला असा काव्याविष्कार म्हणजे प्रस्तुत कविता होय.

फार पूर्वकालीं पृथ्वी हा अग्नीचा लाल गोळा होता. पुढें तो थंड झाला व त्यांतून पृथ्वीचा जन्म झाला. ही पृथ्वी सूर्याभोंवतीं परिभ्रमण करीत असतें. युगानुयुगें हेंच परिभ्रमण चाललें आहे. स्त्री ही पुरुषाच्या पराक्रमाची पूजक असते. पुरुषाचा पराक्रम आणि स्त्रीचें सौंदर्य यांचा सुंदर मिलाफ म्हणजे यशस्वी संसाराची निर्मिती असें समीकरण मांडलें जातें. आपल्या भोंवती युगानुयुगें फिरायला लावणाऱ्या सूर्याचें, त्याच्या तेजाचें, त्याच्या पराक्रमाचें पृथ्वीला, एका स्त्रीला आकर्षण वाटणें हें अगदीं स्वाभाविक आहे. ह्या साऱ्या मनोभावाचें कलापूर्ण वर्णन कवीने केलें आहे.

सृष्टीच्या प्राथमिक अवस्थेंतले उमाळे उसासे आतां संपलें असून ती आग आतां शमली असल्याचें वर्णन एका नव्हाळींतल्या स्रीलाही लागूं पडण्यासारखें आहे. कवि म्हणतो--

नव्हाळींतले ना उमाळे, उसासे
न ती आग अंगांत आतां उरें
विझुनी अतां यौवनाच्या मशाली
उरी राहिले काजळी कोपरे !

एखाद्या तरुण व सुंदर स्त्रीचें प्रणयाराधन करतांना ज्याप्रमाणें विविध प्रकारची चढाओढ चालते त्या प्रमाणेंच चंद्र, तारे, शुक्र, मंगळ, ध्रुव, धूमकेतू यांचीही पृथ्वीच्या प्राप्तीसाठीं धडपड चालते अशी सुंदर कल्पना कवीनें केली आहे. चंद्राचें परप्रकाशित्व, उल्कापात, धवाचें अढळपद धूमकेतूचें शेपूट अशा विविध शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करून घेऊन हें रूपक फार कल्पकता पूर्ण रीतीनें सजविलें गेलें आहे. परंतु अशांचें प्रेम झिडकारून ती सूर्याच्याच मागें फिरत राहते. कारण कवीप्रमाणेंच तिचीही जीवनश्रद्धा वेगळी आहे. ती म्हणते--

परी भव्य तें तेज पाहून पूजून
घेऊं गळ्याशीं कसे काजवे।
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे.

मी विरह–चिरविरह पत्करायला तयार आहे, पण दुर्बळांचा शृंगार मात्र यत्किंचितही मान्य नाहीं. कुसुमाग्रजांच्या प्रकाशपूजनामागील उत्कटता येथें आपल्या प्रत्ययास येते. सूर्याच्या केवळ स्मृतीनें तिच्या होणाऱ्या अवस्थेचें वर्णम करीत असतांना कवीनें शास्त्रीय ज्ञानाचा कलात्मक वापर केलेला दिसून येतो.

तळीं जगणारा निखारा उफाळून ( ज्वालामुखी )
येतो कधीं आठवानें वर
शहारून येतें कधीं अंग, तुझ्या ( धरणीकंप )
स्मृतीनें सले अन् उले अंतर ( भूमि भंग )

पुरुषाच्या पराक्रमापुढें नतंमस्तक होतांना स्त्रीच्या भावनाही शालीनतेनें कवीनें व्यक्त केल्या आहेत. ती म्हणते

अमर्याद मित्रा, तुझी थोरवी अन्
मला ज्ञान मी एक धूळीकण

दा. क. ११५२२

अलंकारण्याला परी पाय तुझे
धुळीचेंच आहे मला भूषण

रूपकाचा कलात्मक आविष्कार, प्रसाद, शास्त्रीय ज्ञानाचा कलात्मक व कल्पकतापूर्ण उपयोग व प्रकाशपूजन हीं या कवितेचीं खास वैशिष्ट्यें होत.

**शेवटचें पान** या कवितेंत एका विरही स्त्रीची खास मनोव्यथा कवीनें वर्णन केली आहे. जीवनांत अवसेचा अंधार पसरलेला आहे. चंद्राचा शीतल प्रकाश कलेकलेनें नाहिंसा झाला आहे. अशा वेळीं—शीतल असा चंद्रप्रकाश घेऊन हा प्रेमिक–प्रवासी तिच्या जीवनांत येतो. परंतु मधुकर वृत्तीनें सुगंधाचा मागोवा घेत आलेला हा पायिक मधु लुटून निघून जातो. आपल्या प्रेमाचा हा अवमान तिला विद्ध करतो व ती त्याला '**मत्त प्रवासी**' म्हणते. परंतु असें ती म्हणत असली तरी त्या पथिकावर तिचें निस्सीम प्रेम असते. जीवनाच्या प्रवासांत––वाळवंटांत तो एकाकी पडेल. त्याला कुणाची सोबत मिळणार नाहीं. ऊन त्याला भाजून काढील म्हणून तिला खंत वाटते व म्हणून ती त्याला परत येण्याचें आवाहन करतें. पण तें आवाहन मान्य करून तो येणारच नसेल तर मग ती त्याला सुखानें जाण्यास अनुमति देते. परंतु तिची प्रीति मात्र इतकी उत्कट आहे कीं त्याला जातांना त्रास होऊं नये म्हणून ती म्हणते

जाणारच कां–सुखांत जा तर
बाग मोहरी तव वाटेवर
माग घेत तव चंद्र पुनवेचा येवो गगनांतून

प्रेमाची उदात्तता, उत्कटता, आणि प्रीतीसाठीं होणारें समर्पण हीं या कवितेचीं वैशिष्ट्यें होत.

**प्रीतिविण** ही कविता वाचतांना कवि विनायक यांच्या '**प्रीति निमाली** तर' या कवितेची आठवण होणे अपरिहार्य आहे. अर्थातच 'प्रीति' हा एक चिरंतन काव्यविषय आहे. युगें लोटलीं तरी त्यांतील चिरनवता कायम आहे. आणि जोंपर्यंत मानववंश जिवंत आहे तोंपर्यंत 'प्रीति' ही कधीं मरणार नाहीं. हें प्रीतीचें श्रेष्ठत्व गाण्यासाठींच प्रस्तुत कवितेचा जन्म झाला आहे. अर्थातूच प्रीति नसेल तर जें जें घडेल असें कवि म्हणतो,

त्यांतल्या सर्व कल्पना ह्या सांकेतिक व फारशा नाविन्यपूर्ण नसलेल्या वाटतात. अर्थातच--

प्रीतीस नको तख्त नको ताजमहाल
प्रीतीस हवी प्रीति, वृथा खंत कशाला

ह्या ओळी मात्र प्रीतीचें विश्वव्यापी स्वरूप पटवून देणाऱ्या व वैशिष्ठ्य-पूर्ण वाटतात.

**आश्वासन**:--ह्या कवितेंत अशाच एका उदात्त प्रीतीचें वर्णन कवीनें केलें आहे. प्रीति प्राप्त झाल्यावर जगांत कुठलीच गोष्ट दुर्मिळ वाटूं नये अशी तिची श्रद्धा आहे. विलासांत आणि वनवासांतही प्रीतीच्या सामर्थ्या-वर माणसें उभीं राहतात, जगतात अशी तिची श्रद्धा आहे. प्रीतीचें भांडार भरलें असतांना धनचिंता काय म्हणून वाटावी? सुंदर व शीतल असा चंद्र प्रकाशत असतां पणतीची आस काय म्हणून धरावी? एखाद्या नक्षत्राप्रमाणें आकाशांतून फिरण्याचें सामर्थ्य अंगीं असतांना व तशी शक्यता असतांना क्षुद्र अशा घरट्याचा मोह काय म्हणून पडावा?

एकाद्या नदीच्या किनाऱ्यावर एखादें पडकें देऊळ असतें. त्या देवळाचे दगड इतस्ततः पडलेले असतात. त्या भग्न देवळाच्या फरशीवर वरून वाळलेला पालापाचोळा पडलेला असतो. त्या देवळाचा कळसही अर्ध्यावर कोसळून पडलेला असतो. तरीही त्या भग्न देवळांतल्या मूर्तीलाही पुष्पमाला चढविणारा भक्त कुणीना कुणीं तरी असतोच असतो हें तूं ध्यानीं घे.

तूं एखाद्या महालांत ऐस किंवा कोठल्या तरी धर्मशाळेच्या कानाकोपऱ्यांत ऐस. तूं पराच्या गादीवर लोळण्याचें ऐश्वर्य उपभोग किंवा पर्णशय्या पत्करण्याची तयारी ठेव. तुला मोठ्या सन्मानानें अर्पिलेलीं पुष्पें तुझ्या चरणीं असोत किंवा अग्निपथांतून चालण्याचा प्रसंग तुला येवो हे प्रियकरा, ह्या सर्व प्रसंगांत तूं माझा स्वामी राहशील व मी तुझी स्वामिनी म्हणवून घेण्यांत धन्यता मानीन. असें आश्वासन प्रस्तुत काव्याची प्रेयसी आपल्या प्रियकराला देते आहे. प्रीतीनें पराक्रम फुलविला पाहिजे. यशापयशाच्या व जयपराजयाच्या सर्व अवस्थांत साथ केली पाहिजे अशीच कुणाही माणसाची अपेक्षा असते. प्रीतीच्या राज्यांत थिटेपणाला, खुजेपणाला परागतीला वाव नाहीं. जी पंगु करते ती खरी प्रीतीच नव्हे असें मानलें जातें. त्या दृष्टीनें

प्रस्तुत काव्याची प्रेयसी आपल्या प्रियकराला उद्देशून जे उद्‌गार काढते ते मनोज्ञ वाटतात.

भांडार प्रीतिचें भरलें, कां धनचिंता
दशदिशा चांदणें, कां पणतीस्तव झुरतां
आकाश पथांतुनि नक्षत्रापरि फिरतां
घरट्याचा केंवा कशास प्रणय–भ्रान्ता

**कुतूहल** ह्या कवितेंतही अशाच एका विरही प्रेमिकाची मनःस्थिती कवीनें रंगविली आहे. त्याच्या जीवनांत आलेली स्त्री नंतर त्याच्या आयुष्यांतून निघून जाते. काळाच्या प्रभावानें पुढें व्याकुळता, राग, अनुराग इत्यादि भावना नाहीशा होतात. परंतु ज्या जागीं बसून प्रणयकूजन केलें होतें त्या जागीं पुन्हां तो जेव्हां जातो तेव्हां त्याच्या मनासमोर आठवणींचा सारा चित्रपट उभा राहतो. आणि मग त्याच्या मनांत कुतूहल जागृत होतें आणि मग त्या प्रेमाचा खेळ मांडणाऱ्या स्वैरिणीला उद्देशून प्रश्न विचारतो

"किती जणांवर उधळलीस वा उधळशील तूं फुलें ?"

प्रेमासाठीं त्याग-समर्पण भावना मनांत असलेले स्त्री पुरुष कुसुमाग्रजांच्या कवितेंत जसे पहावयास सांपडतात तसेंच प्रेमाचा खेळ करण्याची कांक्षा बाळगणाऱ्या स्त्रिया व पुरुषही त्यांत सांपडतात. '**शेवटचें पान**' मध्यें असा एक पुरुष त्यांनीं रंगविला आहे. प्रस्तुत कवितेची स्त्री–नायिका त्या स्वभावाची दिसते. वस्तुतः कवितेंतील खालील ओळी सुंदर आहेत.

बसलों होतों हिरवळींत गुणगुणत भावगीत
आशा पक्षापरी उडाल्या होत्या गगनांत

तें जें प्रणयकूजन चालू होतें तें 'गुणगुणणें' होतें. 'भाव–गीता'चें हें वर्णन यथार्थ वाटतें. व दुसऱ्या ओळींतील उपमा देऊन मनांत स्वैर संचार करणाऱ्या अनेकविध आशा आकांक्षांचें स्वैर वर्तन यथार्थ शब्दांत सूचित केलें आहे. दोन प्रेमिकांचें प्रेम कालान्तरानें कमी कमी होत गेलें हें सूचित करण्यासाठीं दिलेली 'चन्द्राच्या कले'ची उपमा यथार्थ होय.

**ध्यास**––ही कविताही एका विरही जीवाची हृदयव्यथा व्यक्त करणारी आहे. प्रेमांत अद्वैत अनपेक्षित असते आणि म्हणूनच प्रेमिकांचें वर्णन

करतांना दोन शरीरें आणि एक आत्मा असें वर्णन वारंवार केलें जातें. कविवर्य तांबे यांची " कुणीं कोडें माझें उकलिल का ? " ही कविता ह्या संदर्भांत आठवावी. प्रस्तुत कवितेंत निसर्गांतल्या विविध गोष्टींच्या उपमेनें प्रिय व्यक्तीबद्दलचा ध्यास व्यक्त झालेला आहे.

रात्रीच्या वेळीं चंद्रप्रकाश ज्याप्रमाणें ढगाची आढकाठी न जुमानतां त्यांतूनही डोकें वर काढून प्रकाश देण्याचें कार्य करतो त्याप्रमाणें प्रेमिकांच्या मनांतला ध्यासही बाह्य संकटाची तमा बाळगीत नाहीं. ती अखंड धारणा चालूंच असतें. निर्झराच्या लयबद्ध, तालबद्ध वर्तनाप्रमाणेंच प्रियव्यक्तीला घातलेली साद प्रेमिकांच्या मनांत घुमत राहते. जुन्या मोडक्या देवळांतसुद्धां मंद जळणारी समईची वात ही प्रकाश देण्याचें व तेथें पावित्र्य निर्मिण्याचें कार्य करते तद्वतच प्रिय व्यक्तीची प्रीति ही एकंदर संसारांत एक प्रकारचें गांभीर्य, एक प्रकारचें पावित्र्य व उत्कटता निर्माण करण्यास कारणीभूत होते असें तो सुचवितो. निळ्या आभाळांत ज्याप्रमाणें स्वतःसाठीं व आपल्या पिलांसाठीं दाणापाणी शोधण्यासाठीं ज्याप्रमाणें पक्ष्यांचे मोठमोठे थवे मोठ्या वेगानें धांवत जातात तद्वतच माझी वेडी माया पक्ष्यांच्या वेगानें व पक्ष्यांच्या मायेनें तुझ्यामागें तुझ्याकडे धांव घेते. रात्रीं कधीं स्मशानांत रात्रिंचर–घुबड रडूं लागलें कीं माझ्या अंतःकरणांत तुझ्यासाठीं धडपड सुरू होते. अनेक वेडेविद्रे विचार मनांत निर्माण होतात. 'अति स्नेहः पापशङ्की म्हणतात तें याच अर्थानें ! निसर्गांतल्या गोष्टींच्या घेतलेल्या उपमा यथार्थ वाटतात. विशेषतः प्रीतीची संकटांवर मात करण्याची शक्ति ( चंद्र व ढग ) प्रीतीतलें अमर संगीत ( निर्झर व त्याचें वर्तन ) प्रीतींतलें पावित्र्य व प्रकाश देण्याची शक्ति ( देऊळ व समयीची वात ) प्रीतींतला आवेश व प्रतिपालन कल्पना ( आकाश व वेगानें उडणारे पक्षी ) आणि प्रीतीतली हुरहूर ( स्मशान व घुबडाचें रडणें ) ह्या भावनांचें स्वरूप वर्णन करण्यासाठीं त्यानें केलेला निसर्गाचा वापर त्याच्या कल्पकतेची यथार्थ कल्पना देतो.

**स्वप्नाची समाप्ति :**

कुसुमाग्रजांच्या अतिशय गाजलेल्या कवितांतील एक अप्रतिम प्रेमकविता म्हणून प्रस्तुतः कवितेचा गौरवपूर्ण उल्लेख करायला हवा. कुसुमाग्रजांच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम क्रमांक दि.

कल्पकतेची त्यांच्या ठिकाणीं वसत असलेल्या सामाजिक जाणीवेची प्रचीति आपणांस ही कविता वाचून येते. वातावरण निर्मितीचें असामान्य कसबही त्यांत दिसून येतें.

शुक्रताऱ्याचा प्रकाश हळुं हळुं मन्द होत जातो आहे ही गोष्ट सांगण्यासाठीं कवि "स्नेह हीन ज्योति"ची उपमा देतो. ती यथार्थ वाटते. ज्योतींतलें तेल कमी कमी होत गेलें कीं तिचा प्रकाशही हळू हळू कमी कमी होत जातो. तद्वतच शुक्राचा प्रकाशही दिवस उजाडूं लागतांच हळू हळू कमी होत जातो. अंधाऱ्या रात्रींचें काळें आकाश व प्रकाश वेळेचें निळें आकाश ह्यांचीं सीमारेषा तो पुढील दोन ओळींत व्यक्त करतो. स्वप्नें हीं सुद्धां हळू हळू विरतात. एकदम नाहींशी होत नाहींत तद्वत एकेक तारा हळू हळू विरत जातो. लुप्त होत जातो असें कवि म्हणतो. रात्र ही सुद्धां प्रकाशाच्या सागरांत हळू हळू विरून जाते—जशी वाळू ही कणाकणानें हळू हळू सागरांत लुप्त होतें. ह्या साऱ्या पार्श्वभूमीवर कवि—त्याचा प्रियकर आपल्या प्रियला उद्देशून म्हणतो.

काढ सखे गळ्यांतील तुझे चांदण्याचे हात।
क्षितिजाच्या पलिकडे उभे दिवसाचे दूत॥

आपल्या प्रियेच्या हातांना तो 'चांदण्याचे हात' म्हणतो. **चांदण्याचें धवलत्व, शीतलत्व, प्रसन्नत्व व मनोहारित्व** त्याला यांत अभिप्रेत असावेंसें दिसतें. प्रिया ही गोरीपान, शीत स्वभावाची, प्रसन्न व्यक्तित्वाची व मोहक असावी असें सूचित होतें. त्या दृष्टीनें ही सुंदर व सार्थ उपमा कवीच्या कल्पकतेची व काव्यात्म वृत्तीची साक्ष पटविते.

रात्रींच्या वेळीं साधारणतः वातावरणांत एक प्रकारची विषण्णता व उदासीनता पसरते. शांति आणि अशा प्रकारची विषण्णता जरी सर्वत्र पसरलेली असली तरी घटकेंत आता जगांत जागृति पसरेल व गजबज सुरूं होईल शतपांखरांचा आर्त स्वर आतां ऐकूं येईनासा झाला आहे. आणि रातकिड्यांचें भावगीत संपलें आहे. पुढें निसर्गाचें मानवीकरण करून कवि म्हणतो.

पहांटचे गार वारे। चोरट्यानें जगावर
येती, पाय वाजतात। वाळलेल्या पानांवर

याठिकाणीं पहांटचे गार वारे आपल्या नकळत आपण सारेजण निद्रिस्त असतांना वाहूं लागतात यावर ते **चोरटचानें** जगावर येतात असें कवि म्हणतो. व वाळलेल्या पानांची त्या वाऱ्यामुळें जी सळसळ होते त्याला तो मानवी चालण्याचें रूप देतो.

पहांटच्या दंवाचा उपयोग असाच कलात्मकतेनें करून घेण्यांत आला आहे. दंव बिंदूंना तारकांच्या आसवांची उपमा ही कवीच्या कल्पकतेची द्योतक आहे खास ! तारकांचे आंसू कां म्हटलें आहे ? तर दिवस उजाडला आहे. आतां आपलें काम कांहीं राहिलें नाहीं याबद्दलची खंत तारकांना वाटत असावी असें वाटतें.

प्राजक्ताच्या पावलांशीं पडणाऱ्या पुष्पांचा सुगंध दुरून कुठून तरी येतो आहे, असें कवि म्हणतो कारण प्राजक्ताच्या फुलांचा दुरूनच वास अधिक येतो असें म्हणतात. व म्हणून 'पडे दूर पुष्परास' असे अन्वर्थक शब्द कवीनें वापरले असावेत. वाऱ्यामुळें त्या पुष्पांचा सुगंध सर्वत्र दरवळतो असें कवि म्हणतो.

त्यानंतर येणारें कडवें हें एकंदर कवितेच्या वातावरणांत मध्येंच घालण्यांत आलें असल्यानें मनाचा विरस करतें. तें एक ठिगळ आहे. अगांतुक विचार तो आला आहे व एकंदर काव्यांत तो खटकतो असें कांहीं टीकाकारांचें मत आहे. कारण त्या चार ओळी लिहून झाल्यावर कवि पुनश्च पहांटेच्या वातावरणाचें वर्णन करूं लागतो. वरकरणी ही टीका प्रस्तुत असावीसें वाटतें. पण मला मात्र तसें वाटत नाहीं. कारण ही कविता मुळीं एक प्रियकर आपल्या प्रेयसीची समजूत काढीत आहे या भूमिकेंतूनच लिहिली आहे. आणि म्हणूनच भोंवतालच्या उगवत्या दिवसाच्या वेगबेगळ्या गोष्टी तो तिला आधीं सांगतो व मग तिला तो पुन्हां पुन्हां म्हणतो,

काढ सखे गळ्यांतील तुझे चांदण्याचें हात
क्षितिजाच्या पलिकडे उभे दिवसाचे दूत !

हें तो वारंवार म्हणतो व तें सारें ऐकूनही तिची समजूत पटत नाहीं म्हणून अधिक गांभीर्यानें तो तिला म्हणतो

ध्येय, प्रेम, आशा यांची
होतसे कां कधीं पूर्ति

वेड्यांपरी पूजितो या
आम्ही भंगणाऱ्या मूर्ति

तेव्हां माझ्या मतें तो तिची समजूत काढीत आहे म्हणूनच ह्या ओळी अगांतुक वाटत नाहींत. पुढेंही तो असेंच पहांटचे वर्णन करतो व पुन्हां तिची समजूत पटवण्यासाठीं तो तिला म्हणतो.

होतें म्हणूं स्वप्न एक । एक रात्र राहिलेलें
होतें म्हणूं वेड एक । एक रात्र राहिलेलें

कवि व्यक्तिगत भावभावनांपेक्षां सामाजिक जाणीव अधिक थोर मानतो याचें हें गमक मानलें पाहिजे. आणि या जाणीवेनेंच तो सूर्याच्या प्रकाशांत केवळ ' **वेडे** ' ठरूं असें म्हणून थांबत नाहीं तर ' **अपराधी** ' ठरूं असेंही म्हणतो. ही सामाजिक जाणीव हाच कुसुमाग्रजांच्या कवितेचा स्थायीभाव आहे. व त्यांच्या एकंदर प्रेमकाव्यांतही तो प्रगट झाल्याशिवाय रहात नाहीं. त्यांच्या प्रेमकवितेंत मीलनाची बेहोषी नाहीं पण विरहाची व्याकूळता मात्र भरपूर आहे. त्यांच्या कवितेंतलें प्रेम उथळ नाहीं. उत्कट आहे. तें पंगु नाहीं तर प्रकाशपूजक आहे. तें समंजस आहे डोळस आहे. सामाजिक जाणीव असलेलें आहे. त्याग हीच प्रेमाची खरी कसोटी आहे. या सिद्धांतावर त्याची श्रद्धा आहे आणि विलासांत आणि वनवासांतही साथ करण्याची तयारी असण्याइतकें कणखर मनाचें आहे. समर्पण कल्पनेवर त्याची श्रद्धा आहे. प्रेमांतही ऐहिक भाग यशस्वी वा अयशस्वी होत असला तरी खरें प्रेम मरत नाहीं यावर त्याची श्रद्धा आहे त्याला भव्य, दिव्य, तेजस्वी उदात्त गोष्टींचें फार आकर्षण आहे. त्याला दुर्बळांचा शृंगार मान्य नाहीं. आणि म्हणूनच कुसुमाग्रजांच्या सामाजिक व राष्ट्रीय कवितेइतकीच त्यांची प्रेम कविताही--वैशिष्ट्यपूर्ण व तेजस्वी झाली आहे. त्या कवितेच्या वाचनानें व अभ्यासानें जीवनांत पदोपदीं येणारे आशा निराशेचे प्रसंग तरून जाण्यास खात्रीनें प्रेरणा मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. कारण अखेर कवीच्याच शब्दांत सांगावयाचें झालें तर

जीवित दर्यापरी-, नसें तें
केवळ सुंदर, केवळ भीषण ।

# ५ : 'विशाखें'तील संकीर्ण कविता

यापूर्वींच्या प्रकरणांतून कुसुमाग्रजांची सामाजिक, राष्ट्रीय–ध्येय प्रवण, प्रेमकविता इत्यादि विषयीं कांहीं विचार आपल्यापुढें मांडले आहेत. कुसुमाग्रजांच्या विशाखें'तील बराचसा भाग वरील तीन विषयांवरल्या कवितांनीं व्यापला असला तरी त्या विभागांत न बसणारी पण त्यांच्या काव्यात्म व्यक्तित्वाचा परिचय करून देणारी अशी कांहीं कविता ' विशाखेंत ' आहे. प्रस्तुत प्रकरणांतून त्या कवितांचा परिचय आपणांस करून देण्याचा मानस आहे.

कुसुमाग्रजांच्या काव्याची प्रकृति मुख्यतः प्रकाशपूजक, ध्येयप्रवण, भव्य दिव्याचा शोध घेणारी, त्याचा छंद जडलेली अशी आहे आणि तशी ती आहे ह्याची जाणीव कवीला आहे. ही जाणीव असणें हेंच कांहीं टीकाकारांचें मतें रोगट मनोवृत्तीचें लक्षण मानलें जातें. विशेषतः कविवर्य केशवसुत यांच्या कवितेवर टीका करतांना असा आरोप केला जाई. कलावंताच्या आत्मविश्वासाबद्दल त्यानें वारंवार बोलत राहणें हें रोगट मनोवृत्तीचें लक्षण मानणें हें कदाचित समर्थनीय ठरेलही ! परंतु आपली भूमिका मांडण्यासाठीं केला जाणारा आत्माविष्कार हा रोगट मनोवृत्तीचा मानण्याचें कारण नाहीं. केशवसुतांच्या कवितेंतून जी काव्यविषयक नवी जाणीव व्यक्त झाली ती " **कृष्णाजी केशव दामले** " ह्या नांवाच्या व्यक्तीपुरतीच मर्यादित नव्हती. तर कवि वा कलावंत ह्या सर्व वर्गाबद्दलची ती सामायिक जाणीव होती. " **आम्ही कोण ?** " मधील " **आम्हीं** " व्यापक अर्थानें घेतला पाहिजे. कांहीं नवीन प्रयोग आपण करीत आहोंत, त्याची पूर्वपीठिका व भूमिका विशद करून सांगण्यासाठीं केशवसुतांची कवि व काव्य-विषयक भूमिका मांडणारी कविता लिहिली गेली.

कुसुमाग्रजांनाही आपल्या कवितेंतील भव्य दिव्य – तेजस्वी व उदात्ताच्या आकर्षणाची जाणीव होती आणि म्हणूनच आपल्या काव्याची भूमिका विशद करणाऱ्या " **समिधाच सख्या या** " ह्या कवितेंत ते म्हणतात

समिधाच सख्या या, यांज कसा ओलावा
कोठून फुलापरि वा मकरन्द मिळावा?
जात्याच रूक्ष या, एकच त्या आकांक्षा
तव आंतर अग्नी क्षणभर तरि फुलवावा !

कुसुमाग्रजांच्या कवितेची भूमिका सांगणारी ही कविता आहे. काव्य म्हणजे कोमलता, मधुरता, मादकता, भावनेचा ओलावा, त्यांत फुलांतील सुगंधिता, आकर्षकता, मोहकता इत्यादि गुण गृहीतच धरलेले असतात. परंतु हे सद्‌गुण शोधीत येणाऱ्या सख्याला – काव्यरसिकाला कवि मात्र प्रथमच बजावून सांगतांना दिसतो कीं " जात्याच रूक्ष ह्या " कविता–ही रूक्ष झाली कीं जी कविता रहात नाहीं. ती गद्यप्राय होतें असें संकेतानें व अनुभवानेंही मानलें जातें. परंतु ह्या कल्पनेला साजेशी माझी कविता नाही याबद्दल मात्र मला खंत वाटत नाहीं असें सांगून कवि म्हणतो

जात्याच रूक्ष या, एकच त्या आकांक्षा
तव आंतर अग्नी क्षणभर तरि फुलवावा

आपल्या काव्याला ' समिधांची उपमा देतांना यज्ञवेदीवर स्वतः जळून ' श्रेयोमंगल ' निर्माण करणाऱ्या समिधांप्रमाणेंच आपलें जीवन हेंही श्रेयोमंगल निर्माण करण्यासाठींच आहे ही जाणीव व हा विश्वास त्यांत व्यक्त करावयाचा आहे. समिधांचें जीवन जसें यज्ञ यशस्वी करण्यानेंच, ज्वलनानेंच सार्थकी लागतें, तद्वतच आपलें जीवन – काव्य आहे, ही सार्थ जाणीव कवीच्या मनांत दिसते. क्षणभर जरी तुझ्या मनांतली तेजस्विता प्रगटली तरी सुद्धां जीवन कृतार्थ झाल्यासारखें वाटेल असें कवि म्हणतो.

आपल्या कवितेचें – कविप्रकृतीचें यथार्थ वर्णन कवि पहिल्याच कडव्यांत करतांना म्हणतो

दूरस्थ कुणीं दे तुझ्या करीं ही कविता
वाहते जिच्यांतुनि त्याची जीवन - सरिता
खळखळे, अडखळे, सुके, कधीं फेंसाळे
परि अखंड शोधे वाट समुद्राकरितां !

आपल्या कवितेंतून आपली जीवन - सरिता वाहते असें कवि म्हणतो, ' जीवन - सरिता ' म्हणण्यांतही औचित्य आहे. सरितेंतलें गांभीर्य,

प्रवाहित्व, पावित्र्य त्यांत गृहीत धरतां येतें. ही सरिता कधीं खळखळे, अडखळे, सुके, कधीं फेंसाळे असें कवि म्हणतो. कवीच्या वा कलावंताच्या कला-साधनेंतल्या विविध अवस्था ह्या ओळींत व्यक्त करतो. कलावंत हा अखेर मनुष्य आहे त्याच्या जीवनांत जसे चढउतार येतात तद्वतच त्याच्या कलासाधनेंतही असे चढउतार येतात. ह्या विविध अवस्था अपरिहार्य असतात व त्यांची जाणीव मनांत बाळगूनच कलावंताला आपली साधना करावी लागते. कवि कुसुमाग्रज ह्या ठिकाणीं ह्या साऱ्या अवस्था वर्णन करून मग आपल्या कवितेचें सार्थ स्वरूप वर्णन करतांना म्हणतात

परि अखंड शोधे वाट समुद्राकरितां

सागराच्या विशालतेचें, भव्यतेचें तिला आकर्षण आहे. रत्नाकराशीं मीलन, रत्नाकराचा शोध, रत्नाकराच्या पोटीं असणाऱ्या असंख्य जीवन-सत्वांचा, तत्वांचा शोध हेंच आपल्या कवितेच्या ह्या प्रवासांतलें ईप्सित आहे असें कवीला वाटतें.

आपल्या काव्याच्या प्रकृतीचें आणखी कांहीं वर्णन कवि दुसऱ्या आणि तिसऱ्या कडव्यांत करतांना दिसतो. ध्येयवादाचा, क्रांतीचा, तेजस्वितेचा, त्यागाचा मार्ग हा नेहमीं खडकाळ, कांट्याकुट्यांनीं भरलेला असतो. तो बहुधा एकाकीच काढण्याची वेळ ध्येयवादी माणसांवर येते. त्या ठिकाणीं रम्यता, मनोहारित्व इत्यादि गोष्टी दिसत नाहींत. याचें कलापूर्ण वर्णन करतांना कवि म्हणतो

खडकाळ प्रान्त तो ही जेथून निघाली
पथ शोधित आली रानांतून अकेली
नच रम्य राउळें, कलापूर्ण वा घाट
तीरावर तुरळक परि अंकुरली वेली
नवपर्णांच्या या विरल माण्डवाखालीं
नेईल सांवली कुणा, कुणास कहाली
तोषेल कुणीं, शापील कुणीं दुर्वास,
" या जळोत समिधा—भव्य हवी वृक्षाली "

आपल्या कवितेनें ज्या भिन्न, भिन्न प्रतिक्रिया होण्याच्या शक्यता आहेत त्या वरील कडव्यांत कवीनें स्वतःच मांडल्या आहेत. त्यांत त्याचा विनीत-

भाव व्यक्त होतो. आपली कविता म्हणजे "नवरर्णांचा विरल मांडव" अशी कल्पना तो करतो, ह्या विरल मांडवाखालीं कदाचित कुणाला सांवली मिळेल. दिलासा मिळेल. गोडवा प्राप्त होईल आणि कुणी भाजूनहि निघतील. जीवनाला सांवली देण्याचें सामर्थ्य 'भव्य वृक्षाली'च्याच ठिकाणीं असतें. ही जाणीव कवीला आहे आणि ती सांवली माझ्या कवितेंत न मिळाल्यानें कुणी संतप्त आत्मा दुर्वासाच्या कोपानें शाप देईल. "ह्या जळोत समिधा" हें कवि जाणून आहे. कारण कवीनें आपल्या काव्याविषयींची यथार्थ जाणीव मनांत वागविली आहे. प्रस्तुत कवितेंत कवीनें मांडलेली काव्याची बैठक ध्यानीं घेऊन जर कुसुमाग्रजांची कविता वाचली तर ह्या कवितेचें यथातथ्यत्व ध्यानीं येते.

"**देवाच्या दारीं**" ह्या अभंगांतून कवीनें आपल्या मनाची विविध स्थित्यंतरे ( १९३२ ते १९३९ ) फार कलापूर्ण रीतीनें मांडलीं आहेत. पहिल्या अभंगातून परमेश्वराचा धांवा करतांना परमेश्वरानें भक्तांसाठींच केवळ नव्हे तर दीनदुबळ्यासाठीं जें जें केलें त्याचें वर्णन केलें आहे. हें वर्णन करीत असतांना रिक्त हस्तें आल्यामुळें तूं मजकडे धांवून येत नाहींस किंवा काय ? पण तूं जगताचाच राणा असल्यावर तुला वेगळा नजराणा मी पामर मनुष्य काय देणार असें तो विचारतो. तुझ्या पावलांत गुंतलेलें मन हें धन व भक्तीचींच फुलें उधळीत मी तुझ्या दारीं आलों आहे. ह्या जगाच्या बाजारांत तूंच पाठविलेंस. ठिकठिकाणीं मोहवून टाकणारे खेळ तूंच मांडलेस आणि त्या विविधरंगीं सृष्टींत मी रंगून गेल्यावर तुझ्या दाराशीं यायला उशीर झाला म्हणून आतां तूं रुष्ट झाला आहेस. हें बरोबर आहे काय ? " ह्या अभंगांत व्यक्त होणारे कवीचे व्यक्तित्व पुढें पुढें कसें बदलत गेलें आहे हें पाहण्यासारखें आहे.

परमेश्वराशीं लीन भावनेनें बोलणारा कवि दुसऱ्या अभंगांत धीट झाला आहेसें दिसतें. तो प्रथमच त्याला विचारतो

"कोण्या वैभवांत होऊनिया लीन
विसरशी दीन लेकरांना ?

त्याही पुढें त्याच्या "दयेला न अंत" असें संतवचन नोंदवून मग कवि विचारतो

चिमण्यांच्या घरा लावसी मशाल
केवढी विशाल दया तुझी !
जळांतलें जीव तापल्या दुपारीं
वाळवंटावरी ओढसी तूं
पाहसी तूं शांत त्यांची तगमग
कोणाचा हा राग कोणावरी ?

ह्या पार्श्वभूमीवर ज्या वेळीं मी तुझा विचार करतो तेव्हां

तुझ्या महिम्याचीं प्रचंड पुराणें
गमती तराणें अर्थहीन !

पाषाणाची पहिली मूर्ति ज्यानें घडविली त्याच्या बुद्धीचें कौतुक करून आणि त्याच मूर्ति वेड्याप्रमाणें पुजून 'वेडें विडंबन' चालू आहे असें सांगून कवि आपली तीव्र मनस्थिति खालील ओळींत व्यक्त करतो.

निखाऱ्यांत बद्ध असतांना पाय
अपेक्षिसी काय संकीर्तन !

पाहिल्या अभंगांत भक्तिभावनेनें कवि ओथंबला आहे. व्याकुळलेलें कविमन आपल्याला त्यांतून दिसतें. दुसऱ्या अभंगांतून परमेश्वरी दयेची विपरीत रीत पाहून अश्रद्धेकडे वळणारें कविमन दिसतें. परमेश्वराच्या दरबारीं न्यायच नसावा असें जणु त्याला पटलें आहेसें दिसतें. कविमनाची ही अवस्थांतरें पाहण्यासारखीं आहेत. तिसऱ्या अभंगांत ज्या परमेश्वराचें आपण स्तोम माजवितों तो मुळांतच आहे कीं नाहीं अशा शंकास्पद अव्यवस्थंप्रत तो आलेला दिसतो. परमेश्वर कल्पना ही मुळीं भित्या भावनेला आधार शोधण्याच्या कल्पनेंतून निघाली असली पाहिजे असें कवीला वाटतें. हा आधार धीर देण्यासाठीं वस्तुतः निर्माण केला परंतु ह्या आधारापायींच आज आम्ही अधिक दुर्बल झालेले दिसतो. ह्यामधील Irony of fate ध्यानीं घेण्यासारखी आहे. परमेश्वरावर श्रद्धा ठेवून

ठेविलें अनंतें तैसेचि रहावें । चित्तीं असो द्यावें समाधान ।

ही पंगुतेची निष्क्रियतेची वृत्ति धारण करणारा मानव अखेर आपल्या भक्तिभावनेचें समाधान शोधण्याच्या भूमिकेंतूनच हें करतों असें कवीला वाटतो. परमेश्वर कल्पनेचें संगोपन माझ्या भीरुतेंत आहे असें कवि म्हणतो.

परंतु ह्या अपराधाची जाणीव कवीला झाली आहे ह्या जीवनसंग्रामांत मी परत भाग घेतला पाहिजे, कारण

शूरांना निवारा समरांत

याठिकाणीं त्याचा आपल्या शौर्यावरचा पराक्रमावरच्या विश्वास जागृत झाला आहे. ईश्वरावर हवाला ठेवून जीवन कंठण्याची ( खरें म्हणजे कुंथण्याची ) कांक्षा धरणाऱ्या वृत्तीची कवीला चीड आलेली दिसतें. कारण स्वयं कर्तृत्वावर माणसाचें भवितव्य घडते–घडविलें जातें अशी त्याची श्रद्धा आहे.

माझ्या जीवनाचा मीच शिलेदार
व्यर्थ हा पुकार तुझ्या दारीं

परमेश्वरनिष्ठ पंगुतेकडून ह्या तेजस्वी आत्मसाक्षात्कारापर्यंतचा कवीच्या मनाचा हा प्रवास ह्या तीन अभंग–पंक्तींतून व्यक्त झालेला आहे. ह्या आत्मसाक्षात्कारांतून त्याचें व्यक्तित्व उजळलें आहे. त्याच्या मनांतल्या शंका विरल्या आहेत. स्थिर मनानें तो शेवटीं म्हणतो.

आहेस कीं नाहींस–आज नसे चिंता
दोहींमधें आतां भेद नुरे ।

" आज नसे शंका न म्हणतां तो चिंता म्हणतो. कारण ह्या परमेश्वरी चिंतेनेंच मनुष्य पंगु बनतो. दैववादी बनतो. त्याचें क्रियाशील व्यक्तित्व कोमेजते असें कवीला वाटतें–म्हणूनच त्या चिंतेतून मुक्ति मिळाल्यानें त्याला धन्य वाटतें.

श्रद्धेतून बुद्धिवादाकडे झालेला हा प्रवास संस्मरणीय आहे. काव्यरचनेच्या दृष्टीनें ही कविता सरस झाली आहे. ‘ पुराणें–तराणे ’ कल्पना व “ भित्या भावनेला शोधायासी धीर ! पाषाणासी थोर मीच केलें ” परंतु दुर्बलता दडविण्याच्या प्रयत्नांत “ मीच दुर्बल झालों ” ह्या कबुलींतलें दारुण शल्य मनाला विद्ध करते. कवि मनाची उत्क्रांति हृद्य वाटते.

“ **मूर्ति-भंजक** ” ही कविता जवळ जवळ अशाच कल्पनेंतून निर्माण झालेली आहे. त्या कवितेंतला “ माणुस ” हा जगांतला गल्बला जगांत सोडून, प्रेमबंधनें सोडून देऊन ‘ वनवास ’ पत्करतो. जीवनबंधनांतून मुक्त झालेला वा होण्याचा प्रयत्न करणारा माणूस अखेर नवीन बंधनें निर्माण करतो कसा ह्याचें प्रत्यंतर ह्या कवितेंत येते. डोंगर

कपारी हिंडतांना त्याला संगमरवरी मूर्ति दिसते. अखेर मनुष्य मनुष्य आहे. कुठें तरी मनाचें समाधान शोधण्याचा तो प्रयत्न करीत राहतो. कुठलें तरी श्रद्धाकेंद्र कुठला तरी दिलासा त्याला हवा असतो आणि हा दिलासा त्याच्या मनांत निर्माण झालेला गल्बला क्षणिक स्वरूपांत कां होईना शांत करतो असेंही आढळून येतें. ह्या कवितेंत तसेंच घडतें. त्याला कवीनें 'वेडा' म्हटलें आहे. अनेक अर्थांनीं समर्पक असा हा शब्द आहे. अनेक पत्थरांतून प्रचंड मंदिर उभारण्यासाठीं आपला प्रवास थांबविणारा, दिवसामागून दिवस खपून पाषाणाच्या मूर्तींसाठीं कलापूर्ण शिल्प उभारणारा आणि अखेर ती बोलत नाहीं, हलत नाहीं, वेड्याचें, त्यानें निर्मिलेल्या शिल्पाचें कौतुक करीत नाहीं हें दिसून येतांना तिच्यावर घाव घालणारा ह्या अखेर साऱ्या वेडाच्याच अवस्था मानल्या जात नाहींत काय ? अखेर "उपेक्षेवांचून कसली अपेक्षा आपण पाषाणापासून करायची हें न कळणारा तो खुळाच" असें औपरोधिक वर्णन कवि त्याचें करतो. माणसाच्या श्रद्धेला आज भराभर तडे जाताहेत. त्या श्रद्धा कोलमडून पडताहेत. मूर्ति नष्ट भ्रष्ट होत आहेत. पण त्या मूर्ति देव्हाऱ्यांत बसवितांना व बसविल्या-नंतर माणसाची पूजा ज्या जिद्दीनें चालते तिचें वर्णन कवीनें सुंदर शब्दांत संयमित शब्दांत केलें आहे.

नंतर सुरू हो
वेड्याचें पूजन !
घुमतें कड्यांत
नर्तन गायन

रान अन् भोंतीचें
स्फुंदतें सकाळीं
ठेवी हा वेलींना
ना फूल, ना कळी
विचारीं आश्चर्यें
तृणाला ओहळ
कोण हा हिरावी
रोजला ओंजळ ?

आपणच उभ्या केलेल्या मूर्ति, प्रतिमा आपल्या भाव भावनांना साद घालीत नाहींत. ज्याला देव म्हणून पूजला तो होता वस्तुतः पाषाण! ज्याची मनोभावें समर्पण भावनेनें पूजा तो अखेर आपली सद्भावना न जाणणारा पत्थर निघाला कीं एक प्रकारचा वैताग, चीड आणि भग्नाश अवस्था माणसाला प्राप्त होते. आज भारतीय जनतेंत ही हताश, भग्नाश, वृत्ति वावरतांना दिसते ह्याचें कारणही पर्यायानें हेंच आहे असें आढळून येईल. जीं जीं श्रद्धाकेंद्रें म्हणून मानलीं तीं तीं ढळलीं–ढासळलीं आणी आज एकही श्रद्धाकेंद्र उरलें नाहीं. धर्म नको, देव नको, गुरुजन नको, मातापिता नको, देश नको, नेता नको अशी आज भारतीय मनाची कोंडी झालेली दिसते. दगडाचा देव केला तरी ‘देवत्व’ येतेच असें नाहीं ह्याचा साक्षात्कार घडला आणि मग माणूस आपण केलेल्याच पूजा उध्वस्त करायला निघाला ह्याचें सुंदर रूपक कवीनें प्रस्तुत कवितेंत सादर केलें आहे. मूर्तींच्या ठिकाणीं ‘देवत्व’ पाहण्याची कांक्षा धरणारा तो भक्त अजूनही त्या देवत्वाच्या शोधांत त्या रिकाम्या देवळांत दाराशीं बसून आहे असें कवि म्हणतो.

बसतो शोधत कांहींसें आकाशीं

हें कांहीसें म्हणजेच देवत्व! श्रद्धाकेंद्राचा शोध चालू आहे. येणारा जाणारा प्रवासी त्या बाह्य उपचाराची स्तुति करतांना दिसतो. त्या पूजेचेंच कौतुक होतें. आणि ह्याच्या मनाची भग्नाश अवस्था मात्र कुणालाच कळत नाहीं. उलट आशाखंडाचें इतस्ततः पडलेले तुकडे पाहून सामान्य जग उपहासानें

असेल चांडाळ। हा मूर्तिभंजक

म्हणतांना दिसतें. त्याच्या मनाची ही दारुण भावना मात्र समजून घेण्याइतकी सवड कुणाला असत नाहीं. किंबहुना त्याची गरज त्यांना वाटत नाहीं. आम्हीं निर्मिलेले देव जर देवत्व प्रगट करीत नसतील तर त्या मूर्तींवर घाव पडणें अपरिहार्य आहे हेंच जणुं कवीला सुचवायचें आहे. मूर्तिपूजनापासून तों मूर्तिभंजकापर्यंतच्या सर्व प्रवासाला अखेर साथ व साद देणाऱ्या भावनाशून्य मूर्तीच जबाबदार आहेत असें कवीला सुचवायचें आहे असें वाटतें!

**उमरखय्याम, बालकवि** आणि **सैगल** ह्या तीन कवितांची प्रकृति साधारणतः सारखी आहे. अर्थात हें कांहीं मर्यादित अर्थानें म्हटलें आहे. उमरखय्याम हा प्रत्यक्षतः, आपल्याला परिचित नसला तरी उमरखय्याम मराठींत 'द्राक्षकन्ये'च्या रूपानें अमर करणारे माधव ज्युलियन महाराष्ट्राच्या चांगल्या परिचयाचे आहेत. आणि त्यांचाच उल्लेख करण्याच्या भूमिकेनेंच ही कविता लिहिली असली पाहिजे असें खालील ओळींतून दिसतें.

केला कुंभ कुणीं कुठें वसतसे कुंभार तो हुन्नरी ?
राहे तो मशिदींत वा रमतसे या उंचशा मंदिरीं !
आहे निर्गुण कां ? कशास श्रमसी या अक्षरांच्या रणीं !
आमंत्री पसरून बाहु इकडे ही 'द्राक्षकन्या' गुणी !

'उमरखय्याम'च्या व्यक्तित्वांतल्या आणि कवित्वांतल्या गहिऱ्या छटा प्रस्तुत कवितेंत सादर केल्या आहेत. "ह्या इथें तरुतळीं"चें सुंदर काव्यरूप कुसुमाग्रजाच्या खालील काव्य पंक्तींत व्यक्त होतांना दिसते.

वृक्षाखालिल सांवलींत सखिच्या संगें सुराप्राशन
गाणें गात रसाळसें मग मरूभूमीवरी नंदन !

"**सैगल**' हाही उमरखय्याम प्रमाणेंच एक असामान्य कलाकार होऊन गेला. भारतीय चित्रपटसृष्टींतली कांहीं नांवें अमर झालीं आहेत. त्यांत सैगल हेंही नांव असेंच अमर झालें आहे. त्यानंतर आज पार्श्वगायक–गायिकांचा प्रचंड तांडा समोर असतांनाही सैगलचें स्वरसम्राटपद आमच्या मनांत कायम आहे असें दिसून येतें. त्याच्या गळ्यांतल्या गोडव्याची सर अजूनही कुणाला आली नाहीं ह्या असामान्य कलावंताच्या कलेचा परिचय हा प्रस्तुत काव्याचा विषय आहे. त्याच्या गानशक्तीचें वर्णन कवि खालील ओळींत करतो

शब्दाशब्दाच्या घरांतुन ओसंडे भाव
पारिजातकाच्या फुलांचा कोमल वर्षाव !

'भाव' हा सर्वांत मोठा व महत्त्वाचा भाग सैगलच्या गाण्यांत होता. त्या भावनेनें त्याचें गाणें गोड झालें होतें. त्याच्या गाण्याचें यथार्थ व सालंकृत वर्णन करतांना कवि म्हणतो

मंद लयींमधली आर्तता आणि मोहक झार
तप्त कांचनाची जणूं तूं खेचतोस तार
प्रशान्त ओहळतें स्वरांतिल सुंदर मार्दव हें
गहन भावनांची गमे जान्हवीच वाहे !

हृदयांतील रणें शान्त करण्याचें सामर्थ्य त्या मृदु संगीतांत आहे असें कवीला वाटतें. संगीताच्या जीवावर मानवता जागृत करतां येते असा कवीला विश्वास वाटतो. संगीताचें हें सामर्थ्य विनायकांनीं **'गाण्याचें गाणें'** ह्या कवितेंत व केशवसुतांनीं **'सतारीचे बोल'** ह्या कवितेंत वर्णिलें आहे.

सैगलच्या संगीताचे अगणित शौकीन आजही गांवोगांव आहेत. त्याच्या मृत्युनंतरही त्याचें गुणगान होत आहे तें त्याच्या संगीतांतल्या असामान्य गोडव्यामुळेंच ! आर्तता, भाव, मृदुता हे सारे गुण कवीनें प्रस्तुत कवितेंत गायिले आहेत. कवीची रसिकता ह्यांतून प्रत्ययास येते.

**'बालकवि'** हें नांव साऱ्या मराठी काव्यरसिकांना परिचित आहे. त्यांच्या काव्याचा परिचय फारच सुंदर व संयमित शब्दांत कवीनें करून दिलेला आहे.

हे अमर विहंगम ! गगनाचा रहिवासी
त्या नील सागरावरचा चतुर खलाशी
प्रिय सखा फुलांचा, ओढयांच्या सांगाती
त्यांच्यास्तव धुंडुनि ताराकण आकाशीं
आणखी धरेवर अक्षर या धनराशीं !

बालकवीच्या काव्याचीं सारीं वैशिष्ट्यें वरील ओळींत ग्रथित करण्यांत आलीं आहेत ! प्रतिभेच्या, कल्पनेच्या असामान्य सामर्थ्यामुळें 'विहंगम—अमर विहंगम' असें त्यांचें यथार्थ वर्णन कुसुमाग्रज करतात. फुलें, निर्झर, आकाशस्थ सौंदर्य शब्दबद्ध करणारा कवि ह्या साऱ्या वैशिष्ट्यांचा आपणांस परिचय आहेच, परंतु कविवर्य तांबे 'मधुघट' ह्या आपल्या काव्यांतल्या एका कडव्यांत जसे आपल्या काव्याचे सर्व विषय गुंफितात तद्वतच बालकवींच्या काव्याचे सर्व विषय कुसुमाग्रजांनीं लहानशा कवितेंत कौशल्यानें गुंफिले आहेत. तांबे म्हणतात,

तरुण तरुणींची सलज्ज कुजबुज
वृक्ष झऱ्यांचें गूढ मधुर गुज
संसाराचें मर्म हवें तुज
मधु पिळण्या परि रे बळ न करीं ॥ मधुघटचि--॥

वरील कवितेचें "सौंदर्य सारें रचनेंत आहे" इतकेंच !

"**मातीची दर्पोक्ति**" ही कविता कवीच्या चिंतनशील व्यक्तित्वाचा परिचय करून देणारी कविता म्हणून उल्लेखितां येईल ! मातींतून उभा राहिलेला मानव, त्यानें निर्माण केलेली कला, उभारलेलें महाल, निर्माण केलेले ग्रंथ, रमणींची रूपसंपदा, पराक्रमी पुरुषांचा पराक्रम, पंडितांचें पांडित्य ह्या साऱ्या गोष्टींना अखेर मातींतच चिरविश्रांति घ्यावी लागते. त्या शिवाय त्यांना दुसरी गति नाहीं ह्या शाश्वत सत्याचा साक्षात्कार मातीला झालेला असल्यानें जणुं ती गर्वानें फुलून गेली असून आपल्या थोरपणाचा टेंभा मिरवीत आहे अशी कल्पना कवीनें केली आहे. ह्या कवितेंतली कल्पकता असामान्य आहे. ह्या जगांतलीं सारीं निर्मिति अखेर मातींत मिळणार आहे हें सांगण्यासाठीं कवीनें जीं विविध उदाहरणें दिलीं आहेत तीं हृद्य आहेत. अखेर मृत्यूच्या रांगेंत शिकंदर, वाल्मिकी, मनु, ताजमहाल, प्रचंड नगरें, धनवंत, भिकारी, संत, पापी, व्याभिचारी, सुंदर तरुणींचें सौंदर्य, मोठमोठे प्रासाद, सत्तेच्या, साम्राज्याच्या विजयपताका, दौलती ह्या साऱ्यांना एकच स्थान आहे व एकच समान शेवट आहे ! तो शेवट म्हणजे

मातीवर चढणें एक नवा थर अंतीं !

जगाची सारीं निर्मिति करणाऱ्याचा, त्यांना नाचविण्याचा खेळ खेळण्याचाही शेवट अखेर मातींतच आहे. त्यालाही निर्वाण चुकत नाहीं हें सांगतांना ती म्हणते

हीं क्षुद्र बाहुलीं कोण करीं निर्माण !
बेताल नाचवी, सूत्रधार हा कोण ?
मातींतच अंतीं त्याचें हीं निर्वाण ?
स्वामित्व जगाचें अखेर अमच्या हातीं
मातीवर चढणें एक नवा थर अंतीं !

प्रासयुक्त रचना, नादमाधुर्य, विविध कल्पनांची चतुर पखरण आणि एका शाश्वत सत्याचा आविष्कार हीं ह्या कवितेचीं वैशिष्ट्यें होत.

" **नदी किनारीं** ", " **गोदाकांठचा संधिकाल** " **उषःकाल** ह्या कविता मुख्यतः वातावरणप्रधान कविता आहेत. ह्या कवितांतून वातावरण निर्मितीचें कसब प्रत्ययास येते. " **नदीकिनारीं** " ह्या कवितेंतील खालील कल्पना हृद्य नाहींत असें कोण म्हणेल ?

लतालतांवर खोलुन बसलीं फुलें अंतरङ्ग
लुटण्या ते मधुकोश रुंजती भंवताली भृंग.
आकाशांतुन घनश्याम आळवती धरणीला
आणि सखीच्या गळां घालती मोत्यांची माला !
ग्रहताऱ्यांचें रासनृत्य हो गगनीं दिनरात
पक्षापरि सृष्टीच दडे प्रेमाच्या घरट्यांत !
विसरुनि वैकुंठांतिल यास्तव आसन श्रीमन्त
हृदया हृदयांमधून राहूं लागे भगवन्त !

" **गोदाकांठचा संधिकाल** " ह्या शीर्षकांतच त्यांतील वातावरण-प्रधानता सूचित होते. ह्या कवितेंतील कांहीं कल्पना अशाच हृद्य आहेत.

गर्द वनीं वा गिरीकंदरीं
लपलेला दिनीं तम, गरुडापरि
पंख आपुले पसरुनि ये जगतावरती

*　　*　　*

अभ्रखंड तो अचल पांढरा
पडे पारवा झडुनि पिंसारा
तेजहीन अन् दोन चांदण्या डोकावुन बघती.
परि शुक्राचा सतेज तारा
पसरित गगनीं प्रकाश-धारा
वीरापरि आत्मार्पण करण्या आलेल्या पुढती

*　　*　　*

देऊळ तें अन् भग्न हटानें
ध्येयनिष्ठ जणुं जनाप्रमाणें
पडलें तरिही जपुनी ठेवी हृदयांतिल मूर्ति

वरील कल्पनांतील " वीरापरि आत्मार्पण " व " देउळ तें अन् " हें कडवें कुसुमाग्रजांच्या खास वैशिष्ठ्यांचा परिचय करून देतें. पडक्या देवळांतही त्यांना ध्येयनिष्ठा दिसते आणि शुक्रताऱ्याच्या प्रकाश-धारांचें ' **आत्मार्पण** ' त्याला मोहित करते ही गोष्ट मुद्दाम ध्यानीं घेण्यासारखी आहे. संधिकालाचें वातावरण निर्माण करीत असतांना जड वस्तूंना जें सजीवत्व कवीनें प्राप्त करून दिलें आहे तें मनाला मोहवितें.

वाडा पडका नदीतटावर
भग्न आपुल्या प्रतिबिंबावर
गंगेमधल्या, खिन्नपणानें लावितसे दृष्टि

किंवा

पाचोळ्यावर कां ही सळसळ
कसली डोहावरती खळबळ
पाऊल वाटे रजनीचें कां येतांता जगतीं ?

ह्या ओळी वाचल्यावर जणुं सारें चित्र डोळ्यापुढें राहते. चित्रकाव्याचा एक सुंदर नमुना म्हणून ह्या कवितेचा उल्लेख करतां येईल.

**उषःकाल** ही कविताही कवीच्या कल्पकतेचा व वातावरण निर्मितीच्या कसबाचा प्रत्यय देणारी आहे. विविध उत्पेक्षांची मालिका हें या कवितेचें खास वैशिष्ठ्य !

फुलांना, पानांना बिलगून बसलेल्या हिमबिंदूंना उद्देशून

जोजवती जणुं नवथर बाला हीं बाळें चिमणीं

ही कल्पना किंवा

निळवन्तींच्या फुलूं लागल्या कळ्या कुंपणावरी
येऊनि रात्रींच्या प्रहरीं
परत जायचें विसरूनि गेल्या वनदेवी कोणी

*　　*　　*

माणिक मोत्यांची पायाशीं घालुनि बरसात
बसे संन्यस्त पारिजात

* * *

वनराईतुनि उठूं लागलीं करीत किलबिल तीं
पांखरें अन गगनीं जातीं
सोन्याच्या दर्यांत गल्बतें जणुं गोजिरवाणी

* * *

स्वप्नांचा वा खजिना घेऊनि लगबगिनें रात्र
गेली चुकोनिया मात्र
उषा स्वप्न हें उरलें मागें, तुजसाठीं राणी

वरील स्वतंत्र व हृद्य कल्पना हेंच ह्या काव्याचें महान आकर्षण होय. सोनेरी दर्यांत गलबतें, उषास्वप्न, संन्यस्त्र पारिजात, बाळें चिमणीं ह्या कल्पना केवळ अविस्मरणीय !

" **ऋण** " ह्या कवितेंत कवि, कलाकार यांनीं केलेल्या अतुल मार्गदर्शनाचें, दिलेल्या दिलास्याचें ऋण अंशतः तरी फेडावें ही कल्पना मांडलेली दिसते. जीवनांत ज्या वेळीं ग्रीष्माचा ताप जाळतो व वादळ घोंघावत असते, अतिश्रमांनीं जीवनांत थकवा येतो अशा वेळीं

" तुम्हीच कवि हो, दिला मधुरसा विसांवा मला ! " असें ह्या कवितेंतला कवि म्हणतो. जीवनाला मार्गदर्शन करणें, दिलासा देणें, मानवी भावनांचें उन्नयन करणें, मानवी जाणीवांची उंची वाढविणें हेंच ललित साहित्याचें प्रधान कार्य मानलें जातें. सर्वत्र संग्रामाचें, तांडवाचें वातावरण असतांना साहित्य ही एकच शक्ति माणसाला धीर देऊं शकते, मार्गदर्शन देऊं शकतें. समाधान व सांत्वन देऊं शकते असें कवीला प्रस्तुत कवितेंत सुचवायचें आहेसें वाटतें. ही कला-साधना सामान्य नाहीं. स्वतः जळून इतरांना प्रकाश देण्याची किमया तुम्हीं व्यक्त केली असेल ह्याला उद्देशून कवि म्हणतो

असाल जळलां तुम्हीं उजळ ज्योति या लावतां
असाल कढलां असे, प्रखर ताप साहतां

उरांत जखमांतली रुधिर–वाहिनी रोधुनी
असेल तुम्हीं ओतलीं स्वर–घटांत संजीवनी !

मानवी जीवनाला संजीवन देण्याचें सामर्थ्य ह्या कलासाधनेंत आहे हें वरील ओळींत कवि सुचवितो. हें मानवी जीवनावरलें ऋण फेडण्याची जबाबदारी अखेर आमची आहे.

नकोत नसलीं जरी प्रकट स्मारकांची दळें
असंख्य हृदयीं उभीं असत आपुलीं देवळें !

कवीचें, कलावंताचें स्थान अखेर असंख्य रसिकांच्या हृदयांत असते. आणि तेंही देवळाच्या सारखें पवित्र, श्रद्धाकेंद्रासारखें असतें असेंच ह्या कवितेंत सुचवायचें आहे.

" **भावकणिका** " व ' **जीवनलहरी** ' ह्या दोन कवितांतून उत्कट भावविलास, कल्पकता, कवीच्या व्यक्तित्वाचें प्रत्ययकारी चित्रण आढळते. ' भावकणिकें ' तल्या खालील ओळी खास कुसुमाग्रजांच्या आहेत हें नांव न घालतां कुणींही ओळखील.

हें हृदय नसे परि स्थंडिल धगधगलेलें
आशांचें इंधन अखंड त्यावर चाले
हें जीवन कीं हें मृगजळ एक विराट
मृग आर्त धांवती दूर, सारखे दूर
अन् क्षितिजावरती सदा जळाचा पूर !

आर्तता, उत्कटता, जीवनानुभूति इत्यादि गोष्टी भावकणिकेंत आहेत. ' रेखलें मनोहर ' मधील बाह्य सौंदर्य रेखाटणें कदाचित् कलावंताला शक्य होईल पण अंतरंग चित्रित करणें कितपत जमेल याविषयीं आशंका वाटते. " परि हृदय त्यांतलें कधीं काय रेखाल ? " ह्या प्रश्नांतून ती व्यक्त झाली आहे. स्तनांना दिलेली कनकाच्या कुंभाची उपमाही हृद्य आहे. " " **रे परत पांखरा** " मधील " **रवि सुवर्ण तारूसम लोपेल समुद्रीं** " ही कल्पनाही चांगली आहे.

" **जीवनलहरीं** "तही कल्पकतेप्रमाणेंच विदारक सत्यदर्शन घडतें.

आशा रात्रीं रचते
वैभवशाली नगरी

अनुभव परि तुडवित ती
येतो दिवसा दारीं
करुनीयां विकट हंसें
आशेला आणि पुसे
वेड्यापरि बसशी कां ?
रात्रीची जागत तूं ?

यामधील सत्य, अनुभव व उपरोध ध्यानीं घेण्यासारखा आहे. पहिल्या कवनांतला उपरोधही. विरोधात्मक भागही असाच हृद्य आहे.

ह्याशिवाय बायरन, मेघास, विजयोन्माद इत्यादि कविता ह्या विभागांत बसतात. परंतु त्यांचा तपशीलवार परामर्ष घेण्याची फारशी गरज भासत नाहीं. कुसुमाग्रजांच्या कवितेंतील भावसौंदर्य, रचनासौंदर्य, कल्पनासौंदर्य, विचारसौंदर्य ह्यांचा परिचय आपण करून घेतला आहे. क्वचित् रचनेची शिथिलता, शब्दांची ओढाताण दिसत असावी ती त्यांच्या कवितासुंदरीच्या गालावरील तीटच वाटावी. 'कुसुमाग्रज' ही मराठीला लाभलेली फार मोठी देणगी आहे. तिच्या चरणीं भाववंदना सादर करण्याच्या भूमिकेनेंच हा प्रपंच केला आहे. हे भाव चित्तीं ठसतील व वंदना स्वीकारली जाईल अशी आशा करतो.

# ६ : कवि कुसुमाग्रज यांची मुलाखत

**प्रश्न १ :**—आपल्या मतें कवि सामाजिक मनाचा आविष्कार करतो कीं आत्माविष्कार करतो ?

**उत्तर** : सामाजिक मन ही संज्ञा सोयीची आणि पारिभाषिक आहे. वास्तवांत सामाजिक मनाला कांहीं प्रत्यक्ष अस्तित्व आहे असं मानायचं कारण नाहीं. समाजांतील बहुसंख्य व्यक्तींचं मन तें सामाजिक मन. बहुसंख्य व्यक्तींचे मनोव्यापार ते सामाजिक मनोव्यापार. म्हणून वाङ्मयाच्या संदर्भांत तरी समाजमन आणि व्यक्तिमन यांत वर्गभेद मानायचं कारण मला दिसत नाहीं. काव्याची वर्गवारी या तत्त्वावर करणं बरोबर होणार नाहीं. कवि सामाजिक मन प्रकट करतो असं आपण जेव्हां म्हणतों तेव्हां तो वस्तुतः स्वतःचंच मनोगत प्रकट करीत असतो. तें मनोगत समाजांत मोठ्या प्रमाणांत प्रसृत झालेलं असतं एवढंच. परंतु अखेरतः तें व्यक्तिगतच असतं. समाजांत प्रसृत असलेलीं हीं मनोगतं एखादा कवि अधिक प्रमाणांत आत्मसात् करूं शकतो, स्वतःच्या मनांत मुरवूं शकतो, दुसरा एखादा तसं करूं शकत नाहीं. त्यावरून असं मानायचं कारण नाहीं कीं, पहिला कवि काव्यलेखनासाठीं स्वतःच्या मनाबाहेर जातो आणि दुसरा मात्र जात नाहीं. माणसाला येणारी अनुभूति ही व्यावहारिक असते तशी भावनात्मक वा मानसिकहि असते. काव्यलेखनाचा संबंध अशा मानसिक अनुभूतीशीं असतो. या मानसिक अनुभूतीची कक्षा हीच कवीच्या काव्यलेखनाची कक्षा. यांत मूलतः सामाजिक असं कांहीं असत नाहीं. उदाहरणादाखल केशवसुतांची ' नवा शिपाई ' ही कविता घेऊं. येथें विषय सामाजिक आहे. कवीच्या काळांत हजारों लोकांना जो विचार तीव्रतेनं जाणवला तोच या काव्यांत व्यक्त झाला आहे. म्हणजे रूढार्थानं कवितेंत सामाजिक मनाचा आविष्कार आहे. पण परमार्थानं तें खरं आहे का ? आपल्या हातून कांहीं लोकसेवा घडावी म्हणून केशवसुतांनीं त्या हजार लोकांकडून हा विचार उसनवारीनं आणला आहे का ? चांगल्या काव्याच्या बाबतींत अशी भावनेची उसनवारी असूंच शकत नाहीं. ' सतारीचे बोल '

किंवा ‘ म्हातारी ’ यासारख्या काव्यांतील भावना जेवढी व्यक्तिगत आहे तेवढीच या कवितेंतीलहि संसारांतील विविध सुखदुःखांच्या, हर्षखेदाच्या प्रतिक्रिया जशा कवीच्या मनांत उद्‌भवतात, तशा सामाजिक प्रश्नांच्या, संघर्षांच्याहि उद्‌भवूं शकतात. सारांशानं, कवि जेव्हां समाजाची किंवा त्यांतील एखाद्या वर्गाची भावना व्यक्त करतो तेव्हां ती भावना त्याची स्वतःचीच असते. असें नसेल तर ती कविता तकलादी व बनावट होईल. पण अशी बनावट काव्यें केवळ सामाजिक भावनेच्या नव्हे, तर इतरहि सर्व भावनांच्या, अनुभवांच्या बाबतींत संभवनीय असतात.

**प्रश्न २ :**—‘ विशाखें ’तील आपल्या कवितेकडे आपण सामाजिक मनाचा आविष्कार म्हणून पाहतां काय ?

**प्रश्न ३ :**—सामाजिक मन व आत्माविष्कार ह्यांत जर फरक नसेल तर तुमच्या आजच्या कविता कोणत्या सदरांत मोडतात ?

**उत्तर :** यांचीं उत्तरें वरील उत्तरांत आलेलीं आहेत. विशाखेंत प्रकट होणारं कविमन सामान्यतः समाजोन्मुख आहे एवढंच म्हणतां येईल. माझ्या अलीकडच्या कविता कोणत्या सदरांत मोडतात याचा मी विचार केलेला नाहीं. किंवा त्या कोणत्या तरी एका सदरांत बसल्या पाहिजेत असाहि माझा आग्रह नाहीं.

**प्रश्न ४ :**—काव्यसाधना केली त्यावेळचे तुमचे अनुभव निवेदन कराल काय ? तुमच्यापुढें आदर्श कोणते होते ? काव्याची साधना कोणत्या दिशेनें झाली ? प्रेरणा कोणत्या होत्या ? विशाखेंतल्या प्रेरणा प्रामुख्यानें सामाजिक आढळतात. हे संस्कार, ह्या प्रेरणा ज्या पार्श्वभूमींतून घेतल्या त्याचें दिग्दर्शन कराल काय ?

**उत्तर :** माझ्या काव्यसाधनेंत कांहीं विशिष्ट पद्धति होती, विचारपूर्वक ठरविलेला कांहीं अभ्यासक्रम होता असें मला आठवत नाहीं. अमूक केलं म्हणजे अमूक होतं, चांगल्या लेखनासाठीं हें स्वीकारलं पाहिजे आणि तें टाकलं पाहिजे, यासारखे आडाखे मला तयार करतां आले नाहींत. आजहि करणं कठिण वाटतं. साहित्याच्या शास्त्रांत अगदीं तळाशीं असलेले ऐसपैस सिद्धान्तच तेवढे निश्चित व निरपवाद असतात. ही भरड जमीन सोडून जरा वरती गेलं कीं मतभेदाला सुरुवात होते. अगदीं वरच्या विरळ हवेंत

तर नुसतेच मतभेद असतात. अशा परिस्थितींत कोणत्याहि मतवादासंबंधीं मनांत साशंकता निर्माण झाल्यास नवल नाहीं. परंतु प्रारंभींच्या काळांत या साशंकतेलाहि अवसर नव्हता. काव्याचा साक्षात्कार पहिल्या पर्वांत फार बलवत्तर असतो. माणसाला तो उन्मनी अवस्थेंत नेऊन सोडतो. गांवांत एखादा कवि नव्यानं कविता लिहूं लागला कीं गांवकऱ्यांनीं गुढ्या-तोरणें उभारून आणि घंटा वाजवून तो दिवस साजरा करायला हवा असे उद्गार एका इंग्रजी लेखकानं काढले आहेत. गांवकरी असा उत्सव करणार नाहींत, आणि करीत नाहींत तेंच बरं आहे. परंतु स्वतः कवि मात्र आपल्यापुरता हा महोत्सव साजरा करीत असतो. काव्यमयतेचं रंगी-बेरंगी धुकं त्याच्या सभोवार तरंगूं लागतं आणि वस्तुस्थितीच्या रूपरेषा अस्पष्ट होऊं लागतात. या धुक्याचा आणि धुंदीचा अनुभव घेणं हीच एका परीनं काव्याची 'साधना' असते असं म्हणावयास हरकत नाहीं. विकासासाठीं असुसलेलं रोपटं आकाशांतून कोसळणारा मुसळधार पाऊस अधीरतेनं आपल्या अंगावर घेत असतं. या उद्योगांत तें वाकतं, फडफडतं आणि तडफडतं सुद्धां. तरीहि त्याची अधीरता संपत नाहीं. पानापानावर दिसणाऱ्या हिरव्यागर्द रोमांचांतून ती प्रकट होत असते. आणखी - आणखी म्हणून पुटपुटत असते. प्रारंभकाळीं कवीची अवस्थाहि अशीच असते. चहू-कडून येणारे लिखित-अलिखित काव्याचे स्रोत तो आपल्या अंगावर घेत असतो, आपल्या व्यक्तित्वांत जिरविण्याचा प्रयत्न करीत असतो. यांतूनच त्याच्या कवि - प्रकृतीचा विकास हलकेहलके होत जातो. रोपट्याचं झाड होतें. सारीं रोपटीं सारखीं दिसतात. पण झाडांना मात्र स्वतःचे विशिष्ट आकार, विशिष्ट रूप, विशिष्ट गुणधर्म प्राप्त होतात; कांहीं झाडं कातलेल्या कुंजा-सारखीं डौलदार दिसतात, कांहीं डोलकाठीसारखीं सरळ उंच जातात, कांहीं तंबूसारखीं विशाल व प्रशस्त होतात, कांहीं रुद्र, कांहीं भेसूर, तर कित्येक खुरटलेलीं दिसतात. ही विशिष्टता प्राप्त झाली म्हणजे साधना, निदान साधनेची पहिली अवस्था संपते. या धुंदीच्या आणि धुक्याच्या प्रदेशांतून मलाहि अर्थात् वाटचाल करावी लागली. मागें वळून पाहिलं—तर तो धूसर पट्टा तेवढा क्षितिजावर तरंगतांना दिसतो. त्यांतील सर्व तपशिलाची नोंद करणं प्रायः अशक्य आहे.

माझ्यापुढें आदर्श कोणते होते ? जाणतेपणानें कोणत्याहि आदर्शांचा मी स्वीकार केला असं आठवत नाहीं. जें हातीं येईल तें वाचावं, त्यांतील रस आत्मसात् करण्याचा प्रयत्न करावा, रसापर्यंत पोहोंचतां आलं नाहीं तर शब्दांच्या नादजालांत गुंतून पडावं, तेंहि जमलं नाहीं तर मनांत शिरणाऱ्या चुकीच्या संस्कारांवरच समाधान मानावं, असा तेव्हांचा शिरस्ता होता. या अराजकांतून दोन नांवं उठून दिसतात. गडकरी आणि बालकवि. या दोघांचं वाङ्मय मला खूप आवडायचं. ( अद्यापहि तें प्रेम तितकं उत्कट नसलं तरी कायम आहे. ) वारंवार होणाऱ्या वाचनामुळें नाटकांतील उतारे आणि कविता पाठ होऊन जात. एवढं झाल्यावर त्यांच्या पावलावर पाऊल टाकून लेखन करण्याची खटपट झाली नसती तरच नवल. पण या खर्ड्यांमध्यें शिल्लक ठेवण्यासारखं कांहीं नव्हतं आणि मी तें ठेवलंही नाहीं. शिल्लक उरले ते कांहीं अभाविक संस्कार आणि त्या थोर कवींविषयींचं हार्दिक प्रेम. पुढील काळांत मराठी–इंग्रजींतील कित्येक कवि मी वाचले. या काव्याच्या मंदिरांत मी जात असे तो केवळ भक्तिभावानं. तेथील शिल्पकामाचं परीक्षण वा मनन करण्यासाठीं नव्हे. तें मला कधीं जमतच नसे. परंतु तरीहि त्या सर्वांनीं माझ्या हातावर कांहीं दानदेणगी टाकलेली आहे.

विशाखेंतील प्रेरणा प्रामुख्यानं सामाजिक आढळतात हें खरं आहे. त्याची कारणमीमांसा मला सुचते ती एवढीच कीं, कोणताहि कवि कांहीं विशिष्ट बाबतींत अधिक संवेदनशील असतो. त्याच्या संवेदनांचे ठराविक प्रांत असतात. या प्रांतांच्या बाहेर तो जात नाहीं असं नाहीं. परंतु रसायनं विशिष्ट पदार्थांच्या संयोगांतच विशिष्ट परिणाम दर्शवतात, त्याप्रमाणें कविमनहि या ठराविक प्रांतांतच अधिक उत्कट, अधिक तीव्र अशी भावना धारण करतं. अनेक प्रांतांत सारख्या उत्कटतेनं संचार करणारा केशवसुतासारखा कवि दुर्मिळच.

**प्रश्न ५** :––आपण काव्य लिहिलें त्यावेळीं आपण ' शुद्ध ' काव्य लिहितो आहोंत येवढीच शुद्ध भावना आपल्याजवळ होती कीं ध्येयवादी जीवनाची साधना म्हणून आपण ती करीत होता ? मुख्यतः 'विशाखें'तील कवितेच्या संदर्भांत ह्याचें उत्तर हवें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थळप्रत कुसुमाग्रज
अनुक्रमांक ... वि: ... नों. दि: ...

**उत्तर** : ' शुद्ध ' काव्य ही अस्तित्वांत नसलेली वस्तु आहे. काव्या-वरील निष्ठा मला समजूं शकते. पण तेवढयासाठीं त्याला मुकटे नेसवून अलिप्ततेत कोंडून ठेवायचं कारण नाहीं. माणसाचं मनोगत विशिष्ट प्रकारानं व्यक्त करणारा वाङ्मयप्रकार एवढाच अखेरतः काव्य या संज्ञेचा अर्थ आहे. शुद्ध कादंबरी अथवा शुद्ध नाटक असूं शकत नाहीं, त्याप्रमाणें शुद्ध काव्यही असत नाहीं. त्यांत नेहमींच कवीला जाणावलेलं ' कांहींतरी ' सांगितलेलं असतं. तो अगोदर प्रेमकविता लिहायचा बेत करतो आणि नंतर त्यासाठीं प्रेमविषय धुंडायला जातो असं होत नाहीं. हें जसं प्रेमाच्या बाबतींत होत नाहीं, तसं इतर कोणत्या विषयाच्या बाबतींतहि घडत नाहीं. तेव्हां कोणत्याहि विषयाची ' साधना ' कवीपुरती—आणि त्याच्या पद्धतीनं—अगोदर अस्तित्वांत असतेच.

**प्रश्न ६** :—' देवाचिये द्वारीं ' हा पूर्वींचा अभंग व सध्याचें तत्व-चिंतनपर काव्य ह्यांतील आपली भूमिका भिन्न वाटते. पूर्वींची भूमिका भौतिक होती आज ती कांहीं वेगळा आशय व्यक्त करीत आहे. हा बदल कसकसा होत गेला तें सांगाल काय ?

**उत्तर** : काव्यावरतीं कविच्या मनाचा, त्याच्या जीवनदृष्टीचा आणि त्यानें स्वीकारलेल्या तत्त्वज्ञानाचा पगडा पडलेला दिसणं स्वाभाविक आहे. परंतु काव्य म्हणजे मुद्देसूद मीमांसा नव्हे. ठामपणें पत्करलेल्या व रुजव-लेल्या विचारांबाबत—ते ठाम आहेत तोंपर्यंत—कवि असंदिग्ध राहील, पण जे विचार मुळांतच अस्पष्ट आणि अनिर्णित स्वरूपाचे आहेत, त्यासंबंधीं त्याच्या लेखनांत ' भिन्नता ' आढळणं, मला वाटतं अपरिहार्य आहे.

**प्रश्न ७** :—कुठल्याही कलावंताच्या प्राथमिक अवस्थेंत त्याच्या कलात्मक व्यक्तित्वाची जडणघडण मुख्यतः अनुकरण प्रवृत्तींतून होत असते ? आपल्या कलात्मक व्यक्तित्वाची जडणघडण अनुकरण प्रवृत्तींतून झाली काय ? झाली असेल तर प्रा. रा. श्री. जोग आपल्या संदर्भांत ' अर्वाचीन मराठी काव्य ' मध्यें " आपल्या कवितेवर कोणत्याही पूर्वसूरीची छाया नाहीं, ती संपूर्णतया स्वतंत्र आविष्कार करणारी कविता आहे ", असें म्हटलें आहे " त्याबद्दल आपणांस काय म्हणतां येईल ?

**प्रश्न ८** :—आपल्या काव्यानें मराठींत अग्नि, स्थंडिल संप्रदाय निर्माण

झाला असें मानलें जातें. ह्या संप्रदाय पद्धतीबद्दल व मीमांसेबद्दल आपलें स्वतःचें मत काय आहे ?

**प्रश्न ९:**—"माझ्यावर ऋण आहे तें अनेकांचे. जें जें आपण आवडीनें वाचतो, जें आपल्या प्रवृत्तीला मानवतें, त्याचे कांहीं ना कांहीं संस्कार आपल्या मनावर आणि लेखनावर झाल्याशिवाय रहात नाहींत. परंतु पहिला दिवा कुठल्या तरी मोठ्या दिव्यावर पेटवावा लागतो. हें कार्य माझ्या बाबतींत गडकऱ्यांच्या साहित्यानें केलें".—असें आपण आकाशवाणीचे मुलाखतींत म्हटलें आहे. गडकऱ्यांच्या संस्कारांतूनही आपण काव्यावर मात्र त्यांच्या कृत्रिमतेचा संस्कार होऊं दिलेला दिसत नाहीं हें कसें ? गडकऱ्यांच्या नेमक्या कोणत्या गुणांचें खास आकर्षण आपणांस वाटलें ?

**उत्तर :** या प्रश्नांचा खुलासा थोडाफार अगोदरच्या उत्तरांत आलेलाच आहे. प्राथमिक अवस्थेंत कोठल्याहि कवीला वा कलावंताला अनुकरणाच्या यत्तेंतून जावं लागतं याबद्दल मला संशय वाटत नाहीं. ज्याच्याजवळ स्वतःचं कांहीं बळ असतं तो हे संस्कार रिचवीत, पचवीत पुढच्या यत्तेंत जातो. ज्याच्याजवळ तें असत नाहीं तो अनुकरणाच्या मर्यादेंतच उमलतो आणि संपतोहि. 'व्यक्तित्वाची जडणघडण' होण्यासाठीं अनुकरणाचा उपयोग होत असेल, नव्हे होतोहि, पण कालांतरानं हे बाह्य संस्कार निकामी कवचाप्रमाणें आपोआप गळून पडतात आणि त्यांतून त्या कलावंताचं स्वतंत्र व्यक्तिमत्व प्रकट होतें. विशाखेंतील कविता या कांहीं माझ्या प्रारंभींच्या कविता नव्हत. प्रा. जोगांना विशाखेंत, अनुकरणाच्या हद्दी ओलांडून गेलेलं काव्य आढळते हा त्यांच्या (आपण उद्धृत केलेल्या) उदगारांचा अर्थ.

कोठल्याहि सांप्रदायाची मेढ रोवण्याचा मी सहेतुपणानं प्रयत्न केला आहे असं मला वाटत नाहीं. 'स्थंडिल संप्रदाय' निर्माण करण्याचं श्रेय (तो निर्माण झाला असल्यास) त्या विशिष्ट काळाकडे आहे. स्वातंत्र्याचा लढा त्या काळांत अखेरच्या तळावर येऊन पोहोंचला होता. भोंवतालचं सर्वच वातावरण संग्रामाच्या भावनेनं धगधगलेलं होतं. अशा वातावरणांत सर्वत्र प्रश्नांना उग्र आणि निकराचं स्वरूप प्राप्त झालं होतं. संस्कारशील मन असलेले कवि या परिस्थितींत 'स्थंडिला'कडे वळले नसते तरच नवल झालं असतं.

कवींच्या प्रतिभा अंतराळांत अधांतरीं टांगलेल्या असतात असं मानायचं कारण नाहीं. भोंवतालच्या जीवनांतील प्रक्षोभांचे, संघर्षांचे सादपडसाद त्यांच्या काव्यांत उमटणं अटळ आहे.

प्राथमिक अवस्थेंतील संस्कार पुढें शिल्लक राहात नाहींत, निदान स्थूल अनुकरणाच्या स्वरूपांत तरी राहात नाहींत हें यापूर्वी सांगितलंच आहे. गडकऱ्यांच्या साहित्यांतील उणीवा गेल्या तीस चाळीस वर्षांत स्पष्ट होऊन गेल्या आहेत. अेखादा शाळकरी मुलगाहि त्या कलमवारीनं धडाधड म्हणून दाखवील. परंतु त्याबरोबर गडकऱ्यांचं अतुल सामर्थ्यहि आतां वादातीत आहे असं म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. शब्दावरील अलौकिक प्रभुत्व, हास्य आणि करुण या दोन्ही रसांचे आविर्भाव पराकोटीला पोहोंचविण्याची कुवत, सृष्टींतील व व्यवहारांतील विविध, सूक्ष्म तपशिलापर्यंत जाणारी प्रखर कल्पनाशक्ति इत्यादि गुणविशेषांत गडकऱ्यांचं 'गडकरीपण' सामावलेलं आहे. त्यांचं आकर्षण मला पूर्वी वाटलं, आजहि वाटतं.

**प्रश्न १० :**—स्वास्थ्य आणि लेखन ह्यांचें कांहीं नातें आहे वा असावें असें आपणांस वाटतें काय ?

**उत्तर :** स्वास्थ्य आणि लेखन यांत कांहीं निश्चित कार्यकारण संबंध आहे असं मला वाटत नाहीं. स्वास्थ्याचा लाभ झालेला नसतांना केशवसुत, बालकवि इत्यादिकांनीं आपलीं काव्यं लिहिलीं; आणि टागोरांसारख्यांचं काव्यं सर्वस्वीं स्वास्थ्याच्या वातावरणांत जन्माला आलं. लेखकाची प्रतिभा-वेल अमुक जमिनीवर, अमुक हवामानांत आणि अमुक परिस्थितींतच पल्लवित होईल असं मानणं चूक आहे.

* *

REFBK-0011521
३०४/८
१३२३